पुणे, शनिवार, ७ जुन २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 189 • वर्ष ४ थे, अंक १८९ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




सिंहगडावर 'वारा गाई गाणे'...!




रायगड रॉयल्सची विजयी सुरुवात

# शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

## ८० हजारांहून अधिक शिवभक्तांची उपस्थिती, २१ गावांनी केले गडपूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ढोल ताश्याचा गजर, मंत्रोच्चार आणि शंखानाद, शिवरायांच्या गजरात किल्ले रायगडावर ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यासाठी राज्यभरातील ८० हजारहून अधिक शिवभक्त गडावर दाखल झाले होते.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक उत्सव समिती दुर्गराज रायगड यांच्यावतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किल्ले रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजी राजे छत्रपती आणि शहाजी राजे उपस्थित होते. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, कोकण विभागाचे पोलीस विशेष महानिरीक्षक संजय दराडे, पोलीस अधिक्षक आंचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदी. यावेळी उपस्थित होते.



दोन दिवस चाललेल्या या सोहळ्याची सुरवात गुरुवारी दुपारी गडपुजनाने झाली. रायगड खोऱ्यातील २१ गावातील नागरीकांनी एकत्र येऊन गडपुजन केले. यानंतर शिरकाई देवी मंदिरात गोंधळ तर जगदिश्वर मंदिरात किर्तन सोहळा संपन्न झाला. राज्यभरातील विविध भागातून आलेल्या शिवभक्तांनी होळीच्या माळावर मर्दानी खेळ सादर करत शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. रात्री उशीरा राजसदरेसमोर शाहिरांनी पोवाडे सादर केले.

शुक्रवारी सकाळी सहा वाजता शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाला सुरवात झाली. पहाटे नगारखाना परिसरात ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राज सदरेवर शाहिरांनी महाराजांना मानवंदना दिली. सकाळी साडे दहाच्या सुमारास छत्रपती संभाजी राजे यांचे राजसदरेवर आगमन झाले. यानंतर मेघडंबरीतील शिवाजी महाराजांच्या सिहासनारूढ पुतळ्याला सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. नंतर शिवाजी महाराजांच्या पालखीतील मुर्तीला पंचामृत, सप्तगंगा स्नान घालण्यात आले. नंतर या मुर्तीचे विधीवत पूजन करण्यात आले. शिवआरतीचे पठण करण्यात आले. यावेळी रायगड पोलीस दलाच्या वतीने महाराजांच्या पुतळ्याला सश्रस्त्र मानवंदना देण्यात आली. त्यानंतर

» पान ७ वर

# दरबार हॉलने अनुभवला ७९ वर्षांनी सोहळा

## कोल्हापुरात राज्याभिषेकाचा सोहळा उत्साहात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** फुलांच्या माळांची सजावट, रांगोळ्यांनी सजलेला परिसर, भालदार-चोपदारांची लगबग, राजपरिवारासह मानक-यांची उपस्थिती, सनई चौघड्यांचे मंजूळ स्वर, शाहीरी पोवाड्यांच्या कवनांनी चेतवलेली स्फुर्ती, मराठा लाईट इनफन्ट्रीच्या सिल्व्हर वाद्यवृंदाचे लयबद्ध सादरीकरण आणि मंत्रोच्चाराचा जयघोष अशा आवेशपूर्ण वातावरणात शुक्रवारी नवीन राजवाड्याच्या ऐतिहासिक दरबार हॉलमध्ये शिवराज्याभिषेक दिनाचा शाही सोहळा पार पाडला.

छत्रपती चॅरिटेबल देवस्थान ट्रस्ट व शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर यांनी ३५१ व्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे आयोजन केले. हा सोहळा नवीन राजवाड्यासमोरील प्रांगणात होत असतो, परंतू गुरुवारी झालेल्या जोरदार पावसामुळे हा सोहळा ऐनवेळी ऐतिहासिक दरबार हॉल मध्ये घेण्यात आला.

» पान ७ वर

# महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल- उद्धव ठाकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सध्या सुरु आहे. याबाबत दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी गेल्या काही दिवसांमध्ये सूचक वक्तव्य केलं आहे. तसंच कार्यकर्तेही वरिष्ठ नेते काय निर्णय घेतात याची वाट पाहात आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल. शिवसैनिकांच्या मनात कोणताही संभ्रम नाही. (मनसैनिक) मनातही कोणताही संभ्रम नाही. आम्ही संदेश न देता थेट बातमी देऊ, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. ते मुंबईमध्ये पत्रकारांशी बोलत होते. ठाकरे यांच्या वक्तव्यामुळे दोन्ही



पक्षांमध्ये युतीबाबत सकारात्मक बोलणी सुरु आहे. याबाबत लवकरच घोषणा होऊ शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

यापूर्वी संदीप देशपांडे, अमित ठाकरे आणि आता अविनाश जाधव या मनसेच्या बड्या नेत्यांकडून मनसे-शिवसेना युतीबाबत सकारात्मक वक्तव्य केली होती. महाराष्ट्र हितासमोर आमचे वाद, भांडणे छोटी आहेत, असं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं. आता तुम्हाला असं वाटत असेल आम्ही पुढची पावलं उचलली पाहिजेत, तर उद्धव साहेबांनी राज साहेबांना फोन

» पान ७ वर

# जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी जम्मू आणि काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील चिनाब पुलाचे उद्घाटन केले. हा पूल चिनाब नदीवर बांधला गेला आहे आणि जगातील सर्वात उंच रेल्वे पूल मानला जातो. हा पूल उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्पाचा एक महत्त्वाचा भाग आहे. जेव्हा पंतप्रधान मोदींनी चिनाब नदीवरील जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च पुलावर तिरंगा फडकावला तेव्हा तो केवळ उद्घाटन समारंभ नव्हता. ते भारताच्या सार्वभौमत्वाचे, स्वावलंबनाचे आणि धोरणात्मक सामर्थ्याचे एक शक्तिशाली प्रतीक होते. उद्घाटन समारंभात पंतप्रधान मोदींनी याला विकास आणि विश्वासाचे प्रतीक म्हणून वर्णन केले. तसेच हा पूल देशाच्या एकतेचे, प्रगतीचे आणि संकल्पाचे प्रतीक असल्याचेही म्हटले.



चिनाब रेल्वे पूल आणि जम्मू आणि काश्मीरमधील महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांचे उद्घाटन करताना, पंतप्रधान मोदी म्हणाले, "आजचा कार्यक्रम भारताच्या

» पान ७ वर

### जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाची वैशिष्ट्ये...

- **चिनाब रेल्वे पूल आयफेल टॉवरपेक्षा उंच!:** काश्मीर खोऱ्याला देशाच्या अन्य भागाशी सुलभतेने जोडणारा एक भव्य पूल चिनाब नदीवर बांधण्यात आला आहे. पॅरिसमधील आयफेल टॉवरपेक्षाही त्यांची उंची अधिक आहे. हा रेल्वे पूल ४० किलोग्रॅम टीएनटी स्फोटकांचा स्फोट किंवा ८ रिश्टर स्केलची तीव्रता असलेल्या भूकंपाचा धक्काही सहन करू शकतो. विशेष म्हणजे स्फोटानंतरही या पुलावरून ताशी ३० किलोमीटर वेगाने रेल्वे जाऊ शकते. हा पूल १,३१५ किलोमीटर लांबीचा असून तो ताशी २६० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा आघात सहन करू शकतो. या पुलावर एक फुटपाथ आणि एक सायकल मार्गही बनवण्यात आला आहे.
- **पुलाची लांबी १३१५ मीटर :** चिनाब नदीवरील सर्वात उंच रेल्वे पूल बारामुल्लास उधमपूर-कटरा-काजीगुंडमार्गे जम्मूला जोडणारा आहे. या पुलाची लांबी १३१५ मीटर आहे. त्यामध्ये ४६७ मीटरचा मेन आर्क स्पेस आहे. हा आतापर्यंत बनवलेल्या कोणत्याही ब्रॉड गेज लाईनवरील सर्वाधिक लांबीचा आर्क स्पॅन आहे. हा पूल पॅरिसच्या आयफेल टॉवर (३२४ मीटर) पेक्षा ३५ मीटर उंच आणि कुतुब मीनारपेक्षा सुमारे पाच पट अधिक उंचीचा आहे. हा चिनाब रेल्वे पूल विकासाच्या बाबतीत एक मैलाचा दगड ठरणार आहे.
- **३०,३५० टन स्टीलचा वापर:** दिल्लीतून काश्मीरमध्ये ट्रकमधून सामान येत असते. त्यामध्ये सुमारे ४८ तासांपेक्षाही अधिक वेळ जातो. हा पूल सुरू झाल्यावर ट्रेनने मालवाहतूक केली जाऊ शकेल व वेळेत २०

» पान ७ वर

# मुख्यमंत्र्यांच्या राजकीय सचिवाची हकालपट्टी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** बेंगळुरू चेंगराचेंगरीनंतर कर्नाटकातील सिद्धरामय्या सरकार सक्रिय झाले आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या राजकीय सचिवांना विधान परिषद सदस्य के. गोविंदराज यांच्या पदावरून हटवण्यात आले आहे. याशिवाय गुप्तचर विभागाचे प्रमुख हेमंत निंबाळकर यांचीही बदली करण्यात आली आहे. गोविंदराज यांना हटवण्याचे कोणतेही अधिकृत कारण सांगण्यात आले नसले तरी ४ जून रोजी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला होता.

माध्यमातील वृत्तानुसार, बुधवारी सकाळी झालेल्या चेंगराचेंगरीच्या काही तास आधी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी

» पान ७ वर

## विजय मल्ल्याचा खळबळजनक दावा

# अरूण जेटलींना सांगून देश सोडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मी पळपूटा नाही. तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटलींना सांगून देश सोडला, मला चोर म्हणणे चुकीचे आहे, कारण ६२०० कोटींच्या बदल्यात बँकांनी १४००० कोटी वसुल केलेत, असा दावा विजय मल्ल्या याने केला आहे. बँकांसोबत सेटलमेंट करण्याचा विचार करत असतानाच पासपोर्ट रद्द झाला आणि परदेशात अडकल्याचेही त्याने सांगितले. यूट्यूबर राज शमानी याच्यासोबत पॉडकास्टमधून ही माहिती समोर आली आहे. विजय माल्या एकेकाळी भारतात यश, वैभव आणि लक्झरीचे प्रतीक मानले जात होते, आज ६२०० कोटी रुपयांच्या बँक कर्ज फसवणूक आणि मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ते अडकले आहेत.

नऊ वर्षांनंतर प्रथमच माध्यमांसमोर आलेल्या माल्यांनी, यूट्यूबर राज शमानी याच्याशी चार तासांच्या पॉडकास्टमध्ये आपले जीवन, व्यवसाय, किंगफिशर एअरलाइन्सचे अपयश, कर्मचाऱ्यांचे थकीत पगार आणि कायदेशीर लढाई यावर मोकळेपणाने चर्चा केली.

सध्या माल्या लंडनमध्ये आपल्या सहा कुत्र्यांसोबत वेळ घालवतात. त्यांचे उत्पन्न विदेशी दारू कंपन्यांमधून येते. ते म्हणतात, "मी कायदेशीर लढा देत आहे. जर मला न्याय्य सुनावणी मिळाली, तर



भारतात परतण्याचा विचार करेन. तुरुंगात जाणे माझ्या नशिबात असेल, तर त्याचाही सामना करेन."

किंगफिशर एअरलाइन्सच्या आर्थिक अडचणी जागतिक अर्थव्यवस्था ढासळल्यानंतर वाढत गेल्या. माल्या म्हणाले, तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांची भेट घेतली. मी प्रणव मुखर्जी यांच्याकडे गेलो आणि त्यांना सांगितले की किंगफिशर एअरलाइन्सचे ऑपरेशन्स कमी करावे लागतील, काही विमाने बंद करावी लागतील आणि कर्मचाऱ्यांना कमी करावे लागेल. कारण मला एवढे खर्च परवडणार नाहीत. मात्र हा प्रस्ताव नाकारण्यात आला. मला सांगण्यात आले की, ऑपरेशन कमी करू नका. तुम्ही काम सुरूच ठेवा, बँका तुम्हाला सहकार्य करतील.

माल्यांनी १७ बँकांकडून एकूण ६२०३ कोटींचे कर्ज घेतले. मात्र त्यांचा दावा आहे की बँकांनी त्यांच्या संपत्तीतून १४१३१.६ कोटी रुपये वसूल केले.

» पान ७ वर

# एका क्लिकवर मिळणार जात प्रमाणपत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जात प्रमाणपत्र किंवा जातवैधता प्रमाणपत्रासाठी शासकीय कार्यालयांचे चकरा, वेळखाऊ प्रक्रिया, आणि कागदपत्रांची डोंगराएवढी झळती यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे अक्षरशः नाकीनऊ होते. मात्र, हे चित्र लवकरच बदलणार आहे. कारण, महाराष्ट्र सरकारने जात प्रमाणपत्र ऑनलाइन प्रणालीसाठी हिरवा कंदील दिला असून, लवकरच ही सुविधा प्रत्यक्षात येणार आहे.

राज्य सरकारने मान्यता दिलेल्या या नव्या संगणकीकृत प्रणालीतून अर्जदार एका क्लिकवर जात प्रमाणपत्र मिळवू शकणार आहे. ही प्रणाली पारदर्शक, जलद आणि अत्याधुनिक असेल. यासाठी बार्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण

» पान ७ वर

# बँकेतील ग्राहकांच्या एफडी मधील ४.५८ कोटी उडवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोटा :** बँकेत ठेवलेले पैसे सुरक्षित असतील, असा प्रत्येक ग्राहकाचा विश्वास असतो. मात्र राजस्थानातील कोटा येथील आयसीआयसीआय बँकेतील एका महिला अधिकाऱ्याने ग्राहकांच्या या विश्वासाचा घोर गैरफायदा घेत, तब्बल ४.५८ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. साक्षी गुप्ता असे या महिला अधिकाऱ्याचे नाव आहे. ती आयसीआयसीआय बँकेत रिलेशनशिप मॅनेजर पदावर कार्यरत होती. तिला पपोलिसांनी अटक केली आहे.

बँकेतील विविध एफडीमधून तिने सुमारे ४१ खात्यांमधून हे पैसे परस्पर काढले. आणि ते शेअर बाजारात लावले. पण त्यातही तिचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

पोलिसांच्या तपासानुसार, २०२० ते २०२३ या कालावधीत साक्षी गुप्ता हीने 'यूजर एफडी लिंक'चा गैरवापर करून ४१ ग्राहकांच्या ११० खात्यांतून हे पैसे परस्पर काढले. या रकमेस शेअर बाजारात गुंतवणूक करून मोठा नफा मिळवण्याचा तिचा हेतू होता. मात्र, शेअर बाजारात मोठे नुकसान झाल्यानंतर ती ही रक्कम परत करू शकली नाही. साक्षी गुप्ताने फसवणुकीसाठी ग्राहकांच्या खात्यांशी संलग्न मोबाईल क्रमांक बदलले व त्याऐवजी आपल्या कुटुंबातील सदस्यांचे नंबर जोडले. त्यामुळे मूळ खातेधारकांना व्यवहाराबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही.

» पान ७ वर

# राज्यात अतिवृष्टीचा धोका

## पुन्हा पावसाचा जोर वाढणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ५ जूनपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून सध्या काही भागात पाऊस पडत आहे, तर काही भागात पावसाने उगडीप दिली आहे. गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दरम्यान, अशातच राज्यातील २६ जिल्हांना यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. शुक्रवारी वादळी वारे, विजा आणि मध्यम पर्जन्याची शक्यता आहे.

» पान ७ वर

### कोणकोणत्या जिल्ह्यांत पाऊस?

- **कोकण विभाग**
- ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी
- हलका ते मध्यम पाऊस.
- **पश्चिम महाराष्ट्र**
- पुणे, सातारा, सांगली, सोलापूर
- घाटभागात वाढलेला पर्जन्य अंदाज.
- **मराठवाडा व विदर्भ**
- नाशिक, धुळे, जळगाव, अमरावती, नागपूर, वर्धा
- विजेसह मध्यम पाऊस, वा-याचा वेग ३० ते ५० किमी/तास.
- **अलर्ट नसलेले जिल्हे**
- गोंदिया, भंडारा, नंदुरबार, लातूर – कोरडे हवामान.
- ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार

# शिवराज्याभिषेक दिनी ५१ फूट शिवशक राजदंड स्वराज्यगुढी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवस्वराज्य दिन चिरायू होवो.. शिवराज्याभिषेक दिन चिरायू होवो... जय भवानी जय शिवाजी... छत्रपती शिवाजी महाराज की जय... अशा गगनभेदी जयघोषात, रणशिंगाच्या ललकारीत, मर्दानी खेळाच्या चित्तथरारात आणि ढोल ताशाच्या गजरात एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील शिवरायांच्या विश्वातील पहिल्या भव्य अश्वारुढ स्मारकाचा आणि विश्वातील पहिल्या शिवराज्याभिषेक शिल्पाचा परिसर हजारो शिवभक्तांनी दणाणून सोडला. यावेळी शिवजयंती महोत्सव समिती पुणे तर्फे रयतेच्या "सार्वजनिक



शिवस्वराज्य दिन" सोहळ्या निमित्त भगव्या स्वराज्यध्वजा सह ५१ फूट शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारण्यात आली.

सोहळ्याचे हे सलग १३ वे वर्षे होते. यावेळी रिंकल अमित गायकवाड, ललिता रवींद्र कंक, अश्विनी शंकर कडू, वृषाली सुनील जगताप, शोभा भोई, दिपाली विशाल गव्हाणे, जोस्ना निलेश जगताप, अश्विनी दरेकर तसेच उपस्थित महिलांच्या व शिवांश सुभाष जागडे यांच्या हस्ते भगव्या स्वराज्यध्वजा सह शिवशक राजदंड स्वराज्यगुढीचे विधीवत पूजन करुन ५१ फूट स्वराज्यगुढी उभारण्यात आली. शिवकालीन सरदारांचे वंशज, सार्वजनिक शिवस्वराज्य दिनाचे प्रवर्तक समितीचे

> शिवराज्याभिषेक दिन भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारा अतिशय महत्वाचा दिवस आहे. शिवजयंती प्रमाणे शिवराज्याभिषेक दिन ६ जून हा सार्वजनिक शिवस्वराज्य दिन वैश्विक साजरा व्हावा ह्या प्रेरणेतून ६ जून २०१३ ला शिवरायांच्या जिरेटोप, सुवर्णहोन, जगदंब तलवार, वाघनखे, शिवमुद्रा या पंच स्वराज्य चिन्हांनी अलंकृत भगव्या स्वराज्यध्वजा सह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी सर्वप्रथम दुर्गदुर्गेश्वर रायगड, लालमहाल, राजगड यासह असंख्य ठिकाणी उभारुन "सार्वजनिक शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली."
>
> — **अमित गायकवाड,** संस्थापक अध्यक्ष शिवराज्यदिन प्रवर्तक समिती

#रा

» पान ७ वर



## ‘बँकींग विषयावर राष्ट्रीय परिषदेचे उद्या आयोजन

**पुणे :** देशामध्ये फाईव्ह ट्रिलीयन इकॉनॉमी विकसीत करण्याच्या प्रक्रीयेतील सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांचे महत्त्व लक्षात घेऊन पुणे येथील अर्थ संवाद, सहकार भारती आणि ग्लोबल इंडियन ओरिजीन नेटवर्क यांच्यातर्फे रविवार दिनांक ८ जून २०२५ रोजी पुणे येथील शेरोटेन ग्रँड येथे सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत ‘बँकींग अँड एमएसएमई सेक्टर कनक्लेव्ह २०२५’ या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही राष्ट्रीय परिषद सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरणार आहे, अशी माहिती सहकार भारतीचे पुणे महानगर प्रमुख सीए दिनेश गांधी आणि सहकार भारती पुणे महानगरचे बँकींग प्रकोष्ट प्रमुख सीए डॉ. केतन जोगळेकर यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सहकार भारती, पुणे महानगर सह संघटन प्रमुख सीए अथर्व नवसारीकर, सहकार भारतीचे पुणे शहर प्रमुख गिरीष भवाळकर, ट्रान्सेंड डिस्कव्हरीजचे संचालक राजेश पुरूषोत्तम, मार्केटस् अँड मार्केट्स प्रा. लि.च्या फायनान्स विभागाच्या व्हाईस प्रेसिडेंट सीए अनघा जागडे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सहकार भारतीचे चेअरमन सीए दिनेश गांधी म्हणाले की, या परिषदेचे उद्घाटन रविवार दिनांक ८ जून रोजी सकाळी १०.३० वाजता भारत सरकारच्या सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग विभागाच्या राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय संचालक मंडळाचे सदस्य सतीश मराठे, फोर्स मोटर्सचे चेअरमन अभय फिरोदिया, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे चेअरमन विद्याधर अनास्कर, अप्लाईड इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी ग्रुपचे मानद चेअरमन राम भोगले, एमसीएचे संस्थापक व कार्यकारी भागीदार आणि ग्लोबल इंडियन ओरिजीन नेटवर्कचे संस्थापक सीए एस. व्यंकटेश आदी उपस्थित राहणार आहेत. ही परिषद विनामूल्य खुली असून त्यासाठी https://forms.gle/njWBipWoezELK9XAA या गुगल फॉर्मव्दारे नोंदणी करणे आवश्यक आहे. या परिषदेमध्ये सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी असलेल्या शासनाच्या आणि बँकांच्या योजनांविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.



## भारती विद्यापीठात नाट्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु

**पुणे :** संगीत, नृत्य आणि कीर्तन विषयांचे गुरुकुल पद्धतीने शिक्षण देणारे भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् हे एक अग्रगण्य महाविद्यालय असून भारतातील विविध प्रदेशांमधून तसेच भारताबाहेरील विविध देशांमधून देखील विद्यार्थी ह्या महाविद्यालयात प्रवेश घेतात. प्रमाणपत्र ते विद्या वाचस्पती (PhD) स्तरापर्यंतचे अभ्यासक्रम या महाविद्यालयात राबविले जातात. अभ्यासक्रमाचा दर्जा, शिक्षण देण्याची पद्धती, प्रात्यक्षिक विषयांवर असलेला भर, विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी वेळोवेळी मिळणारी संधी, ज्येष्ठ व तज्ञ गुरूंकडून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मिळणारे मार्गदर्शन अशी या महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांची नाट्यकलेविषयीची आवड व आग्रह लक्षात घेता भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् ने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नाट्यविषयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु केला आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी संचालक प्रा. शारंगधर साठे, किरण यज्ञोपवित, अमित वझे, प्रथमेश विवेकी उपस्थित होते. रंगभूमी, चित्रपट व मालिका अशा विविध माध्यमांमध्ये लागणाऱ्या तंत्रांचा या अभ्यासक्रमात समावेश आहे. नाट्य – चित्र क्षेत्रातील तज्ञ व प्रथितयश कलाकार व प्रशिक्षक मकरंद साठे, आनंद चाबूकस्वार, गजानन परांजपे, प्रवीण तरडे, प्रशांत दामले, उपेंद्र लिमये, किरण यज्ञोपवित, अनुपम बर्वे, अमित वझे, प्रथमेश विवेकी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

## सुखसागरनगरमध्ये ११ लाखांचे दागिने चोरी

**पुणे :** कोंढवा परिसरातील सुखसागरनगरमधील बंद सदनिकेतून चोरट्यांनी १० लाख ७५ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड चोरून नेली. ही घटना तीन जून रोजी घडली. फिर्यादी महिला (वय ५९, रा. कमल रेसिडेन्सी, सुखसागरनगर) त्यांच्या पतीसमवेत नातेवाइकाच्या अंत्यविधीसाठी गेल्या होत्या. त्यावेळी चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून कपाटातील दागिने चोरून नेले. चार जून रोजी घरी परतल्यानंतर हा प्रकार लक्षात आला. याबाबत त्यांनी कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## नऱ्हेतील घरफोडीत पाच लाखांचे दागिने लंपास

**पुणे :** नऱ्हे परिसरातील एका बंद सदनिकेतून चोरट्यांनी पाच लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नांदेडसिटी पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी (वय २३, रा. ओंकार इमारत, एशियन महाविद्यालयाजवळ, नऱ्हे) २७ मे रोजी सकाळी बाहेरगावी गेले होते. चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील बेडरूममधील कपाट उघडून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. फिर्यादी तीन जून रोजी सायंकाळी घरी परत आले. त्यावेळी घरफोडीचा प्रकार उघडकीस आला.

## सन्मान कतृत्त्वाचा...!



पुणे नवनिर्वाचित पुणे महानगरपालिका नवनिर्वाचित आयुक्त नवलकिशोर राम यांचे शिवसेना पुणे शहराचे वतीने सत्कार व स्वागत करण्यात आला; यावेळी शहर प्रमुख संजय मोरे व गजानन थरकुडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## महानगरपालिका आयुक्तांचा शिवसेनेतर्फे सत्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवनिर्वाचित पुणे महानगरपालिका नवनिर्वाचित आयुक्त नवलकिशोर राम यांचे शिवसेना पुणे शहराचे वतीने सत्कार व स्वागत करण्यात आले. पुर्वी पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी चांगले काम केले याची आठवण शहरप्रमुख संजय मोरे यांनी काढून पुणे महानगरपालिकेत देखील आपल्याकडून चांगले काम व्हावे. सर्वसामान्य नागरिकांची कामे व्हावीत. अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

पुणे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, मनपा गटनेते पृथ्वीराज सुतार, अशोक हरणावळ, विजय देशमुख, उपशहरप्रमुख आबा निकम, उमेश वाघ, नितीन गावडे, अनंत घरत, युवासेना शहर अधिकारी राम थरकुडे, युवराज पारिख, प्रविण डोंगरे, राजेश मोरे, चंदन साळुंके, संदिप गायकवाड, अजय परदेशी, अमर मारटकर, गिरीश गायकवाड, वैभव दिघे, सोनू पाटील, अंकित अहिरे, रमेश परदेशी, शशिकांत साटोटे, मल्हार भोसले, जुबेर शेख, रोहिणी कोल्हाळ, पद्मा सोरटे उपस्थित होते.

# महिलांना ‘निर्भय सुरक्षा’...

पुण्यात गेल्या काही महिन्यांपासून महिला सुरक्षेचे प्रश्न गंभीर होत चालले आहेत. स्वारगेट बसस्थानकातील अत्याचार प्रकरण आणि वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण यांसारख्या घटनांमुळे शहरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सार्वजनिक वाहतूक वापरणाऱ्या महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर पुणे शहर पोलिसांनी पीएमपीएमएल (पुणे महानगर परिवहन महामंडळ) यांच्या सहकार्याने विशेष सुरक्षा मोहिम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत पीएमपी बससेवेतील महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलीस अधिकाऱ्यांचे पथक नेमले गेले असून, बसमधूनच गस्त केली जात आहे. त्यामुळे महिला प्रवाशी अधिक ‘निर्भय’ पणे प्रवास करु शकणार आहेत.

## बसमध्ये पोलीसांचा खडा पहारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** या विशेष पथकात ४ पोलीस अधिकारी आणि २२ पोलीस कर्मचारी यांचा समावेश आहे. हे अधिकारी गर्दीच्या वेळेत – म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी – प्रमुख मार्गांवर आणि बसस्थानकांमध्ये उपस्थित राहणार असून, कोणताही अनुचित प्रकार घडल्यास तात्काळ कारवाई करणार आहेत. ही मोहिम अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात आहे.

पीएमपीएमएलमार्फत पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए कार्यक्षेत्रात दररोज सुमारे ३८१ मार्गांवर २०,११२ फेऱ्या घेतल्या जातात. यामध्ये १० ते ११ लाख प्रवासी बससेवेचा वापर करतात, त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर महिलांचा सहभाग असतो. विशेषतः नोकरी करणाऱ्या महिला आणि विद्यार्थीनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून असतात.


मात्र, गेल्या काही काळात बसमध्ये किंवा बीआरटी स्थानकांवर महिलांना छेडछाड, अश्लील शेरेबाजी, मोबाइल चोरी किंवा अश्लील मजकूर दाखवण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे अनेक महिला प्रवास करताना असुरक्षिततेची भावना व्यक्त करत आहेत.

फेब्रुवारी महिन्यात स्वारगेट बसस्थानकात २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. पहाटेच्या वेळी ती गावी जाण्यासाठी आली असताना, तिची फसवणूक करून बंद गाडीत बसवून अत्याचार करण्यात आला. आरोपी दत्ता गाडे याला ७५ तासांच्या आत अटक करण्यात आली, मात्र ही घटना शहराच्या मध्यवर्ती आणि सतत गजबजलेल्या भागात घडल्याने प्रशासनावर दबाव वाढला होता. पोलीस विभागाने त्या वेळी श्वानपथक, ड्रोन आणि मोठ्या प्रमाणावर कर्मचारी तैनात करून शोधमोहीम राबवली होती. या घटनेने महिला सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले.

> कामानिमित्त पीएमपी बसमधून अथवा अन्य वाहनातून प्रवास करत असलेल्या महिलांची संख्या लक्षणीय आहे; त्याचाच गैरफायदा घेऊन काही समाजकंटक विघातक कृत्य करत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन महिलांना अधिक सुरक्षा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पोलीसांनी घेतला आहे; विशेष म्हणजे त्यामध्ये सातत्य ठेवण्यात येणार आहे. **-अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे

### पोलिसांचा समन्वय, महिलांसाठी आश्वासक पाऊल...

● महिला सुरक्षेच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही मोहिम पीएमपीएमएल व पोलीस विभाग यांच्यातील समन्वयाचे उत्तम उदाहरण ठरते. महिलांना सुरक्षित आणि निर्भय वातावरणात प्रवास करता यावा, यासाठी या मोहिमेला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## कॅप फेरीची गुणवत्ता यादी १० जून रोजी जाहीर होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत राज्यातील १२ लाख ७१ हजार २९५ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. पहिल्या प्रवेश फेरीअंतर्गत नोंदणी करून अर्ज भरण्यासाठी मुदत गुरुवारी (दि.५) संपली आहे. कॅप फेरीची गुणवत्ता यादी १० जून रोजी जाहीर होणार आहे.

राज्यातील अकरावी प्रवेशासाठी ९ हजार ४३५ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केली असून, एकूण प्रवेश क्षमता २१ लाख २३ हजार ४० आहे. त्यापैकी कॅप फेरीसाठी प्रवेश क्षमता १८ लाख ९७ हजार ५२६, तसेच कोटा प्रवेश क्षमता २ लाख २५ हजार ५१४ इतकी आहे. राज्यभरातून १२ लाख १५ हजार १९० विद्यार्थ्यांनी नोंदणी (रजिस्ट्रेशन) शुल्क जमा केले आहे.

नियमित फेरी (कॅप राउंड) साठी ११ लाख २९ हजार ९३२, इनहाउस कोट्यासाठी ६४ हजार २३८, व्यवस्थापन (मॅनेजमेंट) कोट्यासाठी ३२ हजार ७२१,



अल्पसंख्याक (मायनॉरिटी) ४७ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. कोटाअंतर्गतच्या प्रवेशाच्या शून्य फेरीची गुणवत्ता यादी ८ जून रोजी जाहीर होऊन ९ जून ते ११ जून या कालावधीत प्रत्यक्ष प्रवेश होतील. कॅप फेरीची गुणवत्ता यादी १० जूनला जाहीर होऊन ११ जून ते १८ जून यादरम्यान प्रवेश होतील, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी दिली आहे.

### पुणे विभागाचा जिल्हानिहाय प्रवेशाबाबत तपशील

- जिल्हा – विद्यार्थी नोंदणी – अर्ज भाग १ भरला – अर्ज भाग २ भरला
- पुणे – ११९८५३ -११५४१६ -१०५५५३
- अहिल्यानगर – ५२२३२ – ५१४१३ – ४९५१७
- सोलापूर – ४७०६९- ४६०४३-४३६३१
- एकूण – २१९१५४ – २१२८७२ -१९८७०१

## प्रताप विविध वि. का. सोसायटीच्या चेअरमनपदी शिंदे

**वाघोली :** प्रताप विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी सदगुरू दौलतबाबा मठाचे गादी चालक हभप.दिलीप महाराज शिंदे तर व्हॉईस चेअरमन पदी शिंदेवाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय बोंद्रे यांची बिनविरोध निवड पार पडली.

पुणे हवेली कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रकाश जगताप,यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप,शिंदेवाडीचे सरपंच संदीप जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली चेअरमन व व्हॉईस चेअरमन पदाच्या बिनविरोध निवडी पार पडल्या.

याप्रसंगी संचालक कैलास हबुराव शिंदे,हरिभाऊ शिंदे,शिध्देश्वर शिंदे,शिवजी शिंदे,रामदास जगताप,भाऊसाहेब सुल,बाप्पू पटोले,पारुबाई लवांडे,शालूबाई शिंदे,मंगलबाई शिंदे,माजी सरपंच बाप्पूराव शिंदे,कनिफनाथ सोसायटीचे चेअरमन नवनाथ जगताप,माजी उपसरपंच मोहन शिंदे,अशोक जगताप,शांताराम साहेबराव शिंदे,एकनाथ शिंदे,नामदेव मेमाने तसेच शिंदेवाड़ी गावचे विविध पदाधिकारी,तरुण वर्ग,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांचा सत्कार पुणे, हवेली कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा संचालक प्रकाश जगताप, यशवंत सहकारीचे चेअरमन सुभाष जगताप,शिंदेवाड़ीचे विद्यमान सरपंच संदीप जगताप यांच्या हस्ते पार पडला.



पुणे प्रताप विविध विकास सोसायटीच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल हभप.दिलीप महाराज शिंदे यांचा पुणे हवेली कृषि उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा संचालक प्रकाश जगताप,यशवंत सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन सुभाष जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# बैलगाडी, सायकल आणि घोड्यांची रपेट...!



पीएमपीएमएल तिकिट दरवाढीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी घोडागाडी आणि घोड्यावरुन प्रवास करुन प्रशासनाचा अनोख्या पद्धतीने निषेध केला.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल)ने १ जून पासून लागू केलेल्या तिकीट दरवाढीविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, या निर्णयाला विरोध दर्शवत राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार गटाच्या वतीने पुणे महापालिकेच्या आवारात एक अनोखे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात बैलगाडी, सायकल आणि घोड्यांचा वापर करून निषेध व्यक्त करण्यात आला.

पीएमपीएमएलने अलीकडेच बसच्या तिकिटांचे दर वाढवले असून, या दरवाढीमुळे रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगार, विद्यार्थी, महिला आणि सर्वसामान्य प्रवाशांवर आर्थिक भार वाढला आहे. त्यामुळे या दरवाढीविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरवाढ रद्द करण्याची मागणी जोर धरत असताना राष्ट्रवादी शरद पवार गटाने प्रत्यक्ष कृतीद्वारे आपला विरोध नोंदवला.

महापालिकेच्या आवारात आंदोलनकर्ते बैलगाडीतून, सायकलवरून आणि घोड्यावर स्वार होऊन आले. यावेळी "तिकीट दरवाढ रद्द झालीच पाहिजे", "पुणेकरांचा प्रवास परवडणारा ठेवा", अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी ज्येष्ठ नेते माजी आमदार जयदेवराव गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष रवींद्र माळवदकर, उदय महाले, निलेश निकम, श्रीकांत पाटील, औदुंबर खुणे पाटील, रोहन गायकवाड, योगेश पवार, वसुंधरा निर्भवणे, सुवर्णा सावर्डे, आशा साने, सुवर्णा माने, स्वाती पोकळे, वैशाली थोपटे, प्रभावती भूमकर, किशोर कांबळे, आनंद सवाणे, पोपटराव खेडेकर, वैजनाथ वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> पीएमपीएमएल बस ही पुण्याची जीवनवाहिनी आहे. दररोज लक्षावधी पुणेकर बसप्रवास करीत असतात. परंतु, प्रशासनाने बससेवा ही मूलभूत सेवा असून, ती कल्याणकारी भावनेने राबविण्याऐवजी मनमानी कारभार करीत भरमसाठ दरवाढ केली आहे. त्याचा फटका सर्वसामान्य पुणेकरांना बसत आहे. त्यामुळे, ही दरवाढ त्वरित रद्द करावी व तत्काळ जुनेच दर लागू करावेत. **— प्रशांत जगताप,** शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)



## 'गंगाधर स्वरोत्सव युव-रंग' आजपासून

**पुणे :** शास्त्रीय गायन व वादनाचा मिलाफ असलेल्या 'गंगाधर स्वरोत्सव युव-रंग' मैफलीचे येत्या शनिवार (ता. ७) व रविवार (ता. ८) या दोन दिवशी आयोजन केले आहे. स्वरनिनाद संस्थेच्या वतीने फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या (एफटीआयआय) सभागृहात पुणेकर रसिकांसाठी ही संगीत-गायन पर्वणी विनामूल्य आयोजिली आहे. कार्यक्रमात शरयू दाते, एस. आकाश, अथर्व वैरागकर, अनुभव खामरु, अमन वरखेडकर, इशा नानल, स्वरा, सारा, स्पृहा, इशिता, इशल, युवान हे युवा कलाकार सादरीकरण करणार आहेत. तर आशय कुलकर्णी, अभिनय खंदे, कार्तिकस्वामी माधव लिमये, यशद गायकी, आशिष बेहरे व निषाद जोशी यांची साथसंगत लाभणार आहे, अशी माहिती स्वरनिनाद संस्थेच्या वृषाली निसळ यांनी दिली. प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. अमोल निसळ यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम होत आहे. स्वरनिनाद संस्थेच्या माध्यमातून दहाहून अधिक वर्षे शास्त्रीय संगीताची सेवा केली जात आहे. गंगाधर स्वरोत्सव, युवरंग यासह इतर अनेक कार्यक्रमांचे आयोजन संस्थेतर्फे केले जात आहे. संगीतसेवेचा हा यज्ञ यापुढेही असाच चालू राहणार आहे, असे वृषाली निसळ म्हणाल्या.

## 'एलजीबीटीक्यू+' समुदायाच्या पुणे प्राइड वॉकला पाठिंबा

**पुणे :** एलजीबीटीक्यू+ समुदायाच्या हक्कांसाठी सातत्याने काम करणाऱ्या कनेक्टिंग ट्रस्ट, पुणे या संस्थेने यंदाच्या १३ व्या पुणे प्राइड वॉकला पाठिंबा दिला आहे. युतक चॅरिटेबल ट्रस्टच्या पुढाकाराने हा वॉक शनिवारी (ता. ८) दुपारी ४.३० ते ६.३० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. या वॉकची सुरुवात बाजीराव रस्त्यावरील अभिनव कला महाविद्यालय चौकातून होणार आहे. कनेक्टिंग ट्रस्ट यंदा स्थापनेच्या २०व्या वर्षात पदार्पण करत असून, त्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी प्राइड वॉकला व त्याआधी होणाऱ्या प्री-प्राइड सांस्कृतिक कार्यक्रमाला पाठिंबा दिला आहे. हा कार्यक्रम ७ जून रोजी कोहिनूर मंगल कार्यालय, कर्वे रस्त्यावर, आबासाहेब गरवारे कॉलेजसमोर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात नृत्य, संगीत, कविता, नाटक, ओपन माईक आणि समुदायातील सदस्य व सहयोगी सहभागी होणारी पॅनेल चर्चा होणार आहे. या चर्चेत कनेक्टिंग ट्रस्टच्या सीईओ प्रणिता मडकईकर यांचा देखील सहभाग असेल. मानसिक आरोग्य व आत्महत्येच्या विचारांपासून समुदायाला आधार देण्यासाठी कनेक्टिंग ट्रस्ट गेली दोन दशके कार्यरत आहे. हेल्पलाइन, ईमेल सेवा, 'लिसनिंग सर्कल्स'च्या माध्यमातून ते एलजीबीटीक्यू+ समुदायासाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि समंजस संवादाचे व्यासपीठ उपलब्ध करून देतात. ही संस्था स्वयंसेवकांमार्फत कार्यरत असून, सर्व स्वयंसेवकांना एलजीबीटीक्यू+ समुदायासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच distressmailsconnecting@gmail.com ईमेलवर संपर्क साधता येईल.




## अनैसर्गिक संबधातून खून; एकास अटक

**पुणे :** मंडई मेट्रो स्टेशन परिसरात मोकळ्या जागेत एका ५० ते ५५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. पोलिसांनी पाहणी केली असता त्याच्या गळ्यावर वारकरून खून करण्यात आल्याचे समोर आले होते. या प्रकरणी एका २१ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली आहे. खून केल्यानंतर आरोपी पुण्याबाहेर पळून गेला होता. पोलिसांचे पथक त्याच्या मागावर होते. अखेर तो पोलिसांच्या जाळ्यात सापडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खून झालेल्या व्यक्तीची ओळख पटू शकलेली नसून, त्याबाबत पोलिसांकडून तपास सुरू मात्र या खून प्रकरणी रमेश प्रकाश सत्रे (२१) याला अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आणि बातमीदारामार्फत माहिती नुसार, रमेश सत्रे नावाच्या व्यक्तीने हा खून केला आहे. त्यानूसार रमेशचा शोध सुरू केला.

## निलेश चव्हाणच्या शस्त्रपरवाना चौकशीसाठी समिती

**पुणे :** वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील आरोपी निलेश चव्हाणला २०२२ मध्ये दिलेला शस्त्रपरवाना कसा मिळाला याचा सखोल तपास करण्यासाठी पुणे पोलिस आयुक्तालयात समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करेल. चव्हाणवर वारजे पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल असताना, तरीही त्याला शस्त्रपरवाना मंजूर करण्यात आल्याने प्रश्न निर्माण झाले आहेत. पुणे पोलिसांनी सुरुवातीला त्याचा शस्त्रपरवाना नाकारला होता. मात्र, नकार दिल्यानंतर चव्हाणने मंत्रालयात अपील केली होती. या अपील प्रक्रियेत मंत्रालयाकडून उपसचिव किंवा गृहराज्यमंत्री यांच्या पातळीवर सुनावणी होऊन निर्णय दिला जातो. गृहमंत्रालयाकडून पुणे पोलिस आयुक्तालयाला अर्जाच्या पार्श्वभूमीवर निलेश चव्हाणसंबंधी माहिती मागवण्यात आली होती. यामध्ये त्याच्यावर काही गुन्हे दाखल आहेत का, याची चौकशी करण्यासाठी वारजे पोलिसांकडूनही माहिती विचारण्यात आली. मात्र, गंभीर गुन्हा असूनही संबंधित पोलिसांनी ही माहिती लपवली, असा गंभीर आरोप समितीच्या तपासात समोर आला आहे.

# सिंहगडावर 'वारा गाई गाणे'...!

## अतीक्रमणमुक्तीने गडाने घेतला मोकळा श्वास: निसर्गरम्य वातावणाने लाखो पर्यटक सुखावले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगडाच्या ऐतिहासिक वैभवाला बाधा ठरणाऱ्या अतिक्रमणावर प्रशासनाने निर्धाराने कारवाई करत सात दिवस सुरू असलेल्या व्यापक मोहिमेचा यशस्वी शेवट बुधवारी सायंकाळी झाला. त्यामुळे शहर जिल्ह्यासह राज्यभरातील लाखो शिवप्रेमींचे श्रद्धास्थान असलेला सिंहगड पर्यटकांसाठी खुला करण्यात आला; या गडावर प्रशासनाने अतीक्रमणाची धडक कारवाई केल्याने पर्यटकांना निसर्गाचा आनंद लुटता येणार असून गडावर आता 'वारा गाई गाणे' अशी साद अनुभवयाला मिळत आहे.

जिल्हाधिकारी, वन, पुरातत्व, महसूल आणि जिल्हा परिषद विभागांच्या संयुक्त प्रयत्नांतून सरकारी तसेच खासगी जमिनीवरील अनधिकृत बांधकामे हटविली, आणि सिंहगडाच्या जतन आणि संवर्धनासाठी सकारात्मक दिशेने निर्णायक पाऊल उचलण्यात आले आहे. राज्यातील सर्व गड-किल्ल्यांवरील अतिक्रमण ३१ मेपूर्वी हटवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता.

त्यानुसार जिल्ह्यात फक्त सिंहगडावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले होते. याची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी डुडी यांनी स्वतः पुढाकार घेतला. डॉ. यशवंत माने यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण काढण्यासाठी समिती केली. कारवाईपूर्वी संबंधितांना नोटिसा देऊन त्यांची बाजू ऐकून घेतली. परवाने आणि कागदपत्रांची तपासणीही पारदर्शकपणे झाली.

सिंहगड हा केवळ एक ऐतिहासिक किल्ला नाही, तर नरवीर तानाजी मालुसरे यांचे बलिदान आणि शिवपुत्र राजाराम महाराज यांच्या समाधी स्थळामुळे पावनभूमी मानला जातो. शहराच्या जवळ असल्यामुळे येथे वर्षभर पर्यटकांची वर्दळ असते. आल्हाददायक हवामान, निसर्गरम्य परिसर आणि स्थानिक खाद्यसंस्कृती यामुळे पर्यटक येथे आकर्षित होत होती.

अतिक्रमण कारवाई बांधकामे हटवण्यापुरती मर्यादित नाही, तर सिंहगडाच्या जतन व ऐतिहासिक संवर्धनासाठी महत्वाचा टप्पा ठरेल. भविष्यात गड अधिक सुशोभित, पर्यावरणपूरक, प्लास्टिक मुक्त आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले पर्यटनस्थळ होईल. अशी अपेक्षा शिवप्रेमी पर्यावरणवादी आणि पर्यटकांनी व्यक्त केली जात आहे.




### अशी झाली कारवाई

- वन, पुरातत्व, महसूल, जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा सहभाग
- यामध्ये, सरकारी व खासगी जागांवरील अनधिकृत टपऱ्या, स्टॉल्स, कच्ची-पक्की बांधकामे हटविली
- कारवाईत सुमारे १० हजार चौरस फुटापेक्षा जास्त जागेवरील अतिक्रमणे या सात दिवसात काढली
- गडकिल्ल्यांवरील ही मोठी कारवाई झाली
- सध्या गडावर राडारोडा आहे तो काढण्याचे काम पुढे सुरू राहणार आहे.
- गडावर यंत्रसामुग्री नेणे शक्य नसल्याने 'मानवी पद्धती' ने कारवाई
- परिणामी कारवाईला गती देण्याचा प्रयत्न

"गेल्या काही वर्षांच्या कालावधीत सिंहगडाला अतीक्रमणांचा विळखा पडला होता; त्याचा फटका गडावर येत असलेल्या पर्यटकांना बसत होता. त्याशिवाय गडाचेही सौदर्य नाहीसे होत चालले होते; त्याची दखल घेऊन ही अतीक्रमणे हटविण्यात आली असून यापुढील कालावधीत पुन्हा अतीक्रमणे होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येणार आहे.

-जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी पुणे

# 'सुखद' वातावरणाला रेल्वेचा 'साज'...!

## टीओडी स्पेशल ट्रेनमध्ये डब्यांची वाढ: पुणे-कोल्हापूर प्रवास आता आरामदायक

कोल्हापूरच्या हवेत एक वेगळाच दम आहे; याची देशातच नव्हे तर सातासमुद्रापारही चर्चा होत असते. विशेष म्हणजे कोल्हापूरच्या या दमदार हवेने अनेकांच्या तब्येतीत आणि आयुष्यातही आमूलाग्र बदल घडविले आहेत. त्याशिवाय कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन म्हणजे भाविक भक्तांसाठी एक प्रकारे पर्वणीच असते. पन्हाळा गड, ज्योतीबा, आदमापूरचे बाळू मामा ही पर्यटनाची ठिकाणे पर्यटकांसाठी खास आकर्षण आहेत. त्यामुळे या भागात पर्यटकांची नेहमीच रेलचेल असते. मात्र; याठिकाणी जाण्यासाठी भाविकांना आणि पर्यटकांना खास अशी सुविधा उपलब्ध नव्हती. त्याबाबत भाविकांनी आवाज उठविल्यानंतर रेल्वे प्रशासनाने आता त्याची दखल घेतली आहे. त्यानुसार रेल्वेच्या वातानुकुलित डब्यांची संख्या वाढविण्यात येणार आहे; त्यामुळे भाविकांचा प्रवास आता सुखकर आणि आरामदायी होण्यास मदत होणार आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मध्य रेल्वेच्या पुणे विभागाने पुणे आणि कोल्हापूर दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मोठा निर्णय घेतला आहे. प्रवाशांच्या वाढत्या संख्येची गरज ओळखून आणि प्रवास अधिक सुलभ व आरामदायक करण्याच्या उद्देशाने पुणे-कोल्हापूर टीओडी स्पेशल एक्सप्रेस (गाडी क्रमांक ०१०२३/०१०२४) या गाडीच्या कोच रचनेत कायमस्वरूपी वाढ करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक आसनांची उपलब्धता मिळणार असून, विशेषतः वातानुकूलित डब्यांची संख्या वाढवण्यात आल्यामुळे उन्हाळ्यासारख्या हंगामातही सुखद अनुभव मिळणार आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या गाडीला ४ एलएचबी डबे वाढवून एकूण १८ डब्यांची रचना करण्यात आली आहे. ही सुधारणा ४ जून २०२५ पासून कोल्हापूरहून सुटणाऱ्या गाडीवर (०१०२४) आणि ५ जून २०२५ पासून पुण्याहून सुटणाऱ्या गाडीवर (०१०२३) लागू होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना त्यांच्या प्रवासाचे नियोजन करताना या नव्या बदलाची नोंद घेण्याचे आवाहन केले आहे. ही सुधारणा केवळ आसन क्षमतेपुरती मर्यादित न राहता, प्रवासाचा दर्जा सुधारण्यासाठीही उपयुक्त ठरणार आहे. या निर्णयामुळे पुणे-कोल्हापूर प्रवास अधिक सुसह्य, सोयीस्कर आणि आरामदायक होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### मूळ कोच रचना (१४ एलएचबी डबे):

- १ गार्ड केबिनसह सीटिंग-कम-लगेज रेक
- १ जनरेटर-कम-लगेज कोच
- ४ जनरल सेकंड क्लास कोच
- ७ स्लीपर क्लास कोच
- १ एसी ३-टियर इकॉनॉमी कोच

### सुधारित कोच रचना (१८ एलएचबी डबे):

- १ गार्ड केबिनसह सीटिंग-कम-लगेज रेक
- १ जनरेटर कार
- ४ जनरल सेकंड क्लास कोच
- ७ स्लीपर क्लास कोच
- ४ एसी ३-टियर कोच (पूर्वी १ इकॉनॉमी एसी ३-टियर)
- १ एसी २-टियर कोच (नवीन समावेश)

# पुण्यात क्षमता; पण सिद्ध करण्याची आवश्यकता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** :"पुण्याचे देशभर नाव आहे. इंदौरपेक्षा पुण्याकडे अधिक क्षमता असूनही, शहर काही बाबतीत मागे का राहते, यावर विचार करण्याची वेळ आली आहे," असे मत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केले. "शहरात वाहतूक कोंडी, आरोग्य सुविधा, सार्वजनिक सेवा वेळेत न मिळणे, यासारख्या समस्यांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असतात. केंद्र व राज्य सरकारच्या धर्तीवर पुण्यासाठी स्वतंत्र स्वच्छता योजना राबवावी लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरात वाहतूक कोंडीचे प्रमुख कारण म्हणजे अनेक ठिकाणी 'मिसिंग लिंक' असलेली अपूर्ण रस्ते योजना. ती पूर्ण झाली, तर वाहतुकीचा बोजा कमी होईल, "शहरातील अतिक्रमण ही मोठी समस्या असून, ती हटवणे गरजेचे आहे. मात्र कारवाईनंतर पुन्हा अतिक्रमण होते, यावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्या लागतील."

पाणीपुरवठ्याबाबत त्यांनी सांगितले, "सध्या सुमारे ३० टक्के पुणेकरांना महापालिकेच्या पाणीपुरवठ्याचा लाभ मिळत नाही. पाणी गळती आणि चोरी यावर नियंत्रण मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील."

"आपण झाडे लावतो, पण ती जगली पाहिजेत यासाठी प्रयत्न व्हावेत. तसेच, देशात केरळनंतर पुण्यातच वेगवेगळ्या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण दिसते. कोरोनाच्या काळातही अशीच परिस्थिती होती. त्यामुळे पुण्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्याची आवश्यकता आहे," असे राम यांनी स्पष्ट केले.

"मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. शहरात समस्या असल्या तरी सकारात्मक इच्छाशक्तीने चांगले काम करणे शक्य आहे," असे सांगून त्यांनी संवादाचा शेवट केला.

"शहरात दररोज शंभर ठिकाणी कचरा टाकला जातो. तो उचलण्यात येतो, पण पुन्हा त्याच ठिकाणी कचरा साचतो, हे मला अजूनही समजलेले नाही," "इंदौर शहर देशात पहिल्या क्रमांकावर आहे. आम्ही दुसऱ्या क्रमांकावर असलो तरी चालेल, पण शहर स्वच्छ व्हायलाच हवे. सहा महिन्यात पुणे शहर कचरामुक्त करू, हा माझा संकल्प आहे.

— नवलकिशोर राम, महापालिका आयुक्त, पुणे

# तुकोबारायांचा पालखी सोहळा बोपोडीत अधिक काळ विसावणार

**पुणे :** पुण्यनगरीच्या प्रवेशद्वारावर असलेल्या उपनगरात भाविकांना दर्शनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून जगद्गुरु तुकाराम महाराज पालखीच्या बोपोडी येथील विसाव्याची वेळ वाढवावी, या माजी महापौर सुनिता वाडेकर यांच्या विनंतीला मान देऊन संत तुकाराम महाराज संस्थानाने तत्काळ ही वेळ २५ मिनिटे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे उपनगरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

भक्तिभाव, समर्पण आणि चैतन्याचे निधान असलेला पालखी सोहळा हा भाविकांसाठी आनंदाचा सोहळा असतो. पायी वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांबरोबरच पालखी ज्या ज्या ठिकाणी जाते त्या त्या ठिकाणचा परिसर भक्तिरंगात रंगून निघतो.

पुण्यात मुक्काम करणाऱ्या जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या बोपोडी येथील विसाव्याची वेळ अत्यल्प असल्याने पालखीच्या दर्शनाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अनेक भाविकांचा हिरमोड होत असे. त्यांची अडचण लक्षात घेऊन माजी उपमहापौर सुनीता वाडेकर यांनी विसाव्याची वेळ वाढवण्याची विनंती संस्थानाचे अध्यक्ष ह भ प जालिंदर महाराज मोरे यांच्याकडे केली. त्याला त्वरित प्रतिसाद देऊन ही वेळ २५ मिनिटांपर्यंत वाढवित असल्याची ग्वाही ह भ प मोरे महाराज यांनी दिली.



पुणे जगदगुरु तुकोबारायांचा पालखी सोहळा बोपोडीत अधिक काळ थांबावा, अशी विनंती माजी उपमहापौर सुनिता वाडेकर यांनी केली होती. संस्थानने त्यांची ही मागणी मान्य केली असून त्यानिमित्त संस्थानचे अध्यक्ष हभप. जालिंदर महाराज मोरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रिपाइचे प्रदेश संघटक सचिव परशुराम वाडेकर उपस्थित होते.

# पर्यटकांना शनिवारवाड्याचा भव्यदिव्य अनुभव देण्याचा प्रयत्न



केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी पुण्याचे वैभव, ऐतिहासिक वारसास्थळ असलेल्या शनिवारवाड्याला गजेंद्रसिंह शेखावत यांनी भेट देऊन पाहणी केली. राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने या भेटीचे आयोजन केले होते.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "मध्यकालीन भारताच्या इतिहासात योगदान असलेल्या शनिवारवाड्याचे स्थान महत्वाचे आहे. ही वास्तू पुण्याची, पेशवाईची ओळख आहे. दरवर्षी लाखो पर्यटक शनिवारवाड्याला भेट देतात. इथे येणाऱ्या पर्यटकांना शनिवारवाड्याचा भव्यदिव्य अनुभव देण्यासाठी पुरातत्व विभागाच्या नियमांच्या अधीन राहून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहे," असे प्रतिपादन केंद्रीय पर्यटन व सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी केले.

पुण्याचे वैभव, ऐतिहासिक वारसास्थळ असलेल्या शनिवारवाड्याला गजेंद्रसिंह शेखावत यांनी भेट देऊन पाहणी केली. राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या पुढाकाराने या भेटीचे आयोजन केले होते. प्रसंगी शेखावत यांच्या हस्ते बहुभाषिक स्मार्ट डिजिटल ऑडिओ गाईड ऍपचे उद्घाटन, तसेच, शनिवारवाड्याच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पुरातत्व विभागाच्या संचालक श्रीलक्ष्मी, पेशव्यांचे वंशज पुष्कर पेशवा, शनिवारवाडा संवर्धनासाठी कार्यरत किरण कलमदानी, उदय कुलकर्णी, पल्लवी गोखले, इतिहास अभ्यासक डॉ. गणेश राऊत आदी उपस्थित होते.

गजेंद्रसिंह शेखावत म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्यानंतर पेशवाई आणि पुण्याचे योगदान व त्याचा नावलौकिक देशभरात आहे. त्यामुळे ही केवळ एक ऐतिहासिक वास्तू नसून, समृद्ध इतिहासाचा अनमोल ठेवा आहे. पर्यटकांना येथील इतिहास सहजपणे समजून घेता यावा, पर्यटन अधिक सुकर व्हावे, यासाठी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्यासह इतर इतिहास अभ्यासकांनी व शनिवारवाडा संवर्धन कार्यात योगदान देणाऱ्या लोकांनी माझ्याकडे काही प्रस्ताव दिले आहेत.



"भारताच्या इतिहासात पुण्याला आणि शनिवारवाड्याला अनन्यसाधारण महत्व आहे. पेशवा बाजीराव यांच्यासह पेशवाईतील इतर अनेकांचा जाज्वल्य इतिहास येथे येणाऱ्या पर्यटकांना माहिती व्हावा, शनिवारवाड्याचे वैभव काय होते, हे प्रतिकृतीच्या माध्यमातून का होईना, पर्यटकांना दाखवण्यासाठी उभारण्याची गरज आहे.

— प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, खासदार राज्यसभा

# महापुरुषांची विचारधारा स्मरण्याची गरज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श व कर्तुत्वाची सर्वांनी आठवण ठेवून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांची विचारधारा स्मरण करून सर्वांनी पुढे गेले पाहिजे, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त जिल्हा परिषद येथे आयोजित कार्यक्रमात पवार यांच्या हस्ते 'शिवस्वराज्य' गुढीचे पूजन करून गुढी उभारण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, प्रकल्प संचालक शालिनी कडू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत खरात आदी उपस्थित होते.

पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विचार धारा सर्व जातीधर्माला न्याय देणारी असून सर्वांमध्ये जातीय सलोखा निर्माण करणारी आहे. ही विचारधारा राज्यातील, देशातील सर्वांमध्ये एकोपा ठेवणारी आहे या विचारांशिवाय आपण राज्य, देश पुढे नेऊ शकत नाही. या थोर महापुरुषांनी जी शिकवण आपल्या सर्वांना दिली आहे तिचे सर्वांनी सतत स्मरण करून पुढील वाटचाल केली पाहिजे.

काळात कोरोना सारखे संकट, आजार अचानक जगात व देशात आले त्या काळात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आपले जीवाभावाचे सहकारी आपल्याला सोडून गेले या संकटात जिल्हा परिषद मधील व त्यांच्याशी संबंधित असलेल्या ४२ अधिकारी,कर्मचाऱ्यांना स्वतःचा जीव गमवावा लागला या सर्वांची आठवण राहावी, यासाठी फलकाचे त्यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.


छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त जिल्हा परिषद येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते 'शिवस्वराज्य' गुढीचे पूजन करून गुढी उभारण्यात आली.

> शिवराज्याभिषेकच्या दिवशी त्याकाळी घराघरांवर गुढ्या उभारण्यात आल्या होत्या. त्यामुळे आज आनंदाचे प्रतीक म्हणून सर्वत्र गुढी उभारली जाते. शिवराज्याभिषेकाच्या दिवशी महाराष्ट्रात, देशात पहिल्यांदाच रयतेचे राज्य सुरू झाले, 'शिवस्वराज्य' स्थापन झाले. मराठी साम्राज्याला पहिले राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने मिळाले. मराठी राज्य स्थापना झाल्याचा हा दिवस सर्वांसाठी अभिमानाचा, स्वाभिमानाचा, आनंदाचा दिवस आहे. **-अजित पवार,** उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे जिल्हा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन साजरा



**पुणे :** युगप्रवर्तक, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, अखिल भारताचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५१ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास प्रभारी कुलसचिव सीएमए चारूशिला गायके, अधिष्ठाता प्रा.(डॉ) विजय खरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ.प्रभाकर देसाई, अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. विलास आढाव, जयकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. संजय देसले, बहि:शाल व ज्येष्ठ सहायत्ता कक्षाचे संचालक प्रा. डॉ. हरिश नवले,विद्यापीठ मुद्रणालयाचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय कुटे, शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, भारतीय कामगार सेनेचे अध्यक्ष बाळासाहेब आंत्रे, विविध कर्मचारी आणि विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## रायसोनी विद्यापीठात राज्याभिषेक सोहळा उत्साहात

● **पुणे:** जी. एच. रायसोनी इंटरनॅशनल स्किल टेक युनिव्हर्सिटी, पुणे येथे आज, शुक्रवार, ६ जून २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आणि नवोपक्रम विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या परिपत्रकानुसार आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात १०० हून अधिक विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

● या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश छत्रपती शिवाजी महाराजांच्या अतुलनीय नेतृत्वाची आणि गौरवशाली ऐतिहासिक वारशाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, तसेच त्यांच्यामध्ये अभिमानाची भावना रुजवणे हा होता. या सोहळ्याचे ऑनलाइन उदघाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडीओ लिंकद्वारे झाले. यावेळी कौशल्य विकास, रोजगार व नवोपक्रम मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. मंगलजी प्रभात लोढा, इनोआयपीस (INNOIPS), पुणेचे संस्थापक डॉ. राघवेंद्र भट आणि फिनोलेक्स जे पॉवर सिस्टिम्सचे टेंडरिंग एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर जयवंत मोरे, तसेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. यू. खरात, जितेंद्र मिश्रा, कर्नल अजित सिंघवी, डॉ. बाळासाहेब फुगटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

● या प्रसंगी शिवव्याख्याते जयवंत मोरे यांनी आपल्या भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीच्या विचारांचा आणि त्यांच्या अलौकिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. महाराजांनी स्वराज्याची स्थापना कशी केली, रयतेचे राज्य कसे निर्माण केले, आणि त्यांच्या प्रशासकीय धोरणांचे महत्त्व काय होते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. त्यांच्या भाषणांमुळे महाराजांच्या पराक्रमाला आणि त्यांच्या कार्याला एक नवा उजाळा मिळाला.



## पतीत पावन संघटनेच्या पाठपुराव्याला यश

**पुणे :** क्रांतीवीर सेना व पतित पावन संघटना,पुणे यांच्या पाठपुराव्याला यश लका सिनेमा समोरील अण्णाभाऊ साठे चौक नाम फलक गायब झाल्या नंतर सदरचा नाम फलक लावण्यात यावा याकरिता पुणे महानगर पालिकेला पाठपुरावा करण्यात आला यापाठपुराव्या नंतर महानगर पालिकेने सदर ठिकाणी तात्काळ नामफलक बसवला असून सदरच्या पाठपुराव्याला यश आले आहे. या वेळी प्रकाश धिंडले सुनील खंडाळे, क्रांतिवीर सेनेचे अध्यक्ष मनोज क्षिरसागर, पतित पावन संघटनेचे अध्यक्ष स्वप्निल नाईक, सविता खवळे, अक्षय ढावरे, तळजाई युवा फाउंडेशन चे अध्यक्ष निलेश खंडाळे, सुनील कांबळे, गणेश आवळे, दिनेश वाघमारे, तेजस साबळे, स्वाभिमानी युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांतराव गायकवाड,दुर्गेश व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यात 'ॲक्सेस कंट्रोल ग्रीड' यंत्रणा उभारणार

## एकनाथ शिंदे:आठ तासांत एक टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास शक्य

"राज्यातील कोणत्याही एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आठ तासांपेक्षा अधिक वेळ लागणार नाही, अशी यंत्रणा उभी करण्यासाठी 'ॲक्सेस कंट्रोल ग्रीड' राबवण्यात येणार आहे," अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्रेडाई पुणे या बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेच्या सर्वसाधारण सभेच्या आणि पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नवीन अध्यक्ष मनीष जैन यांनी मावळते अध्यक्ष रणजित नाईकनवरे यांच्याकडून पदभार स्वीकारला.

कार्यक्रमाला बांधकाम उद्योजक सतीश मगर, ललितकुमार जैन, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंग आणि मुख्य अभियंता प्रशांत वाघमारे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "बांधकाम क्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि महसूल निर्माण होतो. त्यामुळे या क्षेत्रातील अडचणी सोडविण्यास सरकारने प्राधान्य दिले आहे. सर्वंकष विकास नियंत्रण नियमावली (UDCPR) आणि नवीन गृहनिर्माण धोरणात आवश्यक ते बदल करण्याबाबत सरकार सकारात्मक आहे. बांधकाम व्यावसायिकांनी सूचनांची माहिती द्यावी."

> "पुण्यातील पाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, पुरनियंत्रण यांसारखे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मात्र पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या महापालिका आयुक्तांपासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत एक सक्षम प्रशासकीय टीम आहे. त्यांच्या माध्यमातून हे प्रश्न निश्चितच सोडवले जातील. **-एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

रस्त्यांच्या दर्जामुळे विकास वेग घेतो, हे सांगताना त्यांनी सांगितले, "मुंबई-पुणे महामार्ग, समृद्धी महामार्ग आणि मुंबईतील खड्डेमुक्ती यासाठी केलेल्या उपाययोजना हे त्याचे उत्तम उदाहरण आहेत. त्यामुळेच राज्यात 'ॲक्सेस कंट्रोल ग्रीड' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे."

"बांधकाम परवानग्यांशी संबंधित समस्या UDCPR मुळे कमी झाल्या आहेत. मात्र, अजूनही काही अडचणी आहेत. त्यामुळे टीडीआरसाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करणे, इमारतींच्या उंचीच्या मर्यादा मुंबई-ठाणेप्रमाणे ठरविणे, पीएमआरडीएचा विकास आराखडा अंतिम करणे, तसेच ग्रीन बिल्डिंग धोरणातील अडथळे दूर करणे यासंदर्भात लवकरच निर्णय घेतले जातील," असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

# ३० हजार विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी केली नाही नोंदणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अकरावीच्या प्रवेशासाठी राबवलेली ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया ५ जून २०२५ रोजी यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. पुणे विभागातील एकूण २,१९,१५४ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला आहे. मात्र, विभागातील अंदाजे ३० हजार विद्यार्थी अजूनही नोंदणी न करता राहिल्याची माहिती शिक्षण विभागाकडून मिळाली आहे.

यंदाच्या वर्षी पुणे विभागात दहावीची परीक्षा एकूण २,६३,१५४ विद्यार्थ्यांनी दिली, त्यापैकी २,४९,५०७ विद्यार्थी यशस्वी झाले. म्हणजेच, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ८८ टक्के विद्यार्थी अकरावी प्रवेशासाठी नोंदणीस आले असून, उर्वरित १२ टक्के विद्यार्थ्यांनी कदाचित इतर शिक्षण पर्यायांचा अवलंब केला असे समजते.

मुळात अकरावी प्रवेशासाठी ३ जून ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती; परंतु अल्पसंख्याक व इनहाउस कोटा संबंधी बदलांमुळे नोंदणीची मुदत ५ जूनपर्यंत वाढवण्यात आली. या वाढीव मुदतीत मोठ्या संख्येने विद्यार्थी नोंदणीसाठी पुढे आले.

पुणे विभागात तीन प्रमुख जिल्हे आहेत – पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर. याप्रमाणे, पुणे जिल्ह्यात १,१९,८५३, अहिल्यानगर जिल्ह्यात ५२,२३२ आणि सोलापूर जिल्ह्यात ४७,०६९ विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केली आहे.

अकरावी ही दहावीनंतरचा मुख्य शैक्षणिक मार्ग असला तरी अनेक विद्यार्थी आयटीआय, अभियांत्रिकी डिप्लोमा, व्होकेशनल कोर्सेस किंवा खासगी शिक्षण शाखांकडे वळत आहेत. त्यामुळे विभागात अंदाजे ३० हजार विद्यार्थी अकरावी प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत.

शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी या बदलत्या ट्रेंडकडे लक्ष देण्याची गरज अधोरेखित करत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन घेऊन उज्ज्वल भविष्यासाठी शैक्षणिक निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे.

## "शिकणारे पालक घडणारी मुलं" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

**पुणे :** सह्याद्री प्रकाशन, पुणे यांच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या "शिकणारे पालक घडणारी मुलं" या अस्मिता जोशी-राजे लिखित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, ८ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता मोंडकर सभागृह, एस. एम. जोशी फाउंडेशन, नवी पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात विधान परिषद उपसभापती मा. डॉ. नीलमताई गोऱ्हे यांची विशेष उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिरीषा साठे आणि मासिक 'जडण-घडण'चे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे हे देखील उपस्थित राहणार आहेत. या पुस्तकात आधुनिक पालकत्व, मानसिक आरोग्य, व मुलांच्या सर्वांगीण विकासावर सखोल विचार मांडण्यात आले आहेत. शिक्षण, आधुनिक पालकत्व आणि मुलांच्या सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन करणारे हे पुस्तक पालक व शिक्षकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे, असा विश्वास सह्याद्री प्रकाशनच्या संचालक स्मिता देशपांडे यांनी व्यक्त केला आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून वाचनप्रेमी, पालक आणि शिक्षकांनी या प्रसंगी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लग्नाच्या आमिषाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पुणे :** लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही १५ वर्षीय मुलगी गर्भवती राहिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिस ठाण्यात एका तरुणावर (वय १९, रा. कोथरूड) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार १७ मे ते जुलै २०२४ या कालावधीत घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी घरी एकटी होती. त्यावेळी त्याने तिला गोड बोलून लग्न करण्याचे आमिष दाखवले. घरी एकटीच असल्याचा गैरफायदा घेत तिच्याशी जबरदस्तीने वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यात अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिली. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीवर बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## मनसेतर्फे तुळशीच्या रोपांचे वाटप

**पुणे :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना पुणे शहर, मनसेचे पुणे शहर सचिव वसंत खुटवड, कार्यकारिणी सदस्य सारंग सराफ यांच्यातर्फे बाजीराव रस्त्यावरील, शनिपार चौकात ३१०० तुळशी व इतर वनौषधीरोपांचे तसेच 'पर्जन्यजल' या पर्यावरण विषयक पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे यंदा १६ वे वर्ष होते. या वेळी शहराध्यक्ष साईनाथ बाबर, सरचिटणीस गणेश सातपुते, प्रवक्ते योगेश खैरे, सुशीला नेटके, उपाध्यक्ष आशिष देवधर, शहर सचिव राम बोरकर, रवी सहाणे, रमेश जाधव, अजय कदम, सुनील कदम आदी उपस्थित होते.

# पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करा : संकर्षण कऱ्हाडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पर्धेच्या युगात शिक्षणाचे महत्त्व ओळखून स्वत:चे भवितव्य घडविण्यासाठी कठोर परिश्रमाला पर्याय नाही. शालेय शिक्षण घेत असताना पर्यावरण संवर्धनासाठीही प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या २५ व्या वर्धापन दिनाचे निमित्त साधून पर्यावरण दिन आणि शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत नाट्यनिर्माते सत्यजित धांडेकर यांच्यावतीने विविध शाळांमधील गरजू, होतकरू शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील व्हिआयपी कक्षात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी संकर्षण कऱ्हाडे बोलत होते.

याप्रसंगी मनसे प्रदेश सरचिटणीस किशोर शिंदे, नाट्य परिषद कार्यकारणी सदस्य गिरीश महाजन, नाट्यनिर्माते सत्यजित धांडेकर, समीर हंपी उपस्थित होते.

प्रस्ताविकात सत्यजित धांडेकर यांनी उपक्रमाविषयी माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पडद्यामागील कलाकार अक्षय जगताप, गणेश भोसले, केदार भालशंकर, बाळासाहेब धांडेकर, मदन गायधने यांनी मदत केली.


**पुणे** यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या २५ व्या वर्धापन दिनाचे निमित्त साधून पर्यावरण दिन आणि शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत नाट्यनिर्माते सत्यजित धांडेकर यांच्यावतीने विविध शाळांमधील गरजू, होतकरू शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# इंटरफेथ पीस गोल्ड मेडल' ने डॉ. राहुल कराड सन्मानित



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांना या वर्षी अमेरिकेतील वॉशिंगटन डीसी येथे आयआरएफ बिल्डर्स फोरम आणि रॉजर विल्यम्स आयआरएफ पुरस्कारांमध्ये प्रतिष्ठित २०२५ चा 'ग्लोबल बिझनेस अँड इंटरफेथ पीस गोल्ड मेडल' पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आंतरधार्मिक समाज, धार्मिक स्वातंत्र्य आणि शांततेसाठी समर्थन केल्याबद्दल एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांना या वर्षी अमेरिकेतील वॉशिंगटन डीसी येथे आयआरएफ बिल्डर्स फोरम आणि रॉजर विल्यम्स आयआरएफ पुरस्कारांमध्ये प्रतिष्ठित २०२५ चा 'ग्लोबल बिझनेस अँड इंटरफेथ पीस गोल्ड मेडल' पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

अमेरिकेतील रिलिजस लिबर्टी अँड बिझनेस फाउंडेशनच्या वतिने नुकतेच अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रूबियो यांच्या हस्ते डॉ.राहुल कराड यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी रिलिजस लिबर्टी अँड बिझनेस फाउंडेशनचे अध्यक्ष ब्रायन जे ग्रिम उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले " सकारात्मक शांततेच्या तत्वांवर बांधलेला समाज लोकांना आधार देतो आणि भविष्यातील संकटांविरूद्ध लढण्याची ताकद देतो.अशा वेळेस उज्वल भविष्याच्या शोधात शांती, ज्ञानाच्या देवाणघेवाण आणि मानव कल्याणासाठी सर्वांनी मिळून कार्य करावे. हा पुरस्कार स्विकारतांना खूप मोठी जबाबदारी पडली आहे."

"विद्यार्थ्यांना वैश्विक नागरिक बनविण्यासाठी डब्ल्यूपीयूत पीस स्टडीचा समावेश केला आहे. यातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शैक्षणिक अनुभव प्रदान करणे, संवाद साधणे, रचनात्मक, शांततापूर्ण उपयांसाठी कार्य करणे आणि ज्ञान व कौशल्यांनी सुसज्य आहे.



> सकारात्मक शांततेच्या तत्वांवर बांधलेला समाज लोकांना आधार देतो आणि भविष्यातील संकटांविरूद्ध लढण्याची ताकद देतो. अशा वेळेस उज्वल भविष्याच्या शोधात शांती, ज्ञानाच्या देवाणघेवाण आणि मानव कल्याणासाठी सर्वांनी मिळून कार्य करावे. हा पुरस्कार स्विकारतांना खूप मोठी जबाबदारी पडली आहे."
> **— डॉ. राहुल कराड,** कार्याध्यक्ष एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी

# वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन जनजागृती



**पिंपरी :-** पिंपळे सौदागर येथील शिव छत्रपती लिनिअर अर्बन गार्डन येथे 'शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशन'ने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले. पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यांनी पर्यावरणाच्या संरक्षणाची गरज अधोरेखित केली आणि प्रत्येकाने वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केले.

## 'प्रहार अपंग क्रांती'चा सन्मान सोहळा उत्साहात

**पिंपरी :** महापालिका दिव्यांग भवन फाउंडेशनच्या आयोजित व 'पर्पल जल्लोष २०२५' हा दिव्यांगांचा महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडला. त्यानिमित्ताने प्रहार अपंग क्रांती आंदोलन शहराच्या वतीने आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, दिव्यांग भवन फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख म यांचा स्मृतिचिन्ह शाल व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. दिव्यांग भवन फाउंडेशनचे विभागीय संचालक व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महापालिका आयुक्त यांच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी सल्लागार विजय काणेकर, अभिजित मुरुगकर, नंदकुमार फुले, यांचाही सन्मान करण्यात आला.



## संस्कार प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण

**पिंपरी :** जुन्नर वनविभाग वनपरिक्षेत्र चाकण आणि संस्कार प्रतिष्ठान महाराष्ट्र, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने मेदनकरवाडी येथे वनजमिनीवर पाच हजार झाडांचे रोपण करण्यात आले. यामध्ये कांचन, बेहडा, आवळा, पिंपळ, सीताफळ, कवठ, कडुनिंब अशा विविध जातींच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये विविध संस्थांचे आणि कंपनीचे कर्मचारी सहभागी झाले होते. सुरुवातीला संस्कार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मोहन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष राजेंद्र फडतरे यांच्या हस्ते वृक्षाचे पूजन करण्यात आले. वन परिमंडळ अधिकारी पी. आर. अहिर, चाकण वनक्षेत्र अधिकारी संतोष कंक, सिनेअभिनेत्री आर्या घारे, वनअधिकारी रावसाहेब चौरे, चाकणचे पोलीस निरीक्षक टी. आर. घार्गे, सायली सुर्वे, संध्या स्वामी, विजय आगम, मनीषा आगम, सिद्धी ढेरे, कविता वाल्हे, पल्लवी नायक, स्तुती सोमवंशी, मीरा कदम यांनी सहभाग घेतला होता.



## ज्येष्ठ नागरिक संघाकडून वृक्षारोपणद्वारे वृक्ष संवर्धन संदेश

**पिंपरी :** "वृक्षसंवर्धनामुळे आत्मिक आनंद मिळतो" असे मत ज्येष्ठ पर्यावरण कार्यकर्ते विश्वास साळुंखे यांनी चिंचवड येथे व्यक्त केले. आनंद ज्येष्ठ नागरिक संघ आणि गोलांडे इस्टेट मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना विश्वास साळुंखे बोलत होते. सेवानिवृत्त महापालिका नगररचना उपसंचालक प्रभाकर नाळे, आनंद ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर खेडकर, कार्याध्यक्ष प्रिया जोशी, खजिनदार रवींद्र झेंडे, गोलांडे इस्टेट मित्रमंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे यांची प्रमुख उपस्थित होती.

विश्वास साळुंखे पुढे म्हणाले की, "सहा वर्षांपूर्वी घोरावडेश्वर डोंगरावर पहिल्यांदाच एका वटवृक्षाचे रोपण केल्यावर मनस्वी आनंद झाला. त्यानंतर दररोज पहाटे पाच वाजता घोरावडेश्वर परिसरात वृक्षांच्या सान्निध्यात विहार करण्याचा परिपाठ ठेवला आहे. दरम्यानच्या काळात वृक्षारोपण केलेल्या सुमारे पंचावन्न वृक्षांच्या सहवासामुळे दररोज आत्मिक आनंदाचा लाभ घेतो आहे" राजाभाऊ गोलांडे यांनी प्रास्ताविकातून, "सुमारे तेरा वर्षांपासून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त या परिसरात वृक्षारोपण करण्यात येत असून ज्येष्ठ नागरिक वृक्षसंवर्धनासाठी आवर्जून वेळ देतात. यावर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'वाळवंटांचे हरितकरण' या विषयावर काम करण्यात येणार आहे!" अशी माहिती दिली.

## पालिका करणार पर्यावरणपूरक सोसायट्यांचा सन्मान




**पिंपरी :** पर्यावरणपूरक उपाययोजना करणाऱ्या गृह प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने 'ग्रीन सोसायटी हा उपक्रम सुरू केला आहे. स्थानिक पातळीवर उपाययोजना राबवून नागरिकांमध्ये पर्यावरणाबद्दल जनजागृती वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश असून, हे पाऊल पर्यावरणस्नेही परिसर आणि जबाबदार नागरी जीवनशैली निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या उपक्रमांतर्गत सोसायट्यांचे मूल्यांकन करण्यासाठी काही प्रमुख निकष ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये ओला-सुका कचऱ्याचे वर्गीकरण करणे, सोसायटीमध्ये सेंद्रिय कचऱ्याचे कंपोस्टिंग करणे, सौरऊर्जेचा वापर करणे, पावसाचे पाणी साठवणे (रेन वॉटर हार्वेस्टिंग), आणि सांडपाण्याची शुद्धीकरण व पुनर्वापर यंत्रणा बसविणे. प्रत्येक निकष पूर्ण केल्यावर सोसायटीला एक ग्रीन स्टार दिला जाईल. सर्व निकष पूर्ण करणाऱ्या सोसायट्यांचा सन्मान महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते विशेष कार्यक्रमात केला जाईल.

# विविध नागरी समस्यांवर महत्त्वपूर्ण बैठक

## आमदार शंकर जगताप व आयुक्त शेखर सिंह यांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील नागरी समस्या, विकास प्रकल्प, वाहतूक आणि पायाभूत सुविधांसंदर्भातील अनेक मुद्द्यांवर आमदार शंकर जगताप आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यात विस्तृत चर्चा झाली. या बैठकीत महापालिकेच्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीस सहआयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपायुक्त मनोज लोणकर, पाणीपुरवठा व स्थापत्य विभागाचे प्रमुख अभियंता प्रमोद ओंबासे, सहशहर अभियंता देवअण्णा गट्टूवार व बापू गायकवाड, नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड, पर्यावरण विभागाचे प्रमुख अभियंता संजय



कुलकर्णी, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता मनोज शेटीया आणि स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांच्यासह संबंधित अधिकारी सहभागी झाले होते.

### अधिकाऱ्यांना सूचना

- या बैठकीत नागरी समस्यांवर त्वरित उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. आमदार शंकर जगताप यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना लवकरात लवकर प्रत्यक्षात आणण्याचा आग्रह धरला. तसेच नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने बैठका घेण्यात येतील.

### बैठकीत खालील प्रमुख मुद्द्यांवर चर्चा झाली:

- मोरया गोसावी मंदिरासमोरील दगडी रस्ता आणि पार्किंगची देखभाल व दुरुस्ती
- राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) ने महानगरपालिकेला ताथवडे पुनावळे वाकड परिसरातील सर्विस रस्त्याजवळील नाले कलव्हर्ट इत्यादी मोकळे व स्वच्छ करण्याबाबत केलेला पत्रव्यवहार. त्या दृष्टीने कारवाई करून पावसाळ्यात अंडरपास खाली जमणारे पाण्याचा निचरा करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत.
- रिलायन्स कंपनीतर्फे दुरुस्तीच्या नावाखाली शहरातील फुटपाथ व इतर ठिकाणी टाकण्यात आलेल्या केबल्समुळे महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसानाची चौकशी संदर्भात कारवाई
- महापालिका शिक्षकांच्या विविध मागण्या
- कल्पतरू पिंपळे गुरव, पी.के चौक पिंपळे सौदागर, काळेवाडी अंडरपास व एमएम चौक पूल संदर्भातील प्रश्न
- काळेवाडी चौकातील शिवसृष्टी ट्राफिक आयलंडचे काम सुरू करण्याचे नियोजन
- वृक्षारोपणासाठी प्राईड पर्पलला देण्यात आलेली जागा भाडेपट्टा करार रद्द करून ताब्यात घेणे.
- काळेवाडी एम एम चौक येथे ग्रेड सेपरेटर करणे
- काळेवाडीत 'लेफ्ट फ्री' मार्गांची अंमलबजावणी
- पशुसंवर्धन जागेत पार्क आणि रिव्हर फ्रंट रिझर्वेशन योजनेबाबत प्रगती
- पुनावळे येथे ऑक्सीजन पार्क
- नवविकसित गावांमध्ये पाण्याच्या टाक्यांसाठी आरक्षणाची पुनर्तपासणी
- भूमकर चौकात प्रत्यक्ष पाहणी करुन पुन्हा आढावा घेण्याचा निर्णय
- भूमकर चौकात ड्रेनेज लाईन टाकून दिल्यास वाहतुकीच्या दृष्टीने जागा ताब्यात येऊन वाहतूक समस्या सुटण्यास मदत होईल.
- मेट्रो प्रकल्पासाठी काळा खडक येथील जुना जकात नाका ते वाकड पोलीस चौकी पर्यंत रस्ते काम आणि अतिक्रमण हटवण्याची सूचना
- ताथवडे- पुनावळे रस्त्याच्या कामाची गती
- प्रारूप विकास आराखड्याचे भाषांतर मराठीत करण्याची मागणी
- एसटीपी कनेक्शन रद्द केल्यामुळे सोसायट्यांमध्ये निर्माण झालेला गोंधळ
- वाल्हेकरवाडी स्मशानभूमीच्या मेरी या संस्थेचे सर्वेक्षण अहवाल आला असून त्या अनुषंगाने कामाचा आढावा

# वाहतुकीतील अडथळा दूर; ट्रान्सफॉर्मरचे स्थलांतर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** देहू- आळंदी रस्त्यावर चिखली-पाटील नगर येथील अत्यंत रहदारीच्या ठिकाणी महावितरण प्रशासनाचा जुना ट्रान्सफॉर्मर होता. त्यामुळे रस्त्यात अडथळा निर्माण होवून वाहतूक कोंडीची समस्या नियमित भेडसावत होती. याची दखल घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महावितरणकडे ट्रान्सफॉर्मर स्थलांतरित करण्याची सूचना केली होती. या सूचनेनुसार, प्रशासनाने आज ट्रान्सफॉर्मर स्थलांतरीत करण्याची कार्यवाही केली.

देहू आळंदी रस्त्यावरील पाटीलनगर भाग अतिशय रहदारीचा आहे. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या सातत्याने निर्माण होत होती.

भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली- पाटीलनगर येथे देहू- आळंदी रस्त्यावर



वाहतुकीला अडथळा ठरणारा महावितरण प्रशासनाचा ट्रान्सफॉर्मर हटवण्याबाबत स्थानिक नागरिक, ग्रामस्थ यांनी मागणी केली होती. दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी महावितरण प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अखेर पाटील नगर येथील ट्रांसफार्मर स्थलांतरीत केला आहे. यावेळी माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विनायक मोरे यांच्यासह महापालिका व महावितरणचे संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



> चिखली आणि परिसरातील वाहतूक सक्षम करण्यासाठी महानगरपालिका विकास आराखड्यातील ७ डीपी रस्त्यांच्या कामांना आपण यापूर्वीच सुरूवात केली आहे. शहरातील " ४२ मिसिंग लिंक"चाही प्रश्न काही दिवसांत मार्गी लागणार आहे. सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना वाहतूक कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहोत. चिखली- पाटीलनगर परिसरातील वाहतुकीला अडथळा ठरणारा ट्रान्सफॉर्मर हटवण्याची मागणी होती. त्यानुसार कार्यवाही केली आहे. सर्वसामान्य नागरिकांना कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी आम्ही आग्रही आहोत.
>
> — **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे

# देहुगाव ते बोर्डाच्या हद्दीतील रस्त्याच्या पाहणीचा फार्स..

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**देहूगाव :** जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा अवघ्या चौदा दिवसांवर येऊन ठेपला आहे. देहूगावातील झेंडेमळा ते जुना पुणे-मुंबई महामार्ग या ३ किमीच्या पालखी मार्गावर पावलो पावली खड्डे पडले आहेत. साईटपट्टे गायब झाले आहेत, त्यांची जागा खड्ड्यांनी घेतली आहे. या खड्ड्यात पावसाचे पाणी साचले जात आहे.

अनेक ठिकाणी पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहत जाऊन ते अनेकांच्या घरात शिरते. तर, काही ठिकाणी अनावश्यक व नियमबाह्य गतिरोधक बसवण्यात आले आहेत. त्यामुळे वाहतूककोंडीचा मोठा प्रश्न



निर्माण होत आहे. हा भाग स्थानिक लष्करी प्राधिकरण यांच्या अखत्यारीत येत आहे. त्यामुळे या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात येणार आहे. याबाबत सर्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग यांनी या पालखी मार्गाचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याबाबत कॅन्टोन्मेंट बोर्ड देहूरोड व स्थानिक लष्करी प्राधिकरण यांच्याकडे १६ एप्रिल रोजी ना हरकत दाखला देण्यासाठी पत्र पाठविले होते.

आषाढी पायी वारी व कार्तिकी यात्रा आणि संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याप्रसंगी लाखो वारकरी, भाविक या मार्गावरुन जात येत असतात. जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यापूर्वी या रस्त्याची तात्पुरती डागडुजी करण्यात येणार असून, या संदर्भात सार्वजनिक बांधकामाचे कार्यकारी अभियंता आश्विनी पाटील यांनी रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली आहे.

- रस्त्यावरील खड्डे बुजवणे आणि रस्त्यावर पाणी साचू नये यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला चर घेणे, रस्त्याच्या दुतर्फा असलेले साईट पट्टे भरून घेणे तसेच चिंचोली येथील संत तुकाराम महाराज पादुका मंदिर या ठिकाणी असलेल्या मैदानाची साफसफाई करणे, अनावश्यक गतिरोधक काढण्यासाठी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करणे आदी कामे पालखी प्रस्थान सोहळ्यापूर्वी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार करण्यात येणार आहेत.

# कत्तलखाना हटवा; सांप्रदायिकता जपा

## कत्तलखाना विरोधात मोशी ग्रामस्थांची वज्रमूठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मोशी:** तिर्थक्षेत्र आळंदीच्या पंचक्रोशित, देहू-आळंदी रस्त्यालगत, मोशी आणि डुडुळगाव शिवेवर तसेच अयोध्येच्या प्रभू श्रीराम मंदिराचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद गिरी यांच्या आश्रमालगत होणारा नियोजित कत्तलखाना रद्द करावा या मागणीसाठी आता मोशी गावच्या सर्व नागरिकांनी वज्रमूठ केली आहे.

रविवारी, ८ जून रोजी याच विषयावर ठोस भूमिका घेण्यासाठी निषेध सभेचे आयोजन नागेश्वर महाराज मंदिरात केले आहे.



पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली आहे. शहरात सर्व धर्मीय लोक राहत असल्याने शहराला मिनी इंडिया म्हणून ओळखले जाते. शहराची गरज ओळखून तसेच, मागणी लक्षात घेऊन मोशी येथे कत्तलखान्याचे आरक्षण प्रस्तावित करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका शहर विकास आराखड्यात चार एकर जागेवर कत्तलखाना आणि शेजारीच दुसऱ्या चार एकर जागेवर जनावरांचे रुग्णालय असे आरक्षण टाकण्यात आले आहे. महाराष्ट्रातील तमाम वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या संत तुकाराम महारांजांचे देहू आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या आळंदीला जोडणाऱ्या रस्त्यावरच हा नियोजित अत्यंत आधुनिक पध्दतीचा कत्तलखाना होणार आहे.

विदेशात मांस निर्यात करणाऱ्या कंपनीकडे तो चालवायला द्याचे प्रस्तावित असल्याने रोज शेकडो जनावरांची कत्तल होणार आहे.

- त्या मागणीची दखल घेऊन महापालिकेने विकास योजना आराखड्यात मोशी येथे कत्तलखान्याचे प्रयोजन केले आहे. त्यासाठी १५ हजार ६०० चौरस मीटर क्षेत्रफळाची खासगी जागेत कत्तलखान्याचे आरक्षण टाकण्यात आले आहे. ती जागा मोशी सर्व्हे क्रमांक ३२५ पैकी या ठिकाणी आहे. जागा ताब्यात घेण्यासाठी १६ कोटी ६५ लाख रूपये आणि कत्तलखाना विकसित करण्यासाठी १७ लाख रूपये असे एकूण १७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे

आयुष्यभर शाकाहार जपणाऱ्या वारकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा हा प्रकार असल्याने महापालिका प्रशासक शेखर सिंह यांच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे.

कत्तलखाना आरक्षण रद्द करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, सनातन सह सर्व हिंदुत्ववादी संघटनांनी एल्गार पुकारला आहे. हिंदूंच्या भावनेशी खेळण्याचा हा संतापजनक प्रकार असल्याने त्या विरोधात प्रसंगी रस्त्यावर उतरण्याचा इशारा सर्वांनी दिला आहे. आ. महेश लांडगे यांच्या भोसरी विधानसभा मतदारसंघातच हा नियोजित कत्तलखाना होत असल्याने त्यांच्यावरही सर्वांची नाराजी आहे.

हे आरक्षण रद्द करण्यासाठी स्वतः स्वामी गोविंद गिरी यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संपर्क केला आहे. दोनच दिवसांपूर्वी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आळंदी भेटीत कत्तलखाना आळंदी जवळ होऊ देणार नाही, अशी ग्वाही सर्व वारकऱ्यांना दिली.

संपादकीय विशेष

# मृत्यूच्या तांडवात विजयाचा आनंद

डिबेंगळुरूत 'आरसीबी' संघाच्या सत्कार समारंभाच्या वेळी झालेली चेंगराचेंगरी राज्यकर्त्यांच्या, पोलिसांच्या आणि प्रशासनाच्या एकूण कारभारावर अनेक प्रश्न निर्माण करते. एखाद्या समारंभाला किती गर्दी होणार आहे आणि त्याचे नियोजन कसे करायला हवे, हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही जमत नाही आणि त्यातून बळी जातात, हे बेंगळुरूच्या घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. दीड तपापर्यंत ज्या चषकाची बेंगळुरूचा आरसीबी संघ वाट पाहत होता, त्यासाठी कसून प्रयत्न करत होता, तो विजय हाताशी आला. चषकही मिळाला; परंतु ज्या बेंगळुरूचा संघ होता, त्या बेंगळुरूत विजयोत्सव साजरा करताना गर्दीचा अंदाज न येऊन व्यवस्थापन कोलमडले. चेंगराचेंगरी होऊन त्यात ११ जणांचा बळी गेला. आणखी काही लोक मृत्यूशी झुंजत आहेत. असे सांगितले जात आहे, की स्टेडियमबाहेर मोठ्या संख्येने आरसीबी समर्थक जमले होते. गर्दीमुळे कार्यक्रम बदलला. ट्रॉफीसह विजयी परेड होणार होती; परंतु पोलिसांनी विजयी मिरवणूक काढण्यास विरोध केला, त्यामुळे नंतर ती रद्द करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण गर्दी स्टेडियम आणि विधान सौधाजवळ जमली. विजयानंतर असलेला क्रिकेटज्वर तुफान गर्दी करतो आणि तिला आवर घालणे कठीण होते. त्यामुळे पोलिसांचा सल्ला आठ दिवसांनंतर विजयोत्सव साजरा करण्याचा होता; परंतु कर्नाटक क्रिकेट असोसिएशन, आरसीसी संघ व्यवस्थापनाने परदेशी क्रिकेटपटू या विजयोत्सवासाठी नसतील, असे सांगून लगेच समारंभ घेण्याचे जाहीर केले. कर्नाटक सरकारनही नंतर त्यात सहभागी झाले. या तीनही संस्थांना गर्दीचे नियोजन जमले नाही. चिन्नास्वामी स्टेडियमची क्षमता ३५ हजारांची असताना त्यापेक्षा अधिक पास वाटले गेले आणि प्रवेश सर्वांना खुले असल्याचे सांगत निमंत्रण दिले गेल्याने तीन लाखांहून अधिक भाविकांची गर्दी झाली. त्यातच ड्रेन स्लॅब कोसळला. ड्रेनवर ठेवलेल्या स्लॅबवर गर्दी उभी होती. त्यामुळे स्लॅब कोसळला. यामुळे घबराट आणि गोंधळ निर्माण झाला, नंतर चेंगराचेंगरी झाली. जर पाच हजारांहून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले असतील, तर ते गर्दी नियंत्रित करण्यात कसे अपयशी ठरले? पाचवे कारण म्हणजे हलका पाऊस. पावसामुळे लोक इकडे तिकडे धावत असल्याच्या बातम्या आल्या, त्यानंतरच चेंगराचेंगरीची बातमी समोर आली.

बुधवारी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर हजारो चाहते जमल्यानंतर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला आणि ३३ जण जखमी झाले. तथापि, स्टेडियमच्या आत विजयाचा आनंद साजरा सुरूच होता. स्टेडियमबाहेर मोठ्या संख्येने चाहते जमले होते. त्यावर पोलिस नियंत्रण ठेवू शकले नाहीत. यासाठी सौम्य बळाचा वापर करावा लागला. स्टेडियममध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना प्रवेशद्वाराबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत हे चाहते बळी पडले. गंभीर जखमींवर वैदेही हॉस्पिटल आणि बोरिंग हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. मंगळवारी अहमदाबादमध्ये झालेल्या 'आयपीएल'मध्ये पंजाब किंग्जचा सहा धावांनी पराभव करून 'आरसीबी'ने १८ वर्षांत पहिले विजेतेपद जिंकले. त्यानंतरचा हा विजयोत्सव होता. भारतीय संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर विजयी संघाची मुंबईत मिरवणूक काढण्यात आली होती. त्या वेळीही लाखोंची गर्दी आवडत्या क्रिकेटपटूंना पाहण्यासाठी झाली होती. तिथेही चेंगराचेंगरी झाली. काहींच्या चपला इकडेतिकडे विखुरल्या; परंतु सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मुंबई पोलिसांचे नियोजन कर्नाटक पोलिसांच्या तुलनेने फारच चांगले होते. आता चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना कर्नाटक सरकारने प्रत्येकी दहा लाख रुपयांची भरपाई जाहीर केली आहे. आरसीबी आणि कर्नाटक क्रिकेट संघटनेने दहा लाख रुपयांची मदत जाहीर केली असली, तरी त्याने तरुणांचे गेलेले जीव परत येणार नाहीत. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या घटनेच्या दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले आहेत. देशभरात चेंगराचेंगरीच्या अनेक घटना घडल्या, त्या प्रत्येक वेळी त्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न झाला. आता ही भाजपने कर्नाटक सरकारवर टीका केली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. सिद्धरामय्या यांनी, 'त्यांचे सरकार त्याचे राजकारण करणार नाही. एवढ्या मोठ्या गर्दीची कोणालाही अपेक्षा नव्हती. स्टेडियमची क्षमता फक्त ३५,००० लोकांची आहे, परंतु दोन-तीन लाख लोक उपस्थित होते,' असे सांगितले. कार्यक्रमादरम्यानच्या गैरव्यवस्थापनाबद्दल आयोजकांची चौकशी केली जात आहे. कर्नाटक क्रिकेट संघटना, आरसीबीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बुधवारी दुपारी संघ येथे आला, तेव्हा विमानतळाबाहेर रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या मोठ्या संख्येने चाहत्यांनी त्यांचे स्वागत केले. विराट कोहलीसह संघाच्या खेळाडूंची एक झलक पाहण्यासाठी चाहते रस्त्यांवर रांगेत उभे होते. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेरही अशीच परिस्थिती दिसून आली. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये आत जल्लोष सुरू असताना बाहेर मृत्यूचे तांडव सुरू होते. चेंगराचेंगरी झाल्यामुळे विजयोत्सव रद्द केला असता, तरी बिघडले नसते; परंतु विजयाच्या उन्मादात सामान्यांच्या मरणाला किंमत नसते, हा नवा धडा बेंगळुरूने घालून दिला. बेंगळुरूमध्ये झालेल्या विजयाच्या उत्सवादरम्यान ११ कुटुंबे शोकाकुल झाली. चिन्नास्वामी स्टेडियम आणि विधानसभेभोवती लाखोंच्या संख्येने गर्दी जमली, तेव्हा तिथे उपस्थित असलेल्या प्रशासन आणि आयोजकांचा निष्काळजीपणा उघडकीस आला. गर्दी प्रचंड होती आणि त्यांचा उत्साह त्याहूनही जास्त होता. ना गर्दी नियंत्रणात होती, ना त्यांचा उत्साह आणि वेडेपणा. या वेडेपणाने सर्व सुरक्षा वर्तुळ तोडले. शांतता आणि संयमाचा बांध तुटला. गोंधळ उडाला. अनेक लोक चिरडले गेले. अनेक लोक जखमी झाले आणि अनेक लोकांची प्रकृती अजूनही गंभीर आहे. विजयाचा उत्सव एका दुःस्वप्नात बदलला. चेंगराचेंगरीची बातमी ठळक बातम्यांमध्ये दाखवली जात असताना खेळाडू आणि कर्मचारी स्टेडियमच्या आत आनंद साजरा करत राहिले. सर्वात मोठे अमानुष कृत्य म्हणजे लोक स्टेडियमच्या बाहेर मरत राहिले आणि 'आयपीएल' कपचा उत्सव आत सुरूच होता. ही केवळ चेंगराचेंगरी नव्हती, तर प्रशासकीय अपयशाची काळी शाई होती.

# शेतीत प्रक्रिया उद्योगावर हवा भर

**एकीकडे शेतकऱ्यांच्या शेतीमालाला पुरेसा भाव मिळत नाही, तर दुसरीकडे अन्न प्रक्रियेअभावी ३० टक्के फळे, भाज्या वाया जातात. अन्न वाया न घालवल्यास शेतकऱ्यांना कष्टाचे पूर्ण फळ मिळेल आणि उत्पन्न वाढेल. सर्वांसाठी जास्त अन्न शिल्लक राहील, कोणीही उपाशी राहणार नाही. शेतीतले नुकसानही कमी होईल. त्यासाठी अन्न प्रक्रियेच्या मुद्द्याकडे गांभिर्याने पहावे लागेल.**

विशेष
प्रा. सुखदेव बखळे

जगभरात शेतांपासून दुकानांपर्यंत 13.2 टक्के अन्न वाया जाते. 17 टक्के अन्न दुकाने आणि घरांमधून फेकून दिले जाते. एकूणच, सुमारे 30 टक्के अन्न कधीच कोणाच्याही पोटात पोहोचत नाही. गरीब देशांमध्ये शेतातून गोदामे आणि दुकानांपर्यंत अन्न येताना वाया जाते. श्रीमंत देशांमधील बहुतेक अन्न घरांमध्ये वाया जाते, म्हणजेच लोक गरजेपेक्षा जास्त खरेदी करतात आणि उरलेले अन्न फेकून देतात. भारतात अन्न वाया जाण्याबाबत कोणताही मोठे सरकारी सर्वेक्षण झालेले नाही; परंतु कापणीनंतर बनणारे किती अन्न वाया जाते हे शोधण्यासाठी काही सर्वेक्षणे करण्यात आली आहेत. 'आयसीएआर-सीआयपीएचईटी' ने 2012 आणि 2015 मध्ये सर्वेक्षण केले. 'नॅबकॉन्स' या संस्थेने 2022 मध्ये सर्वेक्षण केले. त्याचे सर्वेक्षण अहवाल पाहिल्यास भारतात धान्य उत्पादनात खूप वाढ झाली आहे, हे लक्षात येते.


1966-67 मध्ये आपण 74 दशलक्ष टन धान्याचे उत्पादन करायचो. ते 2022-23 मध्ये वाढून 330 दशलक्ष टन झाले. आपण तांदळाचे मोठे निर्यातदारही आहोत. फळे आणि भाज्यांचे उत्पादनही वाढले आहे; पण उत्पादन वाढत असताना, तोटाही वाढत आहे. येथे यंत्रांचा वापर कमी आहे आणि गोदामातून दुकानांपर्यंत माल पोहोचवण्याची व्यवस्थाही कमकुवत आहे. या सर्वेक्षणातून दिसून आले आहे की, कापणीनंतरचे नुकसान थोडे कमी झाले आहे; परंतु तरीही अजून ते खूप जास्त आहे. 'नॅबकॉन्स' च्या 2022 च्या सर्वेक्षणानुसार 2020 ते 2022 दरम्यान पिकांचे आणि शेतीशी संबंधित गोष्टींचे नुकसान झाल्यामुळे आपल्याला दर वर्षी 1.53 लाख कोटी रुपयांचे (18.5 अब्ज डॉलर्स) नुकसान सहन करावे लागले आहे.

भारतात धान्य, डाळी आणि तेलबियांचे नुकसान जागतिक पातळीपेक्षा जास्त आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शेतीमध्ये यंत्रसामग्रीचा कमी वापर आणि साठवणूक आणि वाहतुकीच्या कमी सुविधा हे आहे. यामुळे या विषयाचा साकल्याने वेध घेणे आवश्यक आहे.

चीनमध्ये धान्याचे नुकसान फक्त 2.22 टक्के आहे. भारतात ते 4.44 टक्के आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान तृणधान्ये आणि तेलबियांपेक्षा जास्त आहे; परंतु जागतिक सरासरीच्या तुलनेत भारतात हे नुकसान कमी आहे. गुणवत्तेचा ऱ्हास हीदेखील एक मोठी समस्या आहे. आपल्या देशात धान्य, डाळी आणि तेल उत्पादनांचे नुकसान खूप मोठे आहे. फळे आणि भाज्यांचे नुकसान थोडे कमी आहे.

सर्वेक्षण फक्त नुकसानाचे प्रमाण सांगते; परंतु गुणवत्तेत किती नुकसान झाले हे यावरून कळत नाही. उदाहरणार्थ पीक कापले जाते, स्वच्छ केले जाते, घरी किंवा बाजारात नेले जाते आणि नंतर गोदामे आणि दुकानांमध्ये पोहोचवले जाते, तेव्हा गुणवत्तेतही खूप नुकसान होते. 'आयसीएआर' या संस्थेतर्फे धान्याच्या प्रमाणासोबत गुणवत्तेतील तोटा मोजण्याचा प्रयत्न केला. पंजाब, मध्य प्रदेश आणि बिहारमधील काही जिल्ह्यांमध्ये भात, गहू, मका आणि सोयाबीनवर हे सर्वेक्षण करण्यात आले. 1200 शेतकरी आणि 116 बाजारपेठेतील लोकांकडून माहिती गोळा करण्यात आली. सर्वेक्षणात सोयाबीनचे सर्वाधिक 15.34 टक्के नुकसान झाल्याचे दिसून आले. गव्हाचे 7.87 टक्के नुकसान झाले. धानाचे 6.37 टक्के नुकसान झाले. मक्याचे 5.95 टक्के नुकसान झाले. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे गव्हाच्या गुणवत्तेचे नुकसान 2.27 टक्के इतके होते. याचे कारण गव्हामध्ये ओलावा शोषून घेण्याची क्षमता असते. त्यामुळे गोदामात साठवल्यावर त्याची गुणवत्ता खराब होते. गुणवत्तेत घट होणे दर्शवते की पिकाची गुणवत्ता किती खालावली आहे.

शेतकऱ्यांच्या पातळीवर कापणीनंतरच्या नुकसानाची कारणे शोधण्यासाठी 'आयसीआरआयईआर' ने भात पिकाची निवड केली आणि तीन राज्यांमधील 600 भात उत्पादक शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले. त्यात आढळून आले की शेत जितके मोठे असेल तितके नुकसान कमी होते. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. कुटुंबप्रमुखाचे शिक्षण जितके जास्त असेल तितके नुकसान कमी होते. बाजारापासून जितके जास्त अंतर असेल तितके नुकसान जास्त. सर्वात मोठी बाब म्हणजे लहान शेतांमध्ये जास्त नुकसान होते. शेतीचा आकार एका युनिटने वाढल्यास भाताचे नुकसान प्रति हेक्टर सात टक्क्यांनी कमी होते.



भारतातील 86 टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. त्यामुळे त्यांना जास्त नुकसान सहन करावे लागते. बिहारमध्ये लहान शेतांची संख्या सर्वाधिक आहे. त्यामुळे तेथे प्रति हेक्टर नुकसानही जास्त आहे. येथे लहान शेतकऱ्यांचे प्रति हेक्टर 3.5 किलो नुकसान होते, तर मोठ्या शेतकऱ्यांचे सुमारे 1.16 किलो नुकसान होते. दुसरे प्रमुख कारण म्हणजे शेतकऱ्यांकडे यंत्रांची कमतरता आहे. विशेषतः कंबाईन हार्वेस्टरची कमतरता आहे. कंबाईन हार्वेस्टर वापरल्याने नुकसान कमी होते. भारतात कापणीनंतर मोठ्या प्रमाणात धान्य वाया जाते. याला साठवणुकीचा अभाव, पारंपारिक धान्य व्यवस्थापन प्रणाली कारणीभूत आहे.

या समस्येवर अन्न प्रक्रिया हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. अन्न प्रक्रियेमुळे दीर्घकालीन साठवणुकीची गरज कमी होते. प्रक्रिया केलेले धान्य जास्त काळ टिकते, कारण ते खराब होण्याची शक्यता कमी असते. उदा. गव्हाचे पीठ, रवा, ब्रेड, बिस्किटे आणि शिजवण्यासाठी तयार पदार्थांमध्ये रूपांतर केल्याने त्याचे शेल्फ लाइफ वाढते. शेतकऱ्यांनी आपले उत्पादन थेट अन्न प्रक्रिया युनिट्सना विकल्यास चांगला भाव मिळू शकतो. यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे धान्य खराब होण्याच्या भीतीने कमी किमतीत घाईघाईने विकण्याची गरज भासणार नाही. उदाहरणार्थ भातावर प्रक्रिया करून तांदूळ, पोहे, फुगीर तांदूळ बनवल्याने किंमत आणि मागणी वाढते.

धान्य जास्त काळ सुरक्षित राहिले आणि कमी वाया गेले तर भारत अन्न सुरक्षेच्या बाबतीत अधिक मजबूत होईल. अन्न प्रक्रिया निर्यातीच्या संधीदेखील वाढवू शकते. त्यामुळे शेतकरी आणि उद्योगांना फायदा होईल. अशा प्रकारे, अन्न प्रक्रिया केवळ धान्याची नासाडी रोखण्यास मदत करू शकत नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यास, अन्न सुरक्षा मजबूत करण्यास आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यासदेखील मदत करू शकते.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशातील अर्ध्याहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्याचे भौगोलिक स्थान आणि नैसर्गिक संसाधने हे दूध, मांस, फळे, भाज्या आणि धान्ये यासारख्या अनेक अन्नपदार्थांचे प्रमुख उत्पादक बनवतात; परंतु या उत्पादनांच्या प्रक्रियेची पातळी खूपच कमी आहे.

सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने 2021 मध्ये डेलॉइट नावाच्या कंपनीच्या मदतीने एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणातून दिसून आले की फळांच्या प्रक्रियेचे प्रमाण खूपच कमी म्हणजे 4.5 टक्के आहे. भाज्यांची परिस्थिती आणखी वाईट आहे. फक्त 2.7 टक्के भाज्यांवर प्रक्रिया केली जाते. दूध प्रक्रियेचा स्तर (21.1 टक्के) थोडा चांगला आहे. मांस प्रक्रियेची पातळी सर्वाधिक (34.2 टक्के) आहे. माशांच्या प्रक्रियेची पातळी 15.4 टक्के आहे. अन्न प्रक्रिया क्षेत्राची वाढ केवळ अन्नपदार्थांपुरती मर्यादित नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न, रोजगाराच्या संधी आणि निर्यात बाजारपेठ यांना नवीन उंचीवर घेऊन जाते. अन्न प्रक्रिया वाढते, तेव्हा कच्च्या मालाची मागणीही वाढते. याचा अर्थ शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला भाव मिळतो. प्रक्रिया क्षेत्राच्या वाढीसह शेती केवळ उपजीविकेचे साधन बनत नाही, तर एक मोठा व्यवसायदेखील बनू शकते.

भारतात अन्न आणि पेयांचा व्यवसाय सुमारे 380 अब्ज डॉलरचा आहे आणि यापैकी 32 टक्के अन्न प्रक्रिया क्षेत्रातून येते. 2014 पासून हा व्यवसाय दर वर्षी आठ टक्के दराने वाढत आहे; पण याबाबत जाणवणारी एक मोठी समस्या म्हणजे अन्नपदार्थांची नासाडी. आपल्या देशात फळे आणि भाज्यांसारख्या सुमारे 40 टक्के नाशवंत वस्तू वाया जातात. 'सीआयपीएचईटी' या सरकारी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले की, आपल्याकडे सुमारे 4.65 टक्के ते 5.99 टक्के धान्य वाया जाते. फळे आणि भाज्यांमध्ये सुमारे 4.58 टक्के ते 15.88 टक्क्यांपर्यंत नासाडी होते. 2010 मध्ये डाळींची नासाडी 4.3 टक्क्यांवरून 6.1 टक्क्यांपर्यंत वाढली; 2015 मध्ये ती 6.36 टक्क्यांवरून 8.41 टक्क्यांपर्यंत वाढली. या सर्वेक्षणात असेही दिसून आले आहे की पीक काढणीनंतर होणारे नुकसान 92,651 कोटी रुपयांचे आहे. यामुळे शेतीमध्ये पायाभूत गुंतवणूक आणि अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देणे किती आवश्यक आहे, हे लक्षात येईल.

खेचाखेची

## काटकसर

एक पुणेकर आपल्या मुलाला खुप मारत होता.

**शेजारी** : का मारता आहात मुलाला?

**पुणेकर** : अहो ह्याला जीना एक पायरी सोडून चढ म्हणजे चप्पल कमी झिजते असे सांगितले होते, हा गाढव दोन पायऱ्या सोडून चढला...

**शेजारी** : अहो मग मारता कशाला? चप्पल अजून कमी झिजेल ना...

**पुणेकर** : अहो, पण चड्डी फाटली ना त्या नादात...

वेगळं काही

केरळच्या एर्नाकुलम स्थानकावर हमालाचं काम करणाऱ्या श्रीनाथ केने रेल्वे स्थानकावरच्या मोफत वायफाय सुविधेचा वापर करून अभ्यास केला आणि केरळ लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाला. स्मार्टफोन आणि ईयरफोन वापरून त्याने अभ्यास केला. लोकसेवा आयोगाची लेखी परीक्षा आणि मुलाखतीत उत्तीर्ण झाल्यानंतर तो जमीन महसूल विभागाचा कर्मचारी म्हणून काम करेल. गेल्या पाच वर्षांपासून श्रीनाथ हमालाचं काम करतो. ही परीक्षा तो तिसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण झाला. यावेळी पहिल्यांदाच त्याने स्थानकावरच्या वायफाय सुविधेचा अभ्यासासाठी वापर केला. हमाली करताना कानात ईयरफोन घालून तो लेक्चर्स ऐकत असे.


फॅशन पॅशन

## त्वचा घेईल मोकळा श्वास

पेहराव कितीही चांगला असला तरी त्याचं फिटिंग अंतर्वस्त्राच्या फिटिंगवर अवलंबून असतं. त्यामुळेच अंतर्वस्त्र दर्जेदार असावी. ही खरेदी करताना आपली त्वचा नेमकी कशी आहे याचाही विचार व्हावा. उदाहरणार्थ त्वचा संवेदनशील असेल आणि ब्रा च्या स्ट्रीप्स घट्ट असतील तर जखमा होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी काही उपाय योजता येतील.



✻ रात्री झोपण्यापूर्वी ब्रा काढून ठेवावी. यामुळे दिवसभर बंदिस्त असणाऱ्या त्वचेला श्वास घेता येईल. ✻ स्ट्रीप्सच्या त्रासापासून वाचण्यासाठी पेट्रोलियम जेली हा सर्वोत्तम पर्याय आहे. ब्रा चं इलॅस्टिक किंवा स्ट्रीप्स काचत असलेल्या ठिकाणी पेट्रोलियम जेली लावावी. यामुळे त्वचा मुलायम बनते. स्ट्रीप्सचे व्रणही रहात नाहीत. ✻ घामामुळे स्ट्रीप्सच्या ठिकाणी काळे डाग पडण्याची शक्यता असते. हे डाग घालवण्यासाठी स्क्रबिंग करता येईल. आठवड्यातून एकदा हा उपाय करावा. ✻ हातावर, चेहऱ्यावर मॉईश्चरायजर लावतात त्याप्रमाणे स्ट्रीप्स एरियावरही लावावं. लावताना थोडा मसाज केल्याने रक्तसंचार सुधारतो आणि व्रणांचं प्रमाण कमी होण्यास मदत होते.




राशीभविष्य

- **मेष** : नवीन कामं हाताशी येतील. अंगभूत कला-गुणांना वाव मिळेल. हाती आलेल्या संधींचा लाभ घ्या.
- **वृषभ** : गुंतवणुकीला चालना मिळेल. खरेदी-विक्रीचे व्यवहार मार्गी लागतील. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **मिथुन** : जुन्या ओळखी कामी येतील. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. बेरोजारांना दिलासा मिळेल.
- **कर्क** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. दिलासादायक घटना घडतील. स्थावर प्रश्नात लाभ होईल.
- **सिंह** : शारीरिक श्रम अधिक होतील. कर्ज प्रकरणात अडचणी येतील. प्रवासाचे बेल लांबणीवर टाकावे.
- **कन्या** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील. जुनी येणी पुन्हा रखडतील.
- **तूळ** : नोकरीत अचानक समस्या संभवतात. प्रवासात विशेष काळजी घ्यावी. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **वृश्चिक** : कलाकारांचा उत्साह वाढेल. महत्त्वाची कामं मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल.
- **धनु** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. विवाहाची बोलणी सफल होतील. बाकी चिंता नसावी.
- **मकर** : व्यवसायात महत्त्वाचा दिलासा मिळेल. आर्थिक करार लाभदायक ठरतील. वाहन सौख्य लाभेल.
- **कुंभ** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. साऱ्या गोष्टी मनाजोग्या जुळून येतील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मीन** : आलेल्या प्रसंगांना धीरानं तोंड द्या. मानसिक ताण-तणाव राहतील. प्रकृतीची काळजी घ्यावी.

करुन तर पाहा

## चावीचा विंड चाईम

घरातल्या टाकाऊ वस्तूंपासून तुम्ही छान-छान कलाकृती बनवू शकता. त्यामुळे घराची शोभा वाढते. तुमच्याकडे काही किल्ल्या असतील तर त्यांचा वापर करून छानसं विंड चाईम बनवता येईल.

**साहित्य** : कमीत कमी पाच किल्ल्या, पोकळ पाईप किंवा हलकी काठी (झाडाची फांदीही वापरता येईल), दोरा, ॲक्रेलिक रंग इत्यादी.

**कृती**: किल्ल्यांच्या दोन्ही बाजू रंगवून घ्या. रंग वाळू द्या. तुमच्याकडील पोकळ पाईप किंवा काठीच्या दोन्ही बाजूंना दोरा बांधून घ्या. हा दोरा अशा पद्धतीने बांधा की जोरात वारं आलं तरी तो तुटणार नाही. आता प्रत्येक किल्लीला दोरा बांधा. या किल्ल्या काठीला बांधायला सुरूवात करा. किल्ल्या जवळजवळ बांधा. हवेमुळे आपटून आवाज यायला हवा. अशापद्धतीने तुमचं विंड चाईम तयार झालं आहे. हे विंड चाईम तुम्ही एखाद्याला भेट म्हणूनही देऊ शकता किंवा घरात सजावटीसाठी वापरू शकता.

दिनविशेष

## ७ जून

- १९९८ : गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष शशिकांत नार्वेकर यांचे निधन.
- २०१३ : 'राष्ट्रवादी'च्या सर्व मंत्र्यांचे राजीनामे.
- २०१५ : टिंटू लुकाने २१ व्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं.
- २०१७ : राष्ट्रपतीपदासाठी १७ जुलैला मतदान होणार असल्याचं जाहीर.
- २०१८ : भारतीय महिला क्रिकेटपटू मिताली राज ही टी-२० क्रिकेटमध्ये दोन हजार धावा करणारी देशातील पहिली फलंदाज ठरली.

स्मार्ट टिप्स

## सॉक्सचा स्टाईल मंत्रा

पण हे सॉक्स बुटांच्या दोन ते तीन इंचांपर्यंत बाहेर दिसावेत याकडे लक्ष द्या.

✻ सॉक्स दिसू नयेत असं वाटत असेल तर कॅज्युअल स्नीकर्ससोबत आरामदायी नो शो सॉक्स कॅरी करा.

✻ व्यायामाची आणि खेळण्याची आवड असणाऱ्यांनी स्पोर्ट्स सॉक्स कॅरी करायला हवेत. स्पोर्ट्स सॉक्स घाम शोषून घेतात. यामुळे तुमच्या पायांना त्रास होत नाही.

✻ सॉक्समध्ये फार प्रयोग करायचे नसतील तर ब्लॅक सॉक्सचा एव्हरग्रीन पर्याय आहे.

✻ कॅज्युअल स्नीकर्ससोबत कॉटनचे, स्ट्राईपवाल्या डिझाइनचे सॉक्स कॅरी करता येतील.

✻ ट्राउझरसोबत सॉक्स कॅरी करताना ट्राउझरच्या रंगापेक्षा एक शेड गडद किंवा फिकट रंगाच्या सॉक्सची निवड करा.

ही पथ्यं पाळून तुम्ही सॉक्सचा अचूक वापर करू शकता.

पंचांग

**शनिवार, ७ जून २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ शु. १२, नक्षत्र : चित्रा
चंद्रराशी : तूळ , योग : वरियान
सूर्योदय: ६.०३, सूर्यास्त: ७.१३

फॉरवर्डस

**पहली मुलाकात थी और हम दोनों ही बेबस थे,
वो अपनी जुल्फें न संभाल पाए और हम खुद को...!!!**

आरोग्यमंत्र

## पांढऱ्याशुभ्र दातांसाठी...

प्रत्येकालाच पांढरेशुभ्र, मोत्यासारखे दात हवे असतात. मात्र आहारातील काही खाद्यघटक तसंच चुकीच्या सवयींमुळे दातांच्या नैसर्गिक रंगावर दुष्परिणाम होतो. या पदार्थांमुळे तोंडातली पीएचची पातळी बिघडते आणि दातांवर डाग पडू लागतात. म्हणूनच यासंबंधी सविस्तर माहिती घ्यायला हवी.



✻ तोंड आणि दातांशी संबंधित विकारांमुळे आणि त्यावरच्या उपचारांमुळे दातांचा रंग उडू शकतो. गरोदर स्त्रीला जंतूसंसर्गाची लागण झाली तर होणाऱ्या बाळाच्या दातांच्या रंगावर दुष्परिणाम होऊ शकतो. रेडिएशन, केमोसारख्या उपचारांमुळेही दातांच्या रंगावर परिणाम होतो. ✻ दातांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवायचा असेल तर खाल्ल्यानंतर चूळ भरायला हवी. पोकळ्यांमध्ये अन्नकण साठल्यास दात पिवळे पडतात, त्यांची झीज होते. ✻ फ्लोराइडचं प्रमाण जास्त असलेली टूथपेस्ट किंवा अशा पाण्याचा वापर केल्याने दातांचा पांढरा रंग फिका होऊ लागतो. त्याचबरोबर फ्लोरोसिस नावाच्या विकाराची शक्यता बळावते. या विकारामुळे दात पिवळट करडे दिसू लागतात. त्यांची झीज होते. दातांवर पांढरट डाग पडतात. ✻ औषधांमुळेही दातांवर परिणाम होतो. बेनेड्रिल, प्रतिजैविकं आणि उच्च रक्तदाबावरच्या साध्या औषधांमुळे दात पिवळे पडतात. आयर्न सिरप आणि माउथवॉशमध्ये असणाऱ्या घातक रसायनांमुळेही दातांवर डाग पडतात.

वाचा तर खरं

चेहऱ्यावरचा तेलकटपणा ही अनेकांची समस्या असते. त्यातच उन्हाळ्यात ही समस्या जास्त वाढते. चेहऱ्यावरचा तेलकटपणा कमी करण्यासाठीच्या या टिप्स, खास दोस्तमंडळींसाठी...

✻ ऑईल फ्री किंवा चेहऱ्याचा तेलकटपणा कमी करणाऱ्या फेसवॉशने तोंड धुवा. दिवसातून दोन वेळा तरी फेसवॉशने तोंड धुवायलाच हवं. तेलाचे थर साठल्याने त्वचेवरची छिद्रं बंद होतात. फेसवॉशच्या वापरामुळे हे टाळता येईल. चेहरा कोरडा करणाऱ्या क्लिंजर्सचा वापर करू नका. यामुळे त्वचा कोरडी पडेल आणि चेहरा जास्त तेलकट दिसेल. **क्रमशः**

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### समलैंगिक जोडप्याला 'कुटूंब' म्हणून मान्यता

**चेन्नई :** समलैंगिक नातेसंबंधांना कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी देशभरात दीर्घकाळ संघर्ष सुरू असताना, मद्रास उच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक आणि मार्गदर्शक निर्णय दिला आहे. "समलैंगिक जोडपी सुद्धा कुटुंब निर्माण करू शकतात," अशी स्पष्ट भूमिका घेत, न्यायालयाने या समुदायाच्या हक्कांना आधार दिला आहे. 'कुटुंब' या संकल्पनेचा व्यापक अर्थ मांडत, मद्रास उच्च न्यायालयाच्या एका विभागीय खंडपीठाने एका समलैंगिक महिलेला तिच्या जोडीदारासोबत राहण्याची मुभा दिली असून तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण केले आहे.

# सातारा एलसीबीची मोठी कारवाई

## जामीनावर सुटलेल्या दोन गुंडांकडून पिस्तुलांसह काडतुसे जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** मोक्का गुन्ह्यातून जामीनावर सुटलेल्या आणि सातारा जिल्ह्यातून तडीपार केलेल्या दोन गुंडांना पिस्तुले विक्रीसाठी आल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेनं जेरबंद केलं. त्यांच्याकडून ६ पिस्तुले, ६ मॅगझिन, ३० काडतुसे, मोबाईल आणि कारसह १५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अमीत ऊर्फ बिऱ्या कदम (रा.लोणी) आणि विशाल महादेव चव्हाण (रा. भोळी, ता. खंडाळा, जि. सातारा), अशी संशयितांची नावे आहेत.

बकरी ईद आणि संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्यांची झाडाझडती घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी दिले होते. तसेच तडीपार गुंडांची माहिती काढुन कारवाई करण्याची सुचनाही केली होती. खबऱ्याकडून एलसीबीचे पोलीस निरीक्षक अरूण देवकर यांना माहिती मिळाली की, मोक्कातून जामीनावर सुटलेले आणि सातारा जिल्ह्यातून तडीपार असलेले दोघेजण मारुती कारमधून नीरा-लोणंद मार्गावर देशी बनावटीची पिस्टल आणि काडतुसे विक्रीसाठी येणार आहेत.


सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित फार्णे यांच्या पथकाला कारवाईची सूचना केल्यानंतर त्यांनी नीरा-लोणंद मार्गावर सापळा रचला. खबऱ्याने दिलेल्या माहितीनुसार मारूती सुझुकी कार येताच पोलिसांनी कारमधील गुंडाना ताब्यात घेतलं. झडतीत त्यांच्याजवळ ६ देशी बनावटीची पिस्तुले, ६ मॅगझिन, ३० जिवंत काडतुसे, २ मोबाईल आढळले. कारसह सर्व मुद्देमाल जप्त करून दोन्ही तडीपार गुंडांना जेरबंद केलं.

## उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेपास नकार

# विशाळगडावर बकरी ईद साजरी होणारच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** संरक्षित धार्मिक स्थळांवर अनेक धार्मिक विधी होत असतात, मग त्या कोणत्याही धर्माच्या का असेनात. विशाळगडावर बकरी ईद साजरी करण्यापासून रोखण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार देत कोल्हापूर जिल्हा प्रशासनासला दणका दिला आहे. दरम्यान, बकरी ईदनिमित्त ७ जून आणि त्यानंतर ८ ते १२ जून दरम्यान विशाळगडावर कुर्बानीकरता मुंबई उच्च न्यायालयानं सशर्त परवानगी दिली आहे. मात्र त्यामुळं इथं कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण



होऊ शकतो, या कारणाखाली कोल्हापूरच्या पोलीस अधीक्षकांनी कुर्बानीची परवानगी नाकारल्याचे आदेश जारी केले होते. तसंच जिल्हा प्रशासनानं उच्च न्यायालयाच्या परवानगीला तातडीनं सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

जिल्हा प्रशासनाची याचिका शुक्रवारी न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठापुढं सुनावणीसाठी आली होती. संरक्षित ऐतिहासिक स्थळांवर अनेक धार्मिक विधी या होतच असतात. गेल्यावर्षीही इथं ही विधी पार पडली होती आणि उच्च न्यायालयानं परवानगी दिलीय तर ती गेल्यावर्षीच्या आधारावरच दिली असणार. त्यामुळं या प्रकरणावर तातडीनं सुनावणीची आवश्यकता नसल्याचं स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयानं जिल्हा प्रशासनाला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. त्यामुळं इथल्या दर्ग्यात चार दिवस चालणाऱ्या उरूसमध्ये सहभागी होण्याकरता येणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पान १ वरून

## बँकेतील ग्राहकांच्या एफडी मधील ४.५८ कोटी उडवले

इतकेच नव्हे, तर ओटीपी यंत्रणाही आपल्या संगणकावर सेट करून तिने ओटीपी स्वत:कडे घेतले, असे तपास अधिकारी इब्राहीम खान यांनी सांगितले.

एका ग्राहकाने आपल्या एफडीच्या चौकशीसाठी बँकेत येऊन माहिती घेतल्यानंतर ही बाब समोर आली. त्यानंतर १८ फेब्रुवारी रोजी बँकेने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी साक्षी गुप्ताला तिच्या बहिणीच्या लग्नात येऊन अटक केली असून, सध्या साक्षी गुप्ताची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

बँकेने अद्याप याबाबत अधिकृत निवेदन केलेले नाही. मात्र, बँकेतील अंतर्गत सूत्रांच्या माहितीनुसार ज्यांचं नुकसान झालं आहे त्या ग्राहकांना भरपाई दिली जाईल, असे संकेत मिळाले आहेत. या प्रकरणामुळे ग्राहकांमध्ये चिंता आणि अस्वस्थता निर्माण झाली आहे. "आम्ही पैसे बँकेत ठेवतो कारण तिथे ते सुरक्षित असतात, पण आता तिथेही धोका वाटतो. मग पैसे ठेवायचे तरी कुठे?" असा प्रश्न एका ग्राहकाने उपस्थित केला आहे.

## शिवराज्याभिषेक दिनी ५१ फूट शिवशक राजदंड स्वराज्यगुढी

संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, समितीचे सचिव सचिन पायगुडे, उपाध्यक्ष रवींद्र कंक, सदस्य शंकर कडू, नाना निवंगुणे, प्रवीण गायकवाड, सुनील जगताप, विवेक तुपे, अजित शिंदे, मोहन पासलकर सर्व स्वराज्यघराणी, स्वराज्यबांधव, महिलावर्ग उपस्थित होते. सोहळ्याची सुरुवात शिवरायांच्या विश्वातील पहिल्या शिवराज्याभिषेक शिल्पाचे पूजन करुन झाली. त्यानंतर शिवरायांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी २२ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात युपीएससी स्पर्धा परीक्षेत देशात २६ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या शिवांश सुभाष जागडे यांचा शिवरायांच्या जिरेटोप देऊन सन्मान करण्यात आला.

अमित गायकवाड यांनी सात्यत्याने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत २०२१ सालापासुन तंत्र निकेतने आणि तत्सम शिक्षण संस्थामंध्ये हा दिवस "सार्वजनिक शिवस्वराज्य दिन" स्वराज्यगुढी उभारुन साजरा करण्यास सुरुवात केली. सोहळ्याच्या १३ व्या वर्षात आता प्रत्येक गडावर, घरावर, चौकात, गावात, तालुक्यात, जिल्ह्यात, शहरात, महाविद्यालयात, राज्यात तसेच देशविदेशात "सार्वजनिक शिवस्वराज्य दिन" स्वराज्य गुढी उभारुन साजरा केला जात आहे. ३५२ व्या शिवराज्याभिषेक वर्षात हा दिवस भारत सरकारने "राष्ट्रीय शिवस्वराज्य दिन" म्हणून जाहीर करुन शिवरायांना देशस्तरीय मानवंदना द्यावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

पुण्यामध्ये दरवर्षी एसएसपीएमएस लालमहाल, छत्रपती संभाजी महाराज स्मारक डेक्कन,चंद्रमौलेश्वर मंदिर यासह अनेक ठिकाणी स्वराज्य गुढी उभारली जाते. त्याचबरोबरीने यावर्षी शिवकालीन सरदारांच्या वंशजांकडून शिवनेरी, राजगड, तोरणा, पुरंदर, सिंहगड, संग्रामदुर्ग यासह ३५१ गडांवर तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, तुळशीबाग मंडळ, सेवा मित्र मंडळ, साईनाथ मंडळ, लक्ष्मीबाई दत्त मंदिर यासह ३६० गणेशोत्सव मंडळानी देखील स्वराज्यगुढी उभारुन सार्वजनिक शिवस्वराज्य दिन साजरा केला.

कार्यक्रमाचे आयोजन सोहळयाचे प्रवर्तक अमित गायकवाड, सचिन पायगुडे, रवींद्र कंक, शंकर कडू, प्रवीण गायकवाड, गोपी पवार, मोहन पासलकर, महेंद्र भोईटे यांसह असंख्य स्वराज बांधवांनी केले आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

महाराजांच्या पालखीची शाही मिरवणूक काढण्यात आली. या चैतन्यमय सोहळ्या लाखो शिवभक्त नागरीक , महिला पुरूष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
शंखनाद आणि तुतारीबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने रायगडचा परिसर दुमदुमून गेला होता. राज्यभरातून आलेल्या शिवभक्तांनी पारंपारीक वेषात मैदानी खेळांची, शस्त्र कवायतीचे सादरीकरण केले. पालखी सोहळ्यानंतर झालेल्या महाप्रसादाने सोहळ्याचा समारोप झाला. सोहळ्या निमित्ताने गडावर आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली होती. तर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पाचाड ते रायगड पायथा या दरम्यान वाहतुक नियमन करण्यात आले होते. दोन शिवभक्तांना चक्कर येऊन पडले होते. त्यांच्यावर आरोग्य पथकांनी तात्काळ उपचार केले.

## दरबार हॉलने अनुभवला ७९ वर्षांनी सोहळा

या दरबार हॉलमध्ये शेवटचा राज्याभिषेक १९४६ मध्ये छत्रपती शहाजी महाराज यांचा झाला होता. त्यानंतर तब्बल ७९ वर्षांनी दरबार हॉलने राज्याभिषेक दिनाचा सोहळा अनुभवला. त्याचे साक्षीदार होण्याचा मान करवीरकरांनी मिळाला. रंगीबेरंगी रांगोळ्या, फुलांच्या माळा यांनी दरबार हॉलमध्ये सजावट करण्यात आली होती. सकाळी साडेसात वाजल्यापसून सनई चौघड्यांचे मंजुळ स्वरांनी वातावरण मंगलमय करुन टाकले. मान्यवरांचे आगमन होईल तसे मराठा लाईट इनफन्ट्रीच्या सिल्व्हर वाद्यवृंदाचे सादरीकरण सुरु झाले. खासदार शाहू छत्रपती, यांचे दरबार हॉलमध्ये आगमन होताच उपस्थितांनी उभे राहून त्यांचे स्वागत केले तर मराठा लाईट इनफन्ट्रीच्या सिल्व्हर वाद्यवृंदाने त्यांना मानवंदना दिली.

## जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाचे उद्घाटन

एकतेचा आणि भारताच्या इच्छाशक्तीचा एक मोठा उत्सव आहे." माता वैष्णोदेवींच्या आशीर्वादाचा उल्लेख करत ते पुढे म्हणाले, "आज काश्मीर खोरे भारताच्या विशाल रेल्वे नेटवर्कशी जोडले गेले आहे. हे केवळ कनेक्टिव्हिटीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे नाही तर राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक समावेशाचे प्रतीक देखील आहे."
पंतप्रधान मोदी म्हणाले की, "हा ऐतिहासिक प्रकल्प पूर्ण करणे ही सरकारसाठी अभिमानाची गोष्ट आहे". ते म्हणाले, "आमच्या कार्यकाळात या महत्त्वाच्या प्रकल्पाला गती मिळाली आणि आज आम्ही तो ठोस आकार घेत असल्याचे पाहत आहोत, ही आमच्यासाठी सौभाग्याची गोष्ट आहे." प्रकल्पादरम्यान आलेल्या अडचणींची आठवण करून देताना ते म्हणाले, "डोंगरावरून सतत दगड कोसळणे, प्रतिकूल हवामान आणि कठीण मार्ग असूनही, आमच्या सरकारने कधीही हार मानली नाही. आम्ही आव्हानाला आव्हान देण्याचा मार्ग निवडला आणि जिंकलो."असे त्यांनी यावेळी म्हटले.

## जगातील सर्वात उंच रेल्वे पुलाची वैशिष्ट्ये...

ते २२ तासांची घट होईल. या पुलासाठी आतापर्यंत ३०,३५० टन स्टीलचा वापर करण्यात आला आहे. नदीपासून ३५९ मीटर उंचीवर हा पूल आहे. हा पूल १२० वर्षे टिकून राहील असे त्याचे डिझाईन बनवलेले आहे. भारतीय अभियंत्यांच्या कौशल्याचे हा पूल एक प्रतीक बनला आहे.

**वंदे भारत ट्रेन उद्यापासून सुरू**

दरम्यान, उत्तर रेल्वे शनिवार, ७ जूनपासून कटरा-श्रीनगर मार्गावर वंदे भारत ट्रेन सेवा सुरू हेणार आहे. आयआरसीटीसी वेबसाइटवर तिकीट बुकिंग करता येईल. कटरा आणि श्रीनगर दरम्यान आठवड्यातून ६ दिवस दोन गाड्या धावतील.उत्तर रेल्वेने सांगितले की ट्रेनमध्ये दोन प्रवास वर्ग आहेत. चेअर कारचे भाडे ७१५ रुपये आणि एक्झिक्युटिव्ह क्लासचे भाडे १३२० रुपये आहे. सध्या गाड्या फक्त बनिहाल येथे थांबतील, इतर थांब्यांचा निर्णय नंतर घेतला जाईल.

**१० तासांचा प्रवास सुमारे ३ तासांत**

स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांनंतरही, हिमवर्षावाच्या काळात काश्मीरचा देशाच्या इतर भागांशी संपर्क तुटलेला असतो. राष्ट्रीय महामार्ग-४४ बंद असल्याने, खोऱ्यात जाण्याचा मार्ग बंद आहे. याशिवाय, जम्मू ते काश्मीर रस्त्याने जाण्यासाठी ८ ते १० तास लागत होते. ट्रेन सुरू झाल्यानंतर, हा प्रवास सुमारे तीन तासांत पूर्ण होईल.

**ई-लिलाव अधिसूचना - स्क्रॅप**
**एमएस स्क्रॅप**
**लार्सन अँड टुब्रो लिमिटेड, तळेगाव, पुणे**
**- संकेतस्थळ -**
**www.auctionindia.com**
लिलावाची तारीख १०-०६-२०२५
**वेळ : दुपारी ०३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

## अरूण जेटलींना सांगून देश सोडला

म्हणजे मूळ कर्जाच्या दीडपटपेक्षा जास्त. मी २०१२ ते २०१५ या काळात चार वेळा सेटलमेंट ऑफर दिल्या, त्यात ५००० कोटींचा प्रस्तावही होता. पण बँकांनी तो नाकारला.
सीबीआयने त्यांच्यावर ब्रँड व्हॅल्युएशन आणि खासगी जेटच्या गैरवापराचे जे आरोप केले होते, ते माल्या यांनी नाकारले. ईडीने त्यांच्यावर ३५४७ कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंगचे आरोप लावले, पण माल्या म्हणतात, एअरलाइन्सच्या ५०% खर्चासाठी विदेशी चलन वापरणे मनी लॉन्ड्रिंग नाही. त्यांनी आयडीबीआय बँकेचे ९०० कोटींचे कर्ज फेडल्याचेही सांगितले.
माल्या २ मार्च २०१६ रोजी जिनिव्हामधील एफआयए मिटिंगसाठी लंडनला गेले. ते म्हणाले, मी अरुण जेटलींना सांगितले होते की मी जात आहे आणि सेटलमेंटची चर्चा करणार आहे. पण पासपोर्ट रद्द झाल्यामुळे अडकलो. मी पळपुटा नाही. ही काही पळून जाण्याची योजना नव्हती. मला चोर म्हणणे चुकीचे आहे, असा दावा त्यांनी केला.

## एका क्लिकवर मिळणार जात प्रमाणपत्र

संस्था) आणि टीसीएस (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) यांनी संयुक्तपणे प्रस्तावित प्रणाली विकसित केली आहे. यानुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व संबंधित विभागांना पुढील १०० दिवसांत कृती आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या आणि विमुक्त जमाती, इतर मागासवर्गीय तसेच विशेष मागास प्रवर्ग या सर्व घटकांतील नागरिकांना शासकीय नोकऱ्या, शिक्षणातील आरक्षण, निवडणुकीतील राखीव जागा आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक असते. मात्र, यासाठीची प्रक्रिया आतापर्यंत अत्यंत गुंतागुंतीची आणि वेळखाऊ होती. सरकारच्या या निर्णयाचा प्रत्यक्ष फायदा काय?
हजारो अर्जदारांचा वेळ, पैसे आणि श्रम वाचणार भ्रष्टाचाराला आळा बनावट कागदपत्रांवर नियंत्रण शैक्षणिक व शासकीय संधी मिळवण्यात मदत ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विशेष फायदा.

## महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल...

करावा आणि प्रस्ताव द्यावा आम्ही तयार आहोत., असं वक्तव्य अविनाश जाधव यांनी केलं होतं. 'आम्ही बोलून काही फरक पडणार नाही. दोन्ही भाऊ एकत्र आले तर मला काही प्रॉब्लेम नाही. मात्र त्यांची इच्छा असेल तर त्यांनी एकमेकांना फोन करावा. दोघांकडे एकमेकांचे नंबर आहेत. दोन्ही भावांनी एकत्र यावे की नाही हे त्यांनी ठरवावे. राज ठाकरे यांची इच्छा असेल ती माझी इच्छा असेल. पुढाकार कोणीही घ्यावा. मात्र मी घेऊ शकत नाही.' असं मोठं वक्तय राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांनी केलं होतं.

## राज्यात अतिवृष्टीचा धोका

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. शेतकऱ्यांचे १० जून पर्यंत शेत नाही तयार झाले तर १०, ११ आणि १२ जून तीन दिवस शेत तयार करायला पुन्हा चान्स मिळेल. राज्यात १३ ते १८ जून मुसळधार पाऊस पडणार आहे. ठिकठिकाणी ओढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे. गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. नदी नाले दुधतडी भरुन वाहत आहेत. दरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. तसेच काही भागात जास्त पाऊस पडल्यामुळे शेती पिकांचे देखील नुकसान झाले आहे. अशातच पुन्हा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आली आहे.
पूर्व विदर्भ, पश्चिमी विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणपट्टी, खान्देश, मराठवाडा सगळ्या विभागामध्ये ७, ८, ९ जून दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. पण त्याच्यानंतर १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान खूप मुसळधार पाऊस पडणार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी देखील होईल. म्हणजे ओढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या राजकीय सचिवाची ...

झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत गोविंदराज यांनी आरसीबीचा विजय साजरा करण्याची परवानगी देण्याचा आग्रह धरला होता. यावेळी पोलिस आयुक्तांनी तीन कार्यक्रमांना संमती देण्यास नकार देत विजय परेडला परवानगी देता येणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे गोविंदराज यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, असे मानले जाते. के. गोविंदराज यांची मुख्यमंत्र्यांच्या राजकीय सचिवपदी झालेली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात आली आहे. के. गोविंदराज यांना मुख्यमंत्र्यांच्या राजकीय सचिवपदावरून तात्काळ मुक्त करण्यात आले आहे.

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये
दुरध्वनी: ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक. १०६/२०२४-२५
पुणे, दिनांक : २७/०५/२०२५ | २९५

**अर्जदार**
"सुवर्ण आलय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित "
पत्ता : नवीन गट नं. २१०/२११/२/१, २१०/२११/२/२, २१०/२११/२/३, २१०/२११/२/४, (जुना गट नं. २१० व २११/२) च-होली खुर्द, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१२१०५
तर्फे अध्यक्ष : श्री. किरण छबीलाल पाटील, सचिव : श्री. राहुल सिताराम चौधरी
**विरुध्द**
१) मे. माहेश्वरी डेव्हलपर्स तर्फे भागीदार
अ. एस. व्ही जरे इंटरप्रायजेस तर्फे श्री. सचिन वसंत वाझे
रा. मनिषा हौ. सो., चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२११४
ब. अर्कय व्हेंचर्स तर्फे श्री रामकुमार जयराम शर्मा
रा. सेक्टर नं.२८, प्राधिकरण निगडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४४
जाब देणार
२) श्री. उमेश गणेश काटे
३) श्री. गणेश विठ्ठलराव काटे
४) सौ. रजनी गणेश काटे
५) श्री. राजाराम सखाराम गव्हाणे
६) श्री. संजय सखाराम गव्हाणे
७) सौ. वैशाली राजाराम गव्हाणे
८) सौ. सुषमा संजय गव्हाणे
पत्ता : नवीन गट नं. २१०/२११/२/१, २१०/२११/२/२, २१०/२११/२/३, २१०/२११/२/४, (जुना गट नं. २१० व २११/२) च-होली खुर्द, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१२१०५
वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम १९ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १६/०६/२०२५ रोजी दुपारी ३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक २७/०५/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही
**( प्रकाश ल. जगताप)**
सक्षम अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
पुणे, (ग्रामीण)

**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण तथा सक्षम प्राधिकारी यांचे समक्ष**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये
दुरध्वनी: ०२०-२६१२५७७९ ईमेल: ddrpunegramin@gmail.com

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक १०१/२०२४-२५
पुणे, दिनांक : २७/०५/२०२५ /२९४

**अर्जदार**
वृंदावन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
ग.नं. ०९, च-होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे - ४१२१०५
तर्फे, अध्यक्षः श्री सागर मारुती सावंत, सचिवः श्री इकाबल इलाई सुतार
**विरुध्द**
१) श्री लक्ष्मी बालाजी डेव्हलपर्स,
प्लॅट नं.०७, ग्रीन वुडस, भारती विदयापीठ, कात्रज, पुणे ४११०४६
तर्फे आधिकृत भागीदार
अ) श्री चंद्रशेखर विजयसिंह महाजन,
७/२/१,ग्रीन वुडस, भारती विदयापीठ, कात्रज, पुणे- ४११०४६
आ) श्री राहुल दिनकर पायगुडे,
स.नं.१०/०१,शिवशंकर कॉम्प्लेक्स, एनडीऐ रोड, देशमुखवाडी,
शिवणे ता.हवेली, जि.पुणे-४११०२३
इ) श्रीमती सुकन्या अनिल शिलंदर,
स.नं.३१/१,प्लॅट नं.४०१, ज्योती दर्शन ३, धनकवडी, पुणे-४११०४३
ई) श्री हेमंत वसंत पाटे,
प्रांजली,प्लॉट नं.५२,निवारा सोसायटी, श्रीधर नगर, धनकवडी, पुणे- ४११०४३
**जाब देणार**
२) अ) श्री दामोदर कोंडीबा जगताप
ब) श्रीमती लिलाबाई दामोदर जगताप
क) श्री संजय दामोदर जगताप
रा.सी-३, पंचरत्नेश्वर सहकारी गृहरचना संस्था, मोडक विहिर जवळ,
धनकवडी,पुणे-४११०४३
ड) श्रीमती शितल संजय जगताप,
रा. स.नं. ०७, देवमयी बंगला, मानसिंग रेसिडेंन्सीजवळ, तळजाई पठार,
धनकवडी, पुणे- ४११०४३
ई) श्री. दिपक धर्मा भोसले
उ) श्रीमती सुनिता दिपक भोसले,
ऊ) श्रीमती स्वाती दिपक भोसले, वरील सर्व रा. ४८१, घोरपडे पेठ, घोरपडे
उदयानसमोर, पुणे ४११०४२
वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम ११ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १६/०६/२०२५ रोजी दुपारी ३.३० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक २७/०५/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही
**( प्रकाश ल. जगताप)**
सक्षम अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
पुणे, (ग्रामीण)

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.१०४/२०२५/६४२

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
भिकनशेठ पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः स.नं. १/१अ/१अ/१+१/२अ, सी.टी.एस. नं. १३४७, १३५७ ते १३७१, दापोडी, पुणे ४११ ०१२ तर्फे - सचिव : श्री. अरुण गेणू कोकणे
**विरुध्द**
**गैरअर्जदार/जमिनमालक**
१. कै. भिकनशेठ गेणूजी काटे
रा. २/६, विजयराज, दापोडी, पुणे ४११ ०१२
यांचे कायदेशीर वारस
अ) श्री. विजय भिकनशेठ काटे, रा. २/६, विजयराज, दापोडी, पुणे ४११ ०१२
ब) श्री. राजेंद्र भिकनशेठ काटे, रा. २/६, विजयराज, दापोडी, पुणे ४११ ०१२
क) सौ. मालन अशोक जाधव, रा. ढोरे नगर, गल्ली नं. २, जुनी सांगवी, पुणे ४११ ०२७.
ड) सौ. शुभदा शरद ठोंबरे, रा. जयमाला नगर, गल्ली नं. १, शरद बंगला, हत्ती गार्डन शेजारी, जुनी सांगवी, पुणे, इ) सौ. अनुपमा भालचंद्र टिंगरे, रा. टिंगरेनगर, नगर रोड, आंबेडकर शाळेजवळ, धानोरी, पुणे ४११ ०१५. ई) सौ. रेखा दत्तात्रय ठाकर, रा. सुखदा गृहनिर्माण संस्था, BSNL ऑफिस जवळ, सहकार नगर, पुणे ३७.
२. मे. विजयराज कन्स्ट्रक्शन कंपनी, भागीदारी संस्था तर्फे
भागीदार श्री. भिकनशेठ गेणूजी काटे तर्फे कु.मु.
श्री. राजेंद्र भिकनशेठ काटे, ऑफिस पत्ता: २/६, विजयराज, दापोडी, पुणे ४११ ०१२.
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या भिकनशेठ पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं. १/१अ/१/१ + १/२अ, सी.टी.एस. नं. १३४७, १३५७ ते १३७१, दापोडी, पुणे ४११ ०१२ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.१०४/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०६/०५/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अधिकार पत्राव्दारे सचिन जगताप हजर.
गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ( ब, क, ड,इ,ई) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१(ब,क,ड,इ,ई) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ११/०६/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ( ब, क, ड, इ, ई ) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २६/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
**(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५**
दुरध्वनी : ०२० - २६१२५७७९ email : ddrpunegramin@gmail.com

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. १२८/२०२५

**जाहीर नोटीस**

**अर्जदार**
शार्विल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता:स.नं.६६/५/१,६६/५/२,६६/५/३,६६/५/४,६६/५५/५,६६/५/६,६६/५/७,६६/५/८, ६६/५/९,६६/५/१३, ६६५/२४, कात्रज कोंढवा रोड कोंढवा बु. पुणे- ४११०४८
तर्फे, अध्यक्षः श्रीमती. सुनिता राजेंद्र पांगारे,
सचिव : श्री. प्रितमकुमार दिलीप चव्हाण, खजिनदारः श्री. रामचंद्र तुलसीदास परूळेकर
**विरुध्द**
**गैरअर्जदार/जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. एम्पायर शेल्टर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ताः एवन कंपीटल १२०६ / बी शिवाजीनगर आपटे, रोड पुणे - ४११००४
तर्फे भागीदार, अ) श्री. अनिकेत रविंद्र कामत, ब) श्री. केदार संजीव खडक, क) श्री. श्रीरंग संजीव खडके अनु क अ ते क पत्ता. एवन कॅपीटल १२०६ / बी शिवाजीनगर आपटे रोड पुणे- ४११००४
जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. २
२) डि. जे. भागवत
१) गणेश प्रसाद भारंबे, २) अनिल लक्ष्मण कोद्रे, ३) प्रदिप शंकर काळे, ४) सुहास रामकृष्ण उडपीकर ५) शरद पुरुषोत्तम दावडा, ६) पी. व्ही. देशपांडे, ७) डी. एन. झिराळे, ८) नितीन वसंत देशपांडे ९) चारूदत्त गोपाळ तोफखाने, १०) अरूंधती सुर्यकांत पटवर्धन, ११) मंजिरी सुधीर गोखले १२) विनायक मनोहर अष्टेकर, १३) विदया रमेश धाराशिवकर, १४) रविंद्र धनंजय चौधरी १५) पी. एस. अंवीलढोड, १६) विद्या दत्तात्रय जुजन, १७) जी. जी देशमुख, १८) जयश्री सुरेश पाटील १९) चारुशिला निळकंठ केंजळे, २०) श्रीधर गोपाळ केतकर, २१) अमित योगेंक हिंदुजा जाव देणार अनु क २ वे २१ कात्रज कोंढवा रोड कोंढवा बु. पुणे- ४११०४८
( जाव देणार नं. २ ते २१ तर्फे कु. मु. धारक म्हणुन जा. देणार नं. १)
इतर संस्था / जाव देणार नं. ३
३. शार्विल सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः शार्विल सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, कात्रज कोंढवा रोड, कोंढवा बु. पुणे- ४११०४८.

२/-उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये शार्विल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता : स.नं.६६/५/१,६६/५/२,६६/५/३,६६/५/४,६६/५५/५,६६/५/६, ६६/५/७,६६/५/८,६६/५/९,६६/५/१३, ६६५/२४, कात्रज कोंढवा रोड कोंढवा बु. पुणे-४११०४८ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. १२८/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०६/०५/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अॅड. अदिती कुलकर्णी हजर.
गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १, २ (१ते२१) व ३ गैरहजर, गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१, २(१ते२१) व ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ११/०६/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १, २ (१ते२१) व ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २७/०५/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

# मध्यप्रदेशात २३० कोटींचा वेतन घोटाळा?

## ५० हजार शासकीय कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांपासून पगारच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**भोपाल :** मध्य प्रदेशात तब्बल ५० हजार शासकीय कर्मचाऱ्यांना गेल्या सहा महिन्यांपासून वेतनच मिळालेलं नाही. या कर्मचाऱ्यांची नावे अधिकृत कागदपत्रांमध्ये आहेत, त्यांचे कर्मचारी कोड आहेत, मात्र त्यांच्या खात्यावर वेतन जमा झालेले नाही. ही बाब उघड झाल्यानंतर मोठा वेतन घोटाळा समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. माध्यमांनी याबाबतचे वृत्त दिले आहे.

राज्याच्या अर्थ व कोषागार विभागाने केलेल्या नियमित डेटा विश्लेषणात ही विसंगती लक्षात आली, आणि वेळीच लक्ष देऊन त्यांनी एक संभाव्य मोठा घोटाळा टाळलेला असू शकतो. मात्र, हा विषय इतक्यावर थांबणार नाही. तपासणी पूर्ण होईपर्यंत यातील सत्य आणि संभाव्य भ्रष्टाचार किती खोलवर आहे, हे समजणे कठीण आहे.

मध्य प्रदेशाच्या कोषागार व लेखा विभागाचे आयुक्त भास्कर लक्ष्कार यांनी दिनांक २३ मे २०२५ रोजी राज्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवले. या पत्रात ज्यांचे वेतन डिसेंबर २०२४ पासून थांबले आहे अशा कर्मचाऱ्यांची यादी तपासण्याचे आदेश देण्यात आले. एकूण ५० हजार कर्मचारी असून यापैकी ४० हजार नियमित व १० हजार अनियमित (कंत्राटी/अस्थायी) कर्मचारी आहेत. सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे अंदाजे २३० कोटी रुपयांचे वेतन थांबवले गेले आहे.

मध्य प्रदेशाचे अर्थमंत्री जगदीश देवडा यांना यासंबंधी विचारणा केली, तेव्हा ते अस्वस्थ झाले. त्यांच्या प्रतिक्रिया अस्पष्ट होत्या - "सर्व प्रक्रिया नियमांनुसारच केली जाते... जे काही होईल, ते नियमांनुसारच होईल." त्यानंतर त्यांनी अधिक प्रश्नांना उत्तर दिले नाहीत.

या ५० हजार कर्मचाऱ्यांपैकी जर एकाही कर्मचाऱ्याचा तपशील खोटा निघाला, तर प्रशासनातील गंभीर त्रुटी उघडकीस येतील. हे 'घोस्ट' कर्मचारी आहेत, तर तयार वेतनावरून पैसे कोण घेत होते? खाती निष्क्रिय आहेत, पण त्यांचं 'एक्झिट' प्रक्रियेनुसार बंदही नाही, तर संभाव्य बनावट वेतन मागे जाऊन काढता येणार का? ९ % कर्मचारी नसताना सरकारी कार्यालयांचे कामकाज कसे चालू आहे? असे प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

संबंधित प्रणालीमध्ये या कर्मचाऱ्यांचे कोड अस्तित्वात असले तरी, त्यांची ओळख पडताळणी अपूर्ण आहे आणि कोणत्याही कर्मचाऱ्यांचा 'एक्झिट प्रोसेस' (सेवा समाप्ती) झालेला नाही.

### या संपूर्ण प्रकारामुळे अनेक गंभीर प्रश्न उभे राहतात

- वेतन थांबले, पण काम सुरू? की हे कर्मचारी अस्तित्वातच नाहीत?
- या कर्मचाऱ्यांनी खरोखर काम थांबवले आहे का? ते निलंबित आहेत का?
- की त्यांचा अस्तित्वच बनावट आहे – म्हणजेच हे 'घोस्ट एम्प्लॉईज' आहेत?
- कोषागार विभागाने सुरू केलेल्या राज्यव्यापी तपासात आदेश दिला आहे की त्यांनी आपल्या कार्यालयात कोणताही अनधिकृत कर्मचारी कार्यरत नसल्याची खात्री द्यावी.

### ९ टक्के कर्मचाऱ्यांना वेतन नाही

- **सुमारे ९ टक्के कर्मचाऱ्यांना वेतन न देण्याच्या समस्येने मोठ्या घोटाळ्याचे रूप धारण केले असून राज्यातील आतापर्यंतचा सर्वात मोठा वेतन घोटाळा असल्याचे मानले जात आहे. वेतन न मिळालेल्या ५० हजार कर्मचाऱ्यांपैकी ४० हजार नियमित कर्मचारी तर १० हजार तात्पुरते कर्मचारी आहेत. या सर्वांचे वेतन सुमारे २३० कोटी रुपये आहे, जे त्यांना गेल्या ६ महिन्यांपासून देण्यात आलेले नाही. अशा तऱ्हेने मोठा घोटाळा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**

# ईएमआय'चा भार कमी होणार

## रेपो दरात कपात

रिझर्व्ह बँकेने सर्वसामान्यांना पुन्हा एकदा दिलासा देत 'ईएमआय'चा भार कमी केला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी रेपो दरात ५० बेसिस पॉईंट्सची कपात करण्याची घोषणा केली. यानंतर आता रेपो दर ५.५० टक्क्यांवर आला आहे. यापूर्वीही रिझर्व्ह बँकेने सर्वसामान्यांना दिलासा देत रेपो दरात कपात केली होती.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दरम्यान, रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीपूर्वी तज्ज्ञांनी रेपो दरात कपातीची शक्यता वर्तवली होती. जागतिक बाजारांमध्ये अनिश्चितता असतानाही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत आहे. गुंतवणूकदारांसाठीही भारतीय शेअर बाजारात अनेक संधी आहेत, असे संजय मल्होत्रा म्हणाले.

५० बेसिस पॉइंट्सनी रेपो रेट कमी करण्याचा आरबीआयचा निर्णय हा एक उत्तम आणि महत्त्वाचा निर्णय आहे. हे रिझर्व्ह बँकेची आर्थिक स्थिरता आणि विकासाच्या पाठपुराव्यावरील विश्वास देखील दर्शवते. रेपो दर ५.५% पर्यंत कमी केल्याने कर्ज देण्याच्या परिसंस्थेवर मोठा परिणाम होईल, ज्यामुळे गृहकर्जाचे व्याजदर ७.७५% च्या खाली येतील. विद्यमान आणि संभाव्य गृहखरेदीदारांसाठी हा एक महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे, अशी प्रतिक्रिया नाहर ग्रुपच्या उपाध्यक्षा आणि एनएआरईडीसीओ-महाराष्ट्रच्या वरिष्ठ उपाध्यक्षा मंजू याज्ञिक यांनी दिली.

आज १.२० ते दीड लाखापर्यंत चांगल्या रेंजच्या इलेक्ट्रीक स्कूटर किंवा मोटरसायकल मिळतात. जर तुमच्याकडे पेट्रोल स्कूटर किंवा बाईक असेल तर वापरले जाणारे पेट्रोलही तुम्ही वाचवू शकता. जर तुम्हाला नवीन स्कूटर घ्यायची असेल, रनिंग जास्त आहे. यामुळे सध्या आहे ती पेट्रोल दुचाकी परवडत नाहीय तर मग तुम्ही तिच्या ऐवजी इलेक्ट्रीक स्कूटर, मोटारसायकल घेऊ शकता.

तसेच पेट्रोलवरील दर महिन्याचा होणारा खर्च वाचवू शकता. आता ही स्कूटर कर्जावर घेतली तरी देखील थोडे गणित बदलले तरी तुम्ही ब-यापैकी पैसे वाचवू शकणार आहात.

### व्याजापोटीचे १.४८ लाख वाचणार

- रिझर्व्ह बँकेने बँकांना देत असलेल्या कर्जावरील म्हणजेच रेपो दरात ०.५० टक्क्यांची कपात केली आहे. यामुळे हा रेपो रेट ५.५० टक्के झाला आहे. म्हणजेच बँकांना आरबीआयला कमी दराने व्याज द्यावे लागणार आहे. याचाच फायदा ग्राहकांनाही होणार आहे. तुम्ही नवीन व्याजदराने बँकेकडून कर्ज घेतले किंवा व्याजदर कपात करायला लावली तर तुम्ही व्याजावर खूप पैसे वाचवू शकणार आहात. उदा. तुम्ही २० लाखांचे कर्ज २० वर्षांसाठी घेतले असेल तर तुम्ही व्याजापोटी द्यावे लागणार असलेले १.४८ लाख रुपये वाचवू शकणार आहात. हे १.४८ लाख रुपये तुम्ही दुसरीकडे कुठेतरी वापरून त्यातूनही पैसे वाचवू किंवा कमवू शकता. कुठेतरी गुंतविले तर तुम्हाला ७ ते ८ टक्के व्याज मिळू शकते. परंतू, त्याहून अधिक फायदा हवा असेल तर तुम्ही तुमच्यासाठी ईलेक्ट्रीक स्कूटर, बाईक घेऊ शकता.

# स्वेच्छेने केलेल्या धर्मांतराला आक्षेप नको

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे विधान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** आपल्या सुरक्षेसाठी आपण आत्मनिर्भर झालं पाहिजे. आपल्या 'स्व'वर आपण निर्भर असले पाहिजे. त्यासाठी आपले सैन्य, शासन-प्रशासनासोबत समाजाचे बळ असणे आवश्यक आहे. पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर करण्यात आलेल्या कारवाईने देशाचं संरक्षण आणि संरक्षणात्मक सामर्थ्याची क्षमता सिद्ध झाली आहे. या निमित्ताने शासन आणि प्रशासनातील दृढता सुद्धा दिसली आहे, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले आहे. तसेच स्वइच्छेने केलेल्या धर्मांतराला आक्षेप घेऊ नये, असे मोठे विधान त्यांनी केले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नागपूर येथे कार्यकर्ता विकास वर्ग (द्वितीय)चे आयोजन केले होते. दोन दिवस चालणा-या या वर्गाचा काल समारोप झाला. याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री आणि सामाजिक कार्यकर्ते अरविंद नेतामही उपस्थित होते. तसेच मंचावर विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, वर्गाचे सर्वाधिकारी समीर कुमार महांती आणि नागपूर महानगर संघसंचालक राजेश लोया उपस्थित होते. यावेळी मोहन भागवत यांनी हे महत्त्वाचे विधान केले.

पहलगाममध्ये झालेल्या नृशंस हल्ल्यानंतर देशभरात आक्रोशाची लाट होती. गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळावी ही लोकांची अपेक्षा होती. हा हल्ला करणा-यांवर आपण कठोर कारवाई केली सुद्धा. ही कारवाई करताना देशाच्या संरक्षणात्मक सामर्थ्याची क्षमता सिद्ध झाली. यावेळी शासन आणि प्रशासनाचा निर्धारही पाहिला. संपूर्ण समाजात अभूतपूर्व एकतेचे वातावरण दिसले. राजकीय मतभेद विसरून सर्वांनी एकमेकांना साथ देण्याचे काम केले. देशभक्तीच्या वातावरणात आपण आपले सर्व मतभेद बाजूला ठेवले. देशाचे हे चित्र चिरस्थायी राहिले पाहिजे. पण या कारवाईनंतरही समस्या संपलेली नाही. संकट अजून कायम आहे असे मोहन भागवत म्हणाले.

# रिझर्व्ह बँकेच्या बुस्टरमुळे बाजारात उसळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रिझर्व्ह बँकेच्या सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीने (एमपीसीने ) ६ जून रोजीच्या धोरण आढाव्यात रेपो दर ५० बेसिस पॉइंट्सने तर सीआरआर १०० बेसिस पाईंट्सने कमी केले. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. या घोषणेचा सकारात्मक परिणाम भारतीय शेअर बाजारावर दिसला.

सेन्सेक्समध्ये ७४६.९५ अंकांची वाढ होऊन तो ८२,१८८.९९ वर बंद झाला. तर निफ्टीने २५००० चा टप्पा ओलांडला. निफ्टी निर्देशांकामध्ये २५२.१५ अंकांची वाढ होऊन तो २५००३.०५ वर बंद झाला. निफ्टीमधील ही वाढ १.०२ टक्के तर सेन्सेक्समधील वाढ ०.९२ टक्के इतकी आहे.

निफ्टी बँक ८१७.५५ अंकांनी वाढीसह ५६५७८ वर बंद झाला, तर निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांकात ७०७.३० अंकांनी वाढ होऊन तो ५९०१०.३० वर बंद झाला. चलन बाजारात भारतीय रूपयाचा अमेरिकन डॉलरशी विनियम दर ८५.६३ इतका होता. १६ पैशांनी त्यात वाढ नोंदवली गेली. शुक्रवारी शेअर बाजाराची सुरुवात लाल रंगाने झाली. बेंचमार्क निर्देशांक किंचित घसरणीसह लाल रंगात घसरले होते. सेन्सेक्स, निफ्टी, बँक निफ्टी यांनी घसरगुंडी अनुभवली. मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्स तेजीत होते. त्यानंतर आरबीआयच्या पत्रकार परिषदेला सुरवात झाली.




शिकागो अमेरिकेतील शिकागो येथे स्थलांतरितांवर होणाऱ्या कारवाई विरोधात निदर्शने सुरू असता, सुरक्षा यंत्रणांनी निदर्शकांना रोखले.

# बेंगुळुरू चेंगराचेंगरीची न्यायालयीन चौकशी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी सिद्धरामय्या सरकारने बेंगळुरूचे पोलिस आयुक्त बी. दयानंद यांच्यासह अनेक पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित केले असून आता मुख्यमंत्र्यांनी चेंगराचेंगरीची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी कर्नाटक उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती जॉन मायकेल कुन्हा यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय आयोग स्थापन केला आहे. खुद्द मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली आहे.

निवृत्त न्यायमूर्ती जॉन मायकेल कुन्हा २०१४ मध्ये चर्चेत आले होते, जेव्हा खासदारांवरील खटल्यांची सुनावणी करण्यासाठी विशेष न्यायाधीश म्हणून त्यांनी तामिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री जयललिता यांना बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात दोषी ठरवले होते. नोव्हेंबर २०१६ मध्ये त्यांची कर्नाटक उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. नोव्हेंबर २०१८ मध्ये त्यांना पुन्हा तेथे कायमस्वरूपी न्यायाधीश करण्यात आले. २०२१ मध्ये ते या पदावरून निवृत्त झाले.



एसडीएम लॉ कॉलेजमधून पदवी घेतलेल्या जॉन मायकेल डिकुन्हा यांनी १९८५ मध्ये प्रॅक्टिस सुरू केली. पुढे ते बेंगळुरूला गेले आणि कर्नाटक उच्च न्यायालयात वकिली करू लागले. त्यानंतर २००२ मध्ये त्यांनी न्यायाधीश म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी आपल्या कार्यकाळात बेल्लारी, धारवाड, हुबळी आणि बंगळुरू जिल्ह्यातील न्यायालयात काम केले. त्यानंतर २०१६ मध्ये ते उच्च न्यायालयात गेले.

बेंगळुरू चेंगराचेंगरीच्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी करणारी जनहित याचिका कर्नाटक उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. ४ जून रोजी झालेल्या या दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता, तर ५६ जण जखमी झाले होते. बुधवारी संध्याकाळी स्टेडियमसमोर चेंगराचेंगरी झाली, जिथे आरसीबी संघाच्या आयपीएल (इंडियन प्रीमियर लीग) विजयाच्या जल्लोषात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने लोक जमले होते.



**कोटा (राजस्थान) :** बुंदी जिल्ह्यातील धनत्री गावात 5 आणि 6 जूनच्या मध्यरात्री एका अल्पवयीन दाम्पत्याने आत्महत्या केली. शुक्रवारी सकाळी त्यांचे मृतदेह सापडल्यानंतर शवविच्छेदनानंतर ते संबंधित कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले. त्यांचे वय अनुक्रमे १९ आणि १७ वर्षे होते आणि ते बुंदी जिल्ह्यातील तालेरा पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या गावचे रहिवासी होते.

## दिल्लीतील ई-रिक्षा कारखान्याला भीषण आग



**नवी दिल्ली :** दिल्लीतील घोंडा परिसरातील एका ई-रिक्षा फॅक्टरीला शुक्रवारी दुपारी आग लागली. अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या चार्जिंग स्टेशनला दुपारी २ वाजून ४९ मिनिटांनी आग लागली. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.

## आंध्र प्रदेशात वादळी वाऱ्याची शक्यता



**अमरावती :** आंध्र प्रदेशातील काही भागात ६ जूनपासून सात दिवस वादळी वाऱ्यासह ताशी ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. उत्तर किनारपट्टीआंध्र प्रदेश (एनसीएपी), यनम, दक्षिण किनारपट्टी आंध्र प्रदेश (एससीएपी) आणि रायलसीमा येथे तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. वादळी वाऱ्याबरोबरच शुक्रवारी एनसीएपी आणि यानममध्ये तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट आणि ७ आणि ८ जून रोजी किनारपट्टीभागात उष्ण, दमट वातावरण राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

## क्वांटम रिसर्च पार्कला कर्नाटक मंत्रिमंडळाची मंजुरी

**बेंगळुरू :** क्वांटम तंत्रज्ञानात कर्नाटकला जागतिक स्तरावर अग्रेसर बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकत राज्य मंत्रिमंडळाने बेंगळुरूयेथील आयआयएससी येथे क्वांटम रिसर्च पार्क फेज-२ च्या स्थापनेला मंजुरी दिली आहे, अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी/बीटी मंत्री प्रियांक खर्गे यांनी गुरुवारी दिली. ४८ कोटी रुपयांच्या सरकारी अनुदानातून फाऊंडेशन फॉर सायन्स, इनोव्हेशन अँड डेव्हलपमेंट (एफएसआयडी) यांच्या सहकार्याने हे उद्यान विकसित केले जाईल, अशी घोषणा त्यांनी एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर केली. या उपक्रमामुळे क्वांटम रिसर्च, स्किल बिल्डिंग आणि इनोव्हेशनमध्ये कर्नाटकचे नेतृत्व मजबूत होईल. यामुळे शैक्षणिक, स्टार्टअप्स आणि उद्योगांना अत्याधुनिक क्वांटम तंत्रज्ञानावर काम करण्यासाठी सहकार्याची जागा उपलब्ध होईल.

## निलंबित कॉन्स्टेबलसह चौघांना अटक

**समस्तीपूर :** बिहार पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने (एसटीएफ) शुक्रवारी समस्तीपूर जिल्ह्यातून दोन जणांच्या हत्येचा कट रचल्याच्या आरोपाखाली निलंबित कॉन्स्टेबलसह चौघांना अटक केली. एसटीएफने त्यांच्याकडून एक एके-४७ रायफल, चार मॅगझिनसह एक इन्सास रायफल आणि ७० जिवंत काडतुसे, एक रायफल आणि डबल बॅरल बंदूक आणि ६० हून अधिक जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. याशिवाय निलंबित कॉन्स्टेबलच्या घरातून अनेक स्थावर मालमत्तेची कागदपत्रेही जप्त करण्यात आली आहेत. सरोज सिंह (निलंबित पोलीस कॉन्स्टेबल), निशांतकुमार राय, परशुराम सिंह आणि मुन्ना यादव अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

## ग्रामपंचायत उंब्रज न.२ च्या उपसरपंच पदी सुधीर हांडे



**ओतूर :** उंब्रज नं.२ (ता. जुन्नर)येथील ग्रामपंचायत उपसरपंचपदी सुधीर विठ्ठल पा.हांडे यांची बिन विरोध निवड करण्यात आली असल्याची माहिती ग्रामसेवक ज्योती नरसाळे यांनी दिली. नोव्हेंबर २०२२ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकी मध्ये रेखा हांडे यांची लोकनियुक्त सरपंचपदी निवड झाली होती.तसेच डॉ.पोपट चौधरी यांची उपसरपंचपदी निवड झाली होती त्यांचा अडीच वर्षाचा कार्यकाळ संपल्या नंतर एप्रिल २०२५ मध्ये पोपट चौधरी यांनी राजीनामा दिला ४ जून रोजी झालेल्या उपसरपंच निवडणुकीत ग्रामपंचायत सदस्य सुधीर विठ्ठल पा.हांडे यांची सर्वानुमते उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी सरपंच रेखा हांडे, ग्रामपंचायत सदस्य डॉ.पोपट चौधरी,सुधीर पा.हांडे,विशाल चौधरी,संतोष जाधव,सदस्या शिला हांडे,शोभा हांडे,सुनीता रसाळ,निवडणुक अधिकारी म्हणून ग्रामसेवक ज्योती नरसाळे यांनी काम पाहिले. नव निर्वाचित उपसरपंच सुधीर हांडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जेजुरीच्या स्मशानभूमीत केले वृक्षारोपण



**जेजुरी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जेजुरी येथील कैलास स्मशानभूमीत सदानंद चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने विविध प्रकारची १८० झाडे लावण्यात आली. जेजुरी येथील कैलास स्मशानभूमी वृक्षांचे नंदनवन म्हणून ओळखले जाते. गेली दोन तीन वर्षात येथील वृक्षांची संख्या कमी झाली होती. जेजुरी येथील सदानंद चॅरिटेबल फाउंडेशनने पुन्हा एकदा या स्मशानभूमीत वृक्षराजी फुलविण्याचा संकलप करून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण व व वृक्ष संवर्धन मोहीम हाती घेतली आहे. गुरुवारी कैलास स्मशानभूमीत जेजुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगूले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सदानंद चॅरिटेबल फाउंडेशनचे गणेश आबनावे, सुनील बारभाई, बाळासाहेब काळे, बाळासाहेब खोमणे, आदित्य खोमणे, जॉन्टी राऊत, अक्षय माळवदकर, गोपाळ मोहरकर, राजेंद्र गाढवे, बाळासाहेब दोडके, सुदर्शन काळेल, ज्ञानेश्वर जाधव उपस्थित होते. सदर झाडांचे संगोपन सदानंद चॅरिटेबल फाउंडेशन यांच्या वतीने करणार असल्याचे फाउंडेशनचे गणेश आबनावे यांनी सांगितले.

## निवडणुकीच्या पराभवाचा राग मनात धरून मारहाण



**रांजणगाव गणपती :** निवडणुकीच्या पराभवाचा राग मनात धरून मारहाण केल्याची घटना रांजणगाव येथे घडली असून, याबाबत अभिजीत नंदू बत्ते (वय २९, व्यवसाय शेती रा. रांजणगाव गणपती) यांनी पोलीस स्टेशनला फिर्यादी दिली आहे. आकाश संजय बत्ते, विकास संजय बत्ते अशी मारहाण केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत सविस्तर वृत्त असे की, ४ जून रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास रांजणगाव येथे अभिजीत नंदू बत्ते यांच्या घरासमोर निवडणुकीमध्ये पराभव झाल्याचा मनात राग धरून आरोपी आकाश संजय बत्ते याने लोखंडी तलवारीने तर विकास संजय बत्ते याने दगडाने मारहाण तसेच शिवीगाळ केली. याबाबत रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## रस्त्याला गाडी उभी केल्यावरून मारहाण



**रांजणगाव गणपती :** रस्त्याला गाडी उभी केल्याच्या कारणावरून दगडाने व लोखंडी रॉड ने मारहाण केली असल्याची माहिती रांजणगाव पोलिसांनी दिली. या बाबत आकाश संजय बत्ते (वय ३०, रा. रांजणगाव गणपती) यांनी फिर्याद दिली आहे. या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रांजणगाव येथे ४ जून रोजी सकाळी साडे दहा वाजता रांजणगाव येथे यातील आकाश बत्ते यांनी आरोपी अभिजित नंदू बत्ते यास तुझी क्रेटा ही रस्त्यावर उभी का केली, ती बाजूला घे असे म्हणाल्याच्या कारणावरून आरोपी अभिजीत नंदू बत्ते, अनिकेत नंदू बत्ते, नंदू आनंदराव बत्ते यांनी शिवीगाळ केली, तसेच लाथा बुक्क्यांनी, लोखंडी रॉडने व दगडाने मारहाण केली. फिर्यादी यांचा भाऊ विकास यास नंदू बत्ते याने दुखापत केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

## हिरवे सोने



सासवड नुकत्याच पडलेल्या पावसाने डोंगर दऱ्याखोऱ्यातील खेड्यापाड्याचे रुपडे बदलून गेले आहे. जयाद्री डोंगर कुशीतील साकुर्डे गावाचे हे मनमोहक दृश्य डोळ्यांना सुखावणारे असेच. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे.)

## कऱ्हेच्या पात्रात जलआंदोलन

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळ प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही यासाठी प्रकल्प बाधित गावातील शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात तब्बल आठ वर्षांपासून लढा पुकारला असून तो लढा अद्याप सुरूच आहे. दरम्यान, प्रकल्पाला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने गुरुवारी कऱ्हा नदीच्या पात्रात जलआंदोलन करून शासनाचा निषेध केला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, पारगाव अशा सात गावात शासनाकडून आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प प्रस्तावित असून सध्या या गावातील भूसंपादनची प्रक्रिया सुरु आहे. शासनाने प्रकल्प बाधित गावातील जमिनीच्या सातबारा उतारा वर ३२/२ चे शेरे मारल्यानंतर सातही गावातील शेतकऱ्यांकडून हरकती मागून घेतल्या आहेत. यामध्ये दोन हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी हरकत घेतली असून या शेतकऱ्यांना आठवडाभरात पुन्हा नोटीस पाठवून त्यावर सुनावणी घेण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाकडून राबविण्यात येणार आहे. दरम्यान, विमानतळ प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध आजही सुरूच असून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी वृक्ष लागवड करून कऱ्हा नदी बचाव तसेच कऱ्हा नदीच्या पात्रात बसून जल आंदोलन केले.

# मुख्यमंत्री घेणार 'माळेगाव'चा निर्णय?

## वाद मिटविण्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा होण्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** सध्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापू लागले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि चंद्रराव तावरे व रंजन तावरे या गुरू- शिष्यांची जोडी या पारंपरिक विरोधक असलेल्यांनी निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र, मिळालेल्या माहितीनुसार हा पारंपरिक वाद संपविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामध्ये वरिष्ठ पातळीवर चर्चा झाली तर काही समेट होऊन दोन्ही विरोधक एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. किती पॅनल होणार? कुणाचे होणार? याबाबत सभासदांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत १२ जून पर्यंत आहे. चंद्रराव तावरे व रंजन तावरे यांनी संभाव्य उमेदवारांसह कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावामध्ये जाऊन प्रचाराचा धडाका लावला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने कार्यकर्त्यांचा मेळावा घेत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अद्यापपर्यंत गावोगावी जाऊन प्रचारास सुरुवात केली नसल्याचे चित्र आहे. सांगवी येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात चंद्रराव तावरे यांनी सत्ताधाऱ्यांकडून समेटासाठी प्रयत्न झाल्याचे सांगितले, तर रंजन तावरे यांनी विरोधकांवर सडकून टीका करत सत्ताधाऱ्यांच्या कारभाराचे वाभाडे काढले. यावर उत्तर देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेमध्ये सर्व गोष्टींचा खुलासा करत सत्ताधारी संचालक मंडळाने चांगले काम केल्याची भूमिका स्पष्ट केली.

विरोधकांनी प्रचाराची एक फेरी पूर्ण करत दुसरी सुरू केली तरी,



सत्ताधाऱ्यांनी अद्याप प्रचारास सुरुवात केली नसल्याचे चित्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार वरिष्ठ पातळीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून या निवडणुकीसाठी तडजोड करण्याची भूमिका घेतील, अशी माहिती मिळत आहे. शरद पवार गटाच्या वतीने कार्यकर्त्यांचा मेळावा घेत सभासदांमध्ये जाऊन भूमिका स्पष्ट करण्याचे संकेत दिले आहेत, तर कष्टकरी शेतकरी समितीने यापूर्वीच प्रचाराला सुरुवात केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी



श्री छत्रपती साखर कारखान्याच्या निवडणुकीत विरोधकांना बरोबर घेत कारखाना पूर्वपदावर आणण्याची भूमिका घेतली आहे, त्याच धर्तीवर माळेगावच्या निवडणुकीत अजित पवार हे विरोधकांना एकत्र घेत केंद्र तसेच राज्य शासनाच्या मदतीने कारखान्याला सर्वतोपरी मदत करतील, असे मानले जाते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी युतीधर्म पाळत चंद्रराव तावरे व रंजन तावरे यांनी अजित पवारांच्या उमेदवारांचा प्रचार केला. त्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत अजित पवारांनी दिलेला शब्द पाळला नाही, त्यामुळे कारखाना निवडणुकीत तडजोडीबाबत चंद्रराव तावरे अनुकूल नाहीत, तथापि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णायक भूमिका बजावली तर मात्र सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये समेट घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## दरोड्यासाठीची शस्त्रे आढळल्याने खळबळ



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** रानडुकरांनी शेतातील पिकांची केलेली नासाडी पाहण्यासाठी गेलेल्या शिंदवणे (ता. हवेली) येथील एका दांपत्याला दरोडा टाकण्यासाठी वापरण्यात येणारी शस्त्रे आढळून आली. दोन काळ्या रंगाच्या पिशवीत ही शस्त्रे आढळून आली असून, या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून भीतीचे वातावरण पसरले आहे.

या पिशवीत दरोडा टाकण्यासाठी वापरण्यात येणारे चॉपर, चाकू, स्क्रू ड्रायव्हर, हातमोजे, मोठ्या पकडी, लहान पकड, कटावणी, वाकडा कोयता, कटर, मास्क, एक पावसाळी जर्किन, पोपट पाना आदी साहित्य आढळून आले.

मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या शेतात सध्या मक्याचे पिक आहे. त्यांच्या पत्नी या शेतात मका या पिकाची पाहणी करीत होत्या. शेतातील मका पिकाचे रानडुकरांनी नुकसान केल्याचे दिसून आले. यावेळी त्यांना शेतातील एका ठिकाणी दोन काळ्या रंगाच्या पिशव्या दिसल्या. त्यांनी त्या दोन्ही पिशव्या मका पिकातून बाहेर काढल्या व बांधावर नेऊन ठेवल्या. सदरची माहिती त्यांच्या पतीला सांगितली. त्यांचे पती गोरख कुंजीर हे शेतात आले असता त्यांनी पिशवी उघडून पाहिले असता पिशवीत चॉपर, चाकू, स्क्रू ड्रायव्हर, हातमोजे, मोठ्या पकडी, लहान पकड, कटावणी, वाकडा कोयता, सुरा, कटर, मास्क, एक पावसाळी जर्किन, पोपट पाना, आदी साहित्य आढळून आले.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांची सासवडमध्ये बाईक रॅली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** जनसामान्यांशी निगडीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी अर्थात महावितरणने विद्युत सुरक्षा, होणारे अपघात, विजेची बचत या अनुषंगाने १ जून ते ६ जून या कालावधीत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन केले आहे. या अभियानांतर्गत सासवड महावितरण शाखेने गुरुवारी सासवड शहरातून एका जनजागृती बाईक रॅलीचे आयोजन केले होते.

या रॅलीत मोठ्या संख्येने मोटारसायकलवर कर्मचारी हातात जागृतीचे फलक घेऊन सहभागी झाले होते. "आम्ही सुरक्षेचे शिल्पकार शून्य अपघाताने करू महावितरणचे स्वप्न साकार" अशा स्वरुपातील या रॅलीने महावितरण कार्यालय, जेजुरी नाका, पोलिस स्टेशन, नगर पालिका, हडको वसाहत, रिलायन्स पंप, त्रिशूल सोसायटी, सोनोरी रोड, पंचायत समिती व परत मूळ ठिकाणी अशी रॅली काढून सर्वसामान्याच्यात प्रबोधन केले.

महावितरणचे अपघात प्रमाण कमी झाले आहे तरीही लहान मुले, सर्व सामान्य नागरिक यांच्यात हे प्रमाण अधिक आहे त्यासाठी या जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अभियंता भालचंद्र गवई यांनी दिली.

आजच्या रॅलीत नितीनकुमार पवार, गणेश चांदणे, अनंत पवार, वाघमारे आदी अधिकारी व मोठ्या संख्येने कर्मचारी, जनमित्र सहभागी झाले होते.



# सासवड नगरपालिकेचे एसटी आगारात वृक्षारोपण




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पर्यावरणचे रक्षण करा, झाडे लावा झाडे जगवा, प्लास्टीक वापर टाळा, वसुंधरेचे वैभव जपा अशा स्वरुपातील विचारधारा स्वीकारत सासवड येथील एस टी स्टँड परिसरात गुरुवारी (दि. ५) जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. पालिका मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण, सासवड एसटी आगार प्रमुख सागर गाडे यांसह एसटी व नगरपालिका अधिकारी, कर्मचारी व प्रवाशी या प्रसंगी उपस्थित होते. एसटी स्थानक हे शहराचे प्रवेशद्वार समजले जाते त्या अनुषंगाने हा परिसर हरित व स्वच्छ ठेवण्याचा संकल्प या प्रसंगी करण्यात आला.

सासवड नगरपालिकेचे मोहन चव्हाण, संकेत नंदवंशी गजानन नरवाडे, निखिल कांचन, जावेद मुल्ला, बजरंग जगताप, सविता जगताप, हेमलता शिंदे, सुवर्णा ठोके, जस्मिन मधाळे, सुलोचना हालसे, ओंकार शिंदे यांसह अन्य कर्मचारी त्याच प्रमाणे एस टी आगारातील महेश भोंगळे, विकास काकडे, पोपट जैनक, संतोष शिंदे, शशिकांत चव्हाण, संतोष दुधाळ, विजय कोलते, पुरंदर नागरी पतसंस्थेचे अनिल उरवणे, पथारी संघटनेचे गुलाब सोनावणे यांसह अनेक मान्यवर, प्रवाशी या प्रसंगी उपस्थित होते.

शहर समन्वयक राम कारंडे यांनी यावेळी उपस्थितांना शपथ दिली, तर एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे सचिव हेमंत ताकवले यांनी पर्यावरण व वृक्ष लागवड यांच्याविषयी मनोगतातून महत्व पटवून दिले.



वाळू कारवाईत जप्त केलेल्या बोटी.

## उजनीत कारवाई: वाळूचोरांना दणका

**इंदापूर :** पोलीस व महसूल खात्याच्या संयुक्त पथकाने वाळूचोरांवर धडक कारवाई करत गुरुवारी कांदलगावच्या हद्दीतील सोनवणेवस्ती लगत भीमा नदीच्या पात्रात दोन फायबर व दोन सक्शन बोटी पकडून ब्लास्टिंग करुन नष्ट केल्या. या कारवाईमुळे वाळू चोरांना सुमारे २४ लाख रुपयांना दणका बसला आहे. सकाळी अकरा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ही कारवाई सुरु होती. तहसीलदार जीवन बनसोडे, नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, पोलीस पाटील, पोलीस कर्मचारी नंदू जाधव यांनी कारवाईत भाग घेतला.

## रांजणीतील नरसिंह मंदिराला इस्कॉनच्या भक्तगणांची भेट



**पारगाव :** रांजणी (ता. आंबेगाव) येथील नरसिंह मंदिराला भोसरी येथील इस्कॉनच्या दोनशेहून अधिक भक्तगणांनी गुरुवारी (दि. ५) भेट दिली. मंदिराची माहिती घेऊन श्री नरसिंह महाराजांची अख्यायिका जाणून घेतली. रांजणी ग्रामस्थांनी सुमारे तीन कोटी रुपये लोकवर्गणीतून खर्च करून नरसिंह मंदिराचा जीर्णोद्धार केला. राज्याच्या कानाकोपऱ्यातून नरसिंह भक्त मोठ्या संख्येने रांजणी गावातील नरसिंह मंदिराला भेट देऊन नरसिंह महाराजांचे दर्शन घेतात. गुरुवारी सकाळी भोसरी येथील इस्कॉनच्या दोनशेहून अधिक भक्त जणांनी रांजणीत येऊन नरसिंह मंदिराची पाहणी केली. मंदिराचे पुजारी श्रीनिवास ब्रम्हे यांनी श्री नरसिंह महाराजांचे भक्त लखोजी महाराजांच्या कार्याची माहिती दिली. त्यानंतर त्यांनी रांजणी गावातून भव्य नगर प्रदक्षिणा काढली. यामध्ये महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.टाळ मृदंगाच्या तालावर हे भक्तगण भक्तीरसात न्हाऊन निघाले. नगर प्रदक्षिणा घातल्यानंतर नरसिंह मंदिरात प्रवचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर रांजणी ग्रामस्थांच्या वतीने आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रांजणीतील सीमा बढेकर ,अलका घोलप, आशा गायकवाड यांनी भक्तगणांचे स्वागत केले. कार्यक्रमाची व्यवस्था श्री लक्ष्मी - नरसिंह देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आली.

## प्रसिध्दी प्रमुखपदी दत्ता भोंगळे यांची निवड



**जेजुरी :** पुरंदर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक दत्ता भोंगळे यांची अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्याच्या प्रसिध्दी प्रमुखपदी निवड करण्यात आली. अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर यांनी त्यांची निवड जाहिर केली. आर. जे केदार (जोशी) यांच्या हस्ते हे पत्र देण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर, चॅरिटेबल ट्रस्टचे दत्ता सूर्यवंशी, अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्षा सुजाता गुरव, ट्रस्टच्या पुणे जिल्हा कायदेशीर सल्लागार वकील अर्चना भैरवकर, चॅरिटेबल ट्रस्ट पुणे जिल्हा अध्यक्ष राणी भंडलकर ट्रस्ट जेजुरी शहर अध्यक्ष मयुरी जरांडे, पंकज धिवार, सुभाष सुर्यवंशी, मंगेश गायकवाड, राजेंद्र धोत्रे, अतुल पवार, इजाज पानसरे,आदी उपस्थित होते.

## इंदापूरात लोकअदालतीचे ९ तारखेला आयोजन

**इंदापूर :** उपविभागीय अधिकारी कार्यालय बारामती व इंदापूर तहसीलदार कार्यालयांमध्ये सोमवारी 'महसूल लोकअदालत' आयोजित केली आहे. महसूल न्यायप्रक्रियेतील प्रलंबित दाव्यांना सामंजस्याने आणि तडजोडीतून न्याय मिळवून देण्यासाठी लोकअदालत पार पडणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली. महसूल विभागात उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, यांच्याकडे दावे अनेकदा वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. न्याय मिळवण्यासाठी नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. मात्र, या लोकअदालतीत दोन्ही पक्षकारांचे एकमत झाल्यास तडजोडीतून दावे निकाली काढले जाणार आहे. ही महसूल लोक अदालत उपविभागीय अधिकारी कार्यालय बारामती व तहसिल कार्यालय इंदापूर येथे सकाळी ११ वाजले पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहील. सर्व तडजोड होऊ शकेल अशा दाव्यातील सर्व पक्षकारांनी प्रकरण लोकअदालतीत मांडून मार्ग काढावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी नावडकर यांनी केले.

# उघड्या डोळ्यांनी ‘ते’ स्वप्ने पाहताहेत

## आ. बाबाजी काळे यांचा माजी आमदार मोहिते पाटील यांना दणदणीत टोला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** पराभव पचनी पडला नाही. यांना झोप लागत नाही. त्यामुळे उघड्या डोळ्यांनी पोटनिवडणूक होण्याची स्वप्न पाहात आहेत. खेडचे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांना उद्धव ठाकरे यांच्या सेनेचे आमदार बाबाजी काळे यांनी खडसावले.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून राजगुरुनगर नगरपरिषदेच्या वतीने शहरात १० रुपयात कापडी पिशव्यांचे एटीएम मशीन सेवा सुरू केली आहे. माजी सरपंच शांताराम घुमटकर यांच्या हस्ते व आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, अनिलबाबा राक्षे, शिवाजी मांदळे यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि ५) एटीएम मशीनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी झालेल्या स्वागत समारंभात आमदार काळे बोलत होते. सुधाताई कोठारी, रेखाताई श्रोत्रीय, मनोहर सांडभोर, निलेश घुमटकर, किशोर ओसवाल, मंगेश गुंडाळ, अॅड दीपक थिगळे, मुख्याधिकारी अंबादास गरकळ तसेच शहरातील नागरिक यावेळी उपस्थित होते.



राजगुरुनगर नगरपरिषदेत कापडी पिशव्यांचे एटीएम मशीनचे उद्‍घाटन करताना शांताराम घुमटकर, आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील.

नगरपरिषदेच्या कार्यक्रमात माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी भाषण केले. त्यात शहराला नगरपरिषद लागू करण्यापासुन ते विविध विकास कामे केल्याचा उल्लेख त्यांनी केला. तसेच पाणी, कचरा, सांडपाणी या प्रलंबित व चुकीच्या कामाबद्दल प्रशासनाला जबदार धरीत टिपण्णी केली. ते पुढच्या कार्यक्रमाला गेले आणि त्यानंतर आमदार काळे बोलायला उभे राहिले. त्यांनी सुरुवातच एकेरी उल्लेख करून केली.आता गेलेला माणूस प्रचंड खोटारडा आहे. अशा .. माणसाला तालुक्याने १५ वर्षे कसे सहन केले? असा प्रश्न उपस्थित केला. माझ्या व्यक्तिगत व्यवहारात लक्ष घालतो. माझी कर्ज फेडणार आहे का? तुमच्या कुटुंबातील सर्वांनी पुनर्वसन जमिनी खरेदी विक्री केल्या. त्याचीही माहिती समोर आणणार आहे.

राजगुरुनगर शहरात २५ वर्षे राहिला, सत्ता उपभोगली. मग शहरातील कचरा, पाणी, सांडपाणी प्रश्न का सुटले नाहीत. यांनी टक्केवारी घेऊन निकृष्ट कामे केली. मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी सर्वांचे आभार मानले. त्यानंतर नगरपरिषद आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## माणसाने वृक्ष, प्राणी यांच्याबरोबरच काम करावे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** आंबेगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बिबटे आढळून येत आहेत, बिबट्या आपला सहकारी झाला आहे, त्याला बरोबर घेऊनच आता आपल्याला जगावे लागणार आहे, जगात प्रदूषण कमी करण्याचे सर्वात मोठे काम हे वृक्ष आणि प्राणी करत असतात. त्यामुळे माणसाने वृक्ष व प्राणी यांच्या बरोबरीनेच काम करावे म्हणजे पर्यावरणाचा समतोल राहील असे प्रतिपादन भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी केले.


महाराष्ट्र शासनाच्या घोड प्रकल्प वनविभाग, जुन्नर च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून बिबट शीघ्र कृती दलाचे उद्‍घाटन अवसरी बुद्रुक, गावडेवाडी येथे भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदिप वळसे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले, या वेळी उप वनसंरक्षक जुन्नर अमोल सातपुते, उप वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले, अवसरी सरपंच सारिका हिंगे, गावडेवाडी सरपंच विजय गावडे, उपसरपंच अनिल हिंगे, कल्याण हिंगे ,आजित चव्हाण, प्रशांत वाडेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपवनसंरक्षक जुन्नर अमोल सातपुते म्हणाले जुन्नर तालुक्याबरोबरच आंबेगाव तालुक्याची ओळख हि अता बिबट म्हणून महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. अवसरी/गावडेवाडी येथील बेसकैम्प हा नावीन्य पूर्ण आहे. या मार्फत बिबट संदर्भात जन जागृती करण्यात येत आहे. या सर्वांचा प्रामाणीक उद्देश्य आहे की सभोतालच्या शेतकर्यांचा फायदा झाला पाहिजे. अवसरी ग्रामस्थांनी सुमारे ४० वर्षांपूर्वी १७ हेक्टर जागा या ठिकाणी उपलब्ध करून दिली आहे.

माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील व म्हडाचे अध्यक्ष शिवाजी आढळराव यांनी केलेल्या सुसज्ज वनउद्यान या ठिकाणी ऊभे करण्याचे सुचविले आहे.

\तसेच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी देखील सुसज्ज वसाहत उभारणार आहे. असे वन उपवनसंरक्षक जुन्नर अमोल सातपुते यांनी यावेळी सांगितले. यावेळी कल्याण हिंगे अनिल हिंगे विजय गावडे यांनी आपली मनोगते व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमृत शिंदे यांनी केले उपस्थितांचे आभार वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी केले तर सूत्रसंचालन सोनल भालेराव यांनी केले.

## पत्नीच्या त्रासाला कंटाळून पतीची आत्महत्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** पत्नीच्या मानसिक त्रासाला कंटाळून पतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत उघडकीस आला. आत्महत्या केलेल्या तरुणाने आत्महत्येस पत्नी जबाबदार असल्याचे म्हणत, राहत्या घरी दोरी व साडीने बेडरूम मध्ये गळफास घेवुन आत्महत्या करीत असल्याचे चित्रीकरण मोबाईलमध्ये आत्महत्ये पूर्वी करून ठेवले. ही धक्कादायक घटना बुधवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील जेधे चाळ इनामदारवस्ती परिसरात घडली.

सुरज दामोदर पवार (वय ३२, रा. इनामदारवस्ती, चिंतामणी हॉस्पिटलचे पाठीमागे, जेधे चाळ, कोरेगाव मुळ, ता. हवेली) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी आत्महत्या केलेल्या तरुणाचे वडील दामोदर निवृत्ती पवार (वय ६०, धंदा - शेती रा. वाल्हे, वागदरवाडी ता. पुरंदर) यांनी बुधवारी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मयुरी सुरज पवार उर्फ मयुरी अनिल जाधव, (वय २६, रा. जेथे चाळ इनामदारवस्ती, कोरेगाव मुळ, सध्या राहणार सोरतापवाडी ता. हवेली) हिच्यावर गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ वर्षापूर्वी मयत सुरज दामोदर पवार व मयुरी यांचा विवाह झाला होता. मागील एक वर्षापासून कोरेगाव मूळ येथील इनामदार वस्ती परिसरात राहत होते. बुधवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास सुरज पवार याने राहत्या घरात अज्ञात कारणावरुन छताच्या अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

## लोणी उपबाजारात बटाटा बियाणे दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** लोणी (ता.आंबेगाव) येथे मंचर कृषि उत्पन्न बाजार समितीचे लोणी उपबाजार आवारात लक्ष्मी ट्रेडिंग कंपनीचे आडतधार मंगेश रोहिदास सोनवणे यांच्या आडत गाळ्यावर जालंधर येथुन मिलाफ फार्म या कंपनीच्या ज्योती बटाटा वाणाची आवक झाली आहे. बटाटा वाणाचे क्विंटलचे बाजारभाव १८०० ते २२०० रुपये आहे.

लोणी, शिरूर, खेड या तालूक्यातील व आजुबाजुचे परिसरातील शेतकऱ्यांनी बटाटा लागवडीसाठी लोणी उपबाजार आवारातील मंगेश सोनवणे यांचे आडत गाळ्यावर येऊन बटाटा वाणाची खरेदी करावी, असे आवाहन मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी केले आहे.

मान्सूनपुर्व पावसामुळे बटाटा लागवडीसाठी अनुकूल वातावरण असल्याची माहिती उपसभापती सचिन पानसरे यांनी दिली. या संदर्भात वाळूंजनगर येथील बटाटा उत्पादक शेतकरी बाबाजी वाळूंज व मांदळेवाडी येथील बटाटा उत्पादक शेतकरी अप्पा मांदळे म्हणाले की, पूर्वी मंचर या ठिकाणी २५ ते ३० किलोमीटर लांब जाऊन बटाटा बियाणे खरेदी करावे लागत होते. आता लोणी येथे बटाटे बियाणे मिळत असल्याने वहातूकीचा खर्च वाचल्याने शेतकऱ्यांना फायद्याचे आहे.



लोणी (ता.आंबेगाव ) येथील उपबाजार समितीत बटाटा बियाणे दाखल झाले. छायाचित्र - अरुणकुमार गोरडे.)

## माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण



पर्यावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने या संघटनेचे अध्यक्ष तसेच राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते इंदापूर येथील दूधगंगा सहकारी दूध उत्पादक संघ इंदापूर तसेच इंदापूर महाविद्यालयात वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

इंडियन ख्रिसमस ट्री, इंडियन पाम ट्री, मधुमालती अशा पर्यावरणपूरक झाडांचे यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. इंदापूर महाविद्यालय दरवर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने एक थीम घेऊन हा दिवस साजरा करते. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व सदस्य यासाठी विशेष प्रयत्न करतात. वन नेशन, वन मिशन - एण्ड पॅल्सिट या सदराखाली ५ ते १० जून या कालावधीमध्ये ही मोहीम राबविण्यात येत आहे.

माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य अॅड. मनोहर चौधरी, अॅड. गिरीश शहा, सुरेश मेहेर, मच्छिंद्र शेटे तसेच भूषण काळे, गोपीचंद गलांडे, रघुनाथ राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, उपप्राचार्य दत्तात्रय गोळे यावेळी उपस्थिती होते.

# भक्तिमार्ग

उन्हाळ्याचं अखेरचं पर्व सुरू होतं ना होतं तोच आपल्याला पावसाचे वेध लागतात. पांढऱ्याधोट ढगांच्या कडा काळसर होऊ लागताच मनाचे कोपरे उजळू लागतात. एखाद्या-दुसऱ्या वळिवाने काहिली शमतेच त्याचबरोबर उष्णावलेल्या क्लांत तनातही ओलावा पाझरू लागतो. हा पाझर केवळ पावसाचाच नसतो तर त्यापाठोपाठ येणाऱ्या समृद्धी आणि निसर्गभक्तीचा असतो. करू या अशाच एका संपन्न हिरवाईची प्रतीक्षा...



## प्रतिक्षा संपन्न हिरवाईची

पावसाळ्यातील निसर्ग वेडावून टाकणारा... निसर्गाच्या नव्हे तर माणसामाणसाच्या कुडीत पंचप्राण फुंकणारा... पावसानंतर सर्वदूर पसरणारी ओल सर्जनाचं दान देतेच त्याचबरोबर मलूल झालेल्या जीवनेच्छेनालाही नवे धुमारे फुटू लागतात. चैतन्याचं नवं पर्व सुरू होतं ते याच पावसामुळे. आता उन्हाळ्याचं अखेरचं चरण सुरू आहे. लवकरच वणवे शमवणाऱ्या सरी बरसतील आणि सर्वदूर तृप्तीचे ओहोळ बागडू लागतील. आता सर्व प्राणीमात्रांना या तृप्तीची प्रतीक्षा आहे. पावसाळ्यात निसर्गाचं दिसणारं मनोहारी रूप निसर्गपूजकांच्या, निसर्गभक्तांच्या डोळ्यासमोर तरळू लागलं आहे. बळीराजा काळ्या आईच्या दिमतीस सज्ज होत आहे. सध्याचे वळीव पावसाच्या आगमनाची सुवार्ता घेऊन येत आहेत. तेव्हा आणखी थोडी प्रतीक्षा सहन करू या आणि सज्जता करू या एका संपन्न ऋतूपर्वाच्या आरंभाची...

निसर्ग हाच मोठा चमत्कार आहे. आपण यंत्र-तंत्राचा अंदाज घेऊन पावसाचा अंदाज वर्तवतो, पण केवळ आपल्यातच ही क्षमता आहे असं नाही तर वनस्पतींमध्येही ही निसर्गदत्त क्षमता बघायला मिळते. पावसाची चाहुल सर्वात अधिक वनस्पती आणि काही काही पशुपक्ष्यांना लागते हे आता सिद्ध झालं आहे. त्यामुळेच पावसाचा अंदाज वर्तवणाऱ्या अशा वनस्पतींचं जतन करणं आवश्यक आहे. पशू, पक्षी, वनस्पतींची वाढ, बहर यावरच पाऊस लवकर येणार की लांबणार हे सिद्ध होतं. हे संकेत ऋतूचक्राशी निगडीत असतात. पर्जन्य जवळ आल्याचा संकेत प्रथम पळस, कडूलिंबाकडून मिळतो. पावसाळा सुरू होण्याअगोदर करवंदाचा हंगाम जवळपास संपत आलेला असतो. जांभळाचा हंगाम ऐन मध्यावर असतो तर आमरसाची चंगळ असते.

पावसाळा जवळ आला की, पाकोळ्या निवाऱ्यासाठी सुरक्षित जागा शोधण्यात व्यस्त होतात. सुगरण नवीन खोप्यांच्या विणकामात मग्न असते. मुंग्या जमिनीत उबवणीस ठेवलेली अंडी झाडांच्या खोबणीत किंवा घराच्या माळावर अथवा अडगळीच्या सुरक्षित जागी ठेवण्यासाठी अहोरात्र धावपळ करत असतात. तेलमुंग्या, शिकारी मुंगळे बिळात दाणागोटा, रसद साठवताना आढळतात. पंख फुटून त्या सैरभैर उडताना दिसतात. आकाशात चंद्र, सूर्याकडूनही मान्-सूनपूर्व संकेत मिळतात. ही सारी निसर्गाची बालकं आपल्याला पावसाच्या आगमनाची चाहूल लागल्याच संकेत देतात. हे निसर्गभक्त आपल्याला सूचित करतात. शेतकऱ्यांनी मशागतीसाठी सज्ज व्हावं, असाच जणू काही त्यांचा सल्ला असतो. निसर्गाची किमया किती अगाध आहे तेच यावरून सिद्ध होतं.

या संकेतांचा अभ्यास करणं आणि त्यानुरूप आपल्या कार्याचं नियोजन करणं ही बळीराजाची खरी निसर्गभक्ती ठरावी. आपल्या कृषीप्रधान भारतात शेतीची एक ठराविक पद्धत अवलंबली जाते. पण त्याची उपयुक्तता आणि बदलाची गरजही समजून घेणं इष्ट ठरेल. पारंपारिक शेतीपद्धतीमुळे दिवसेंदिवस शेतजमिनी नापिक होत चालल्या आहेत. संपूर्ण जगात सुमारे २६० कोटी एकर जमीन नापिक झाली आहे. रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे जमीनाचा कस नष्ट होऊन ती ओसाड होते. हे टाळण्यासाठी सेंद्रिय शेतीचा पुरस्कार करणं क्रमप्राप्त आहे. पुढील काही काळात सेंद्रिय खतांचा वापर न केल्यास शेतजमिनी नापिक होतील.

**भक्ती विशेष**

सेंद्रिय खतांच्या किमती रासायनिक खतांच्या तुलनेने कमी असतात. या खतांच्या वा-परामुळे पिकांना अन्नद्रव्य मिळतातच पण त्याचबरोबर जिवाणुंच्या वाढीसाठीही ती सहाय्यक ठरतात. या खतांचं कार्य जमिनीत बराच काळ सुरू रहात असल्यामुळे फायदा मिळतो. या खतांच्या वापरामुळे उपयुक्त जिवाणुंची संख्या वाढत असल्यामुळे निसर्गातील नायट्रोजन आणि फॉस्फरस पिकांना योग्य प्रमाणात मिळतो. त्यामुळे हवेतील आर्द्रता शोषून घेऊन जमिनीची पाणी धरण्याची क्षमता वाढते. त्याचा परिणाम म्हणून जमिनीत सकस पिक उगवून येतं. पाण्याचं योग्य नियोजन केल्यास जमिनीची उत्पादनक्षमता आणि पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. वाढती गरज लक्षात घेऊन आता अशा प्रकारच्या खतनिर्मितीचे प्रकल्प विविध ठिकाणी उभे रहायला हवेत. तरच आपण काळ्या आईचं जतन आणि संवर्धन करु शकू. हीच खऱ्या अर्थाने तिची आराधना ठरेल. पूजा ठरेल.

## कौतुकास पात्र ठरण्यासाठी



कामाच्या ठिकाणी वरिष्ठांची मर्जी संपादन करणं गरजेचं असतं. करीअरमध्ये यशाचे टप्पे गाठणं असो किंवा बढती मिळवणं असो, वरिष्ठांवर प्रभाव टाकल्याखेरीज काहीही होत नाही. वरिष्ठांची मर्जी कशी संपादन करायची याबाबत चाणक्याने सांगून ठेवलंय. अर्थशास्त्रावरील त्याच्या पुस्तकात अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत. कॉर्पोरेट जगात वावरताना चाणक्यनीतीतले हे उपदेश तुमच्या कामी येतील.

* कौतुकास पात्र ठरण्यासाठी मेहनत करा. कौतुक करण्यासारखं काम करा.
* योग्य सहकारी निवडा. मूर्खांच्या सहवासात राहू नका. तुम्हाला मार्गदर्शन करणाऱ्या, पुढे जाण्यासाठी मदत करणाऱ्या सहकार्यांची निवड करा.
* भविष्याचा विचार करा. आधीच कामाचं नियोजन करून ठेवा. कामाचं योग्य नियोजन करणारी, दूरदृष्टी असणारी माणसं वरिष्ठांच्या पसंतीस उतरतात.

**चाणक्यनीती**

* स्पष्टवक्ते बना. आर्थिक व्यवहार, ज्ञानार्जन, भोजन आणि व्यवसायात बुजरेपणा दूर सारणारी माणसं आनंदी असतात, असं चाणक्य सांगतो. व्यावसायिक आयुष्यात याचा अवलंब करा.
* कक्षा रूंदावण्याचा प्रयत्न करा. ज्ञानासाठी पुस्तकांवर अवलंबून असणारी तसंच धन इतरांच्या ताब्यात असणारी माणसं गरजेच्या वेळी या दोन्ही गोष्टींचा वापर करू शकत नाहीत. त्यामुळे शिकण्याच्या बाबतीत कुपमंडूक वृत्ती नको. सतत ज्ञान मिळवत रहा.
* शिक्षण सर्वात महत्त्वाचं असल्याचं आणि सुशिक्षित माणसाला सगळ्या ठिकाणी मान मिळत असल्याचं चाणक्य सांगतो. त्यामुळे कामात तरबेज व्हा. सगळी कौशल्यं आत्मसात करा.
* वरिष्ठांचा मान राखा. त्यांच्या मताचा आदर करा. आपलं म्हणणं जरुर मांडा पण वरिष्ठांचा अनादर करू नका.
* कामाच्या ठिकाणचे सहकारी आणि मित्र यांच्यातली लक्ष्मणरेषा ओळखा. काम करताना मैत्रीचा विचार करू नका. व्यावसायिक आणि वैयक्तिक नात्यांमध्ये अंतर ठेवा.
* नवं तंत्रज्ञान शिकून घ्या. बदलत्या जगात स्वत:मध्ये बदल न घडवणारा मनुष्य मूर्ख असतो असं चाणक्य सांगतो. त्यामुळे कामाशी संबंधित ज्ञान वाढवत राहा.
* कामातल्या प्रगतीबाबत दवंडी पिटू नका. यश तुमच्यापुरतं मर्यादित ठेवा. वरिष्ठ नक्कीच कामाचं कौतुक करतील.

## कसं वागू नये?

आयुष्यात आनंद आणि यश मिळवायचं असेल तर काही गोष्टींकडे लक्ष द्यावं लागतं. काही नियम पाळावे लागतात. आयुष्याच्या संघर्षात माणसाच्या हातून अनेक गोष्टी घडत असतात. त्यापैकी काही योग्य तर काही अयोग्य असतात. अजाणतेपणी हातून काही चुका होतात. याबाबतचा उल्लेख रामचरितमानस या ग्रंथात करण्यात आला आहे. रामचरितमानस मधील ओव्यांमधून याबाबत जाणून घेता येईल.

* रागु, रोषु, इरिषा, मदु, मोहु।
जनि जनि सपनेहू बस इन्ह के बस होहु।।
सकल प्रकार बिकार बिहाई।
मन क्रम बचन करेहु सेवकाई।।

याचा अर्थ राग म्हणजे एखाद्याच्या प्रती असणारा क्रोध, रोष म्हणजे नाराजी, मद म्हणजे अहंकार आणि मोह म्हणजे लालसा या अवगुणांचा अंमल व्यक्तीवर झाला की तिच्या शरीरात अनेक विकारांचा वास राहतो. असा मनुष्य मन, कर्म आणि विचारांनी याच विकारांचा गुलाम बनतो.

* अति तेथे माती असं म्हणतात. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. त्यामुळे प्रेमाचा अतिरेकही वाईटच ठरतो. अतिप्रेमामुळे आपण चांगल्या वाईटाचा निर्णय घेऊ शकत नाही. अतिप्रेमामुळे माणूस अधर्म करायला धजावतो. गुरू द्रोणाचार्य हे याचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. पुत्र अश्वत्थाम्याच्या अतिप्रेमापोटी अधर्मी असल्याचं माहीत असूनही त्यांनी कौरवांना सहकार्य केलं. त्यामुळे अतिप्रेम किंवा मोह घातकच...

* रोष हादेखील माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. रागाच्या भरात माणूस अमानुष कृत्य करू शकतो. रागीट व्यक्तीला कशाचंही भान रहात नाही. असा माणूस राक्षससमान वागू लागतो. रागात केलेल्या अनेक कृत्यांची मग लाज वाटू लागते. त्यामुळे रोष नियंत्रणात ठेवायला हवा.

* एखाद्याच्या प्रगतीबाबत ईर्ष्या करणारा माणूस आयुष्यात कधीच यशस्वी होत नाही.



**स्व मदत**

समोरच्याला खाली पाडण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. अशा माणसांना कोणाचंही चांगलं बघवत नाही. दुर्योधन हे क्रोधामुळे होणाऱ्या विनाशाचं एक उदाहरण आहे. दुर्योधनाच्या मनात पांडवांबाबत ईर्ष्या होती. यामुळे तो पांडवांशी वाईट वागला. त्यांच्याविरोधात कटकारस्थानं केली. पण अंती त्याच्या कुळाचा नाश झाला.

* अहंकार हा सुद्धा माणसाचा शत्रू आहे. अहंकारी माणूस इतरांचे सल्ले मानत नाही. तो स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत असतो. यामुळे माणसाचं बरंच नुकसान होतं. चुका न मानणं, इतरांना मान न देणं अशा कृत्यांमुळे अहंकारी माणूस इतरांच्या नजरेतून उतरतो आणि एकटा पडतो.

* कोणतीही वस्तू किंवा माणसाबद्दलचा अतिमोह घातक ठरतो. मोहात पडलेला माणूस चुकीचं पाऊल उचलतो. महाभारतातल्या धृतराष्ट्राचंच बघा. त्याला आपल्या मुलांचा आणि त्यातही दुर्योधनाचा मोह होता. या मोहामुळे त्याने कायमच मुलांना पाठीशी घातलं आणि यामुळेच त्यांच्या कुळाचा नाश झाला. म्हणून हे अवगुण दूर सारावे.

## कसं करावं 'हनुमान चालीसा'चं पठण?



हनुमान ही देवता बलदायी आणि भयनाशक आहे. मारूती स्तोत्र आणि हनुमान चालीस यांच्या नियमित पठणाने अनेक अडचणी आणि दोषांपासून मुक्ती मिळते तसंच हनुमंताची कृपा प्राप्त होते. हनुमान चालीसा पठणाचे काही नियम आहे. या नियमांचं पालन केल्यास भक्तांना अनेक लाभ होतात. हनुमान चालीसाचं पठण कसं आणि कधी करावं, याविषयी...

* रात्रीच्या वेळी हनुमान चालीसा या पोथीचं पठण केल्याने अनेक दोष दूर होतात. साडेसाती मागे लागली असेल तर या उपायामुळे शनीचा नकारात्मक प्रभाव कमी होतो.

* मंगळवार आणि शनिवारी सकाळी हनुमान चालीसाचं पठण करणं लाभदायी मानलं जातं. हनुमान चालीसाच्या पठणाचे अनेक सकारात्मक प्रभाव दिसून येतात. यामुळे आरोग्य सुधारतं तसंच घरात समृद्धी आणि संपन्नता नांदू लागते. अनेक नकारात्मक गोष्टींचा प्रभाव कमी होतो.

* हनुमाान चालीसाचं पठण सकाळी आणि रात्री करावं. रात्रीच्या वेळी आठ वेळा हनुमान चालीसा वाचल्यास साडेसातीचा नकारात्मक प्रभाव कमी होतो.

**जाणून घ्या**

* हनुमानाची पूजा केल्याने शनीदेव प्रसन्न होतो. हनुमानाच्या भक्तांना शनीच्या कोपाचा त्रास होत नाही, अशीही श्रद्धा आहे. त्यामुळे हनुमानाची आराधना करायला हवी. हनुमानाची आराधना करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे हनुमान चालीसा.

* हनुमान चालीसाच्या पठणाने भक्ताची सगळी पापं दूर होतात. हनुमंताची कृपा होते आणि जीवनात यश मिळतं.


## चीनमधला हिंदू धर्म

चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. या देशातले बहुसंख्य लोक बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. पण या देशात हिंदू धर्माच्या खुणाही आढळतात. प्राचीन काळात अनेक देशांमध्ये वैदिक धर्माचं अस्तित्त्व होतं. वैदिक धर्माची व्याप्ती बरीच मोठी होती.

**धर्म देशोदेशीचे**

चीनमध्येही हिंदू धर्माचं अस्तित्त्व अनेक ठिकाणी आढळतं. या देशातल्या लो यांग जिल्ह्यातल्या सुआन वू प्रांतात एक खांब आहे. या खांबावर संस्कृत भाषेतील मजकूर आढळतो. यावर वरपासून खालपर्यंत संस्कृत भाषेतले श्लोक कोरण्यात आले आहेत. हिंदू धर्मात यमराजाला मृत्यूची देवता मानलं जातं. यम हा मृत्यूलोकाचा राजा मानला जातो. चीनमध्येही अशा देवतेची कल्पना करण्यात आली आहे. यनमो वांग ही चीनमधली मृत्यूची देवता आहे. या देवतेचा यमाशी अगदी जवळचा संबंध आहे.


चीनमधल्या शिनमेन क्षेत्रातल्या फुजियान प्रांतात प्राचीन शिव मंदिराचे अवशेष आहेत. इथे आजही पाच फूट उंचीचं शिवलिंग अस्तित्त्वात आहे. शंकराचं मंदिर पूर्णपणे उध्वस्त झालं असलं तरी याच्या अस्तित्त्वाच्याा खुणा ठायीठायी आढळतात तसंच शहरातल्या भिंतींवर वैदिक धर्माशी संबंधित नकाशे आणि चित्रं कोरण्यात आल्याचं दिसून येतं. विशेष म्हणजे विनापत्य चीनी महिला अपत्यप्राप्तीसाठी या मंदिरात शंकराची पूजा करत असत. या मंदिराची निर्मिती तांग साम्राज्य काळात करण्यात आल्याचं बोललं जातं. चीनमधल्या तामिळ समुदायाने तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात मंदिराची डागडुजी केली होती. एकंदरच चीनमध्ये हिंदू मंदिरांच्या अनेक खुणा आढळतात.



## विंड चाईम निवडताना...

अनेक घरांमध्ये विंड चाईम लाव-तात. चीनी वास्तूशास्त्रात विंड चाईमचा वापर सौभाग्यवृद्धीसाठी केला जातो. विंड चाईममुळे हवेतल्या सकारात्मक लहरी घरात प्रवाही राहतात आणि घरातली संपन्नता टिकून राहते, असं मानलं जातं. विंड चाईमचे अनेक लाभ आहेत. अर्थात हे लाभ मिळवण्यासाठी त्याची निवड योग्य पद्धतीने करायला हवी. विंड चाईमची निवड कशी करायची, याविषयी...

* विंड चाईममुळे विशिष्ट प्रकारचा ध्वनी निर्माण होतो. या ध्वनीमुळे हवेतली ची ऊर्जा प्रभावित होते. ही ऊर्जा घरात सकारात्मक तरंग निर्माण करते. त्यामुळे विंड चाईमचा ध्वनी मधूर असला पाहिजे. हा ध्वनी घरातल्या प्रत्येक सदस्याला आवडायला हवा.



* धातूच्या विंड चाईम्स विकत घ्या. लाकूड किंवा प्लास्टिकच्या चाईम्सच्या तुलनेत धातूच्या चाईम्सचा आवाज अधिक तीव्र स्वरूपाचा असतो. यामुळे वातावरणातली ची ऊर्जा जलद गतीने सक्रिय होते.

* विशिष्ट प्रकारच्या अडचणी आणि समस्यांचं निवारण करण्यासाठी लाकूड किंवा मातीच्या चाईम्सचा वापरल्या जातात. पण मातीच्या चाईम्सची जास्त काळजी घ्यावी लागते. मातीची चाईम तुटल्यास अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता असते.



* विंड चाईम्स लावताना दिशेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. पूर्व आणि दक्षिण दिशा अधिक लाभदायी मानल्या जातात. पूर्वेकडे लाकडाच्या चाईम्स लावल्यास समृद्धी नांदू लागते.

* विंड चाईमचा आकार ठरवताना जागेचा विचार व्हायला हवा. मोठ्या जागेत मोठ्या आकाराचं विंड चाईम असावं. छोट्या विंड चाईममुळे मोठ्या जागेतला प्रभाव कमी होऊ शकतो.

**वास्तूभक्ती**

* गृहसजावटीसाठी विंड चाईमचा वापर करायचा असेल तर हवेशीर कोपऱ्याची किंवा दाराची निवड करा.

* घरात शांतता हवी असेल तर उत्तर, पश्चिम किंवा उत्तर-पश्चिम दिशेला धातूचं विंड चाईम लावा.

* सहा दांड्या असणारं विंड चाईम हॉलच्या उत्तर-पश्चिम कोपऱ्यात लावा. यामुळे सौभाग्यवृद्धी होते.

## जबलपूरचे शादीवाले हनुमानजी

हनुमानाला ब्रह्मचारी मानलं जातं. पण मध्य प्रदेशातल्या जबलपूरजवळच्या मंदिरातला हनुमान लग्नाचा आशीर्वाद देतो. लग्न व्हावं यासाठी या मंदिरात विवाहोत्सुक तरूण-तरूणींची गर्दी असल्याचं पहायला मिळतं. जबलपूरपासून २० किलोमीटर अंतरावर आगासौद नावाचं गाव आहे. या गावात हनुमानाचं मंदिर वसलंय. सिद्ध हनुमान मंदिर या नावाने ते ओळखलं जातं. या हनुमानाला शादीवाले हनुमानजी असंही म्हटलं जातं. इथे येणाऱ्या लग्नाळू तरूणांच्या जोड्या जमतात अशी भाविकांची श्रद्धा आहे. मंगळवार, गुरूवार आणि शनिवारी भाविकांची मोठी गर्दी असते.



**तीर्थक्षेत्र**

या हनुमानाकडे साकडं घातल्यानंतर तीन महिन्यांत विवाहोत्सुक तरूणांचा विवाह ठरतो, असं म्हणतात. सुखी वैवाहिक जीवनासाठी सिद्ध हनुमानाचे आशीर्वाद घेतले जातात. या हनुमानाला गुलाबाचं फूल अर्पण केलं तर नवस पूर्ण व्हायला फार वेळ लागत नाही, अशीही श्रद्धा आहे. गुलाबासोबत पिवळ्या कपड्यात बांधलेला नारळ हनुमानाला अर्पण करावा लागतो. त्यानंतर तीनदा मंदिरात यावं लागतं. यानंतर तीन महिन्यांच्या आता भक्ताचं लग्न ठरतं. लग्न ठरण्यासाठी इथे गुरूवारी यावं लागतं. पिवळ्या कपड्यातला नारळ, गुलाबाचं फूल आणि सुपारी अर्पण करताना कुलदेवतेचं स्मरण करावं लागतं. त्यानंतर हा सिद्ध मारूती तुमच्या मनोकामना पूर्ण करतो. या मारूतीला शादीवाले हनुमानजी हे नाव का पडलं, याबाबतचं गुपित आता उघड झालं असेल.



“मी २००८ मध्ये बंगळुरू फ्रँचायझीसाठी बोली लावली तेव्हा मी आयपीएलला भारतीय क्रिकेटसाठी गेम-चेंजर म्हणून पाहिले. मला RCB असा ब्रँड बनवायचा होता, जो जगभरात ओळखला जातो. म्हणून मी या फ्रँचायझीचे नाव रॉयल चॅलेंजर्सशी जोडले, जे आमच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या दारू ब्रँडपैकी एक आहे . — विजय मल्या

“'बंगळुरूमध्ये रोड शो दरम्यान झालेल्या दुर्घटनेमुळे मला दुःख झाले आहे. मी या घटनेसाठी कोणालाही दोष देत नाही. अशा वातावरणात, निष्काळजीपणा आणि अपघातांची शक्यता खूप वाढते, म्हणून हे टाळले पाहिजे.' — गौतम गंभीर



# रायगड रॉयल्सची विजयी सुरुवात

## महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धा : ऋषभ राठोड(८०धावा)ची कर्णधाराला साजेशी खेळी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) 2025 स्पर्धेत दुसऱ्या दिवशी कर्णधार ऋषभ राठोड(८०धावा) याने केलेल्या महत्वपूर्ण खेळीच्या जोरावर रायगड रॉयल्स संघाने सातारा वॉरियर्स संघावर २४ धावांनी विजय मिळवला.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु झालेल्या या स्पर्धेत सातारा वॉरियर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. रायगड रॉयल्स संघाने पहिल्यांदा खेळताना २०षटकात ६बाद १९०धावांचे आव्हान उभे केले. वरच्या फळीतील फलंदाज सिद्धेश वीर(०) खाते न उघडताच तंबूत परतला. त्याला वैभव दारकुंडेने झेल बाद केले. पाठोपाठ हर्ष मोगवीरा(५)ला सातारा वॉरियर्सच्या राजवर्धन हंगरगेकरने झेल बाद करून रायगड रॉयल्स संघाला २ बाद १३ असे अडचणीत टाकले. यातून रायगड रॉयल्स सावरत असतानाच जगदीश झोपेने दिग्विजय पाटील(१३)याला, तर राजवर्धन हंगरगेकरने हर्ष संघवी(१८)याला बाद करून रायगड रॉयल्सची अडचण आणखी वाढवली. सहाव्या क्रमांकास फलंदाजीस उतरलेल्या ऋषभ राठोडने ४५ चेंडूत ८०धावांची आक्रमक खेळी करत संघाचा धावफलक पुढे नेला. यात त्याने ६ चौकार व ५ उत्तुंग षटकार मारले. त्याला ऋग्वेद मोरेने ४१ चेंडूत ३ चौकार व २ षटकाराच्या मदतीने ४८ धावा काढून साथ दिली. या जोडीने पाचव्या विकेटसाठी ८३ चेंडूत १३० धावांची भागीदारी करून संघाला समाधानकारक धावसंख्या उभारून दिली. सातारा वॉरियर्सकडून राजवर्धन हंगरगेकरने ४२ धावात ३ गडी, वैभव दरकुंडेने ३३ धावात २ गडी बाद केले.

१९० धावांचे आव्हान सातारा वॉरियर्स संघ पेलू शकला नाही. त्यांना २०षटकात ७ बाद १७७धावाच करता आल्या. सलामवीर पवन शहा(०)ला एमपीएलमध्ये सातारा वॉरियर्सकडून प्रथमच पदार्पण करणाऱ्या सागर जाधवने पहिल्याच चेंडूवर त्याला झेल बाद केले व संघाला पहिला धक्का दिला. सौरभ नवले ९ धावा काढून तंबूत परतला. ओम भोसलेने २९ चेंडूत २चौकार व ३ षटकारासह ४५धावांची खेळी केली. त्याला हर्षल काटेने ३४चेंडूत ४चौकार व १ षटकारासह ३८ धाव काढून साथ दिली. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ४० चेंडूत ५२ धावांची भागीदारी करून संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण रायगडच्या सागर जाधवने ओम भोसलेला स्कुप फटका मारताना त्रिफळा बाद करून त्याचा अडसर सूर केला. त्यानंतर अनिकेत पोरवाल(३१), मेहुल पटेल(२१) यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. रायगड रॉयल्सकडून निखिल कदमने ३२ धावात ३ गडी टिपले. तर, तनय संघवी(२-२८), सागर जाधव(२-४१) यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून साथ दिली.

## शानदार सोहळ्याद्वारे सांघिक टेबल टेनिस स्पर्धेचा प्रारंभ



**पुणे :** डेक्कन जिमखाना क्लबने आयोजित केलेल्या सांघिक टेबल टेनिस स्पर्धेस शानदार सोहळ्याद्वारे गुरुवारी प्रारंभ झाला. रविवार पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत पंधरा क्लबचे ७० संघ विजेतेपदासाठी आपले नशीब आजमावत आहेत. ही स्पर्धा शिवम कार्टोन यांनी पुरस्कृत केली असून ही स्पर्धा पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने आयोजित करण्यात आली आहे. डेक्कन जिमखाना क्लबच्या टेबल टेनिस सभागृहात झालेल्या शानदार उद्घाटन सोहळ्यात स्पर्धेचे मुख्य प्रायोजक शिवम कार्टोनचे संचालक सचिन गोरे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी डेक्कन जिमखाना क्लबचे अर्थसचिव गिरीश इनामदार, पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या उपाध्यक्षा सौ स्मिता बोडस, संघटनेचे सचिव श्रीराम कोनकर, खजिनदार आशिष बोडस, डेक्कन जिमखाना क्लबचे टेबल टेनिस सचिव आनंद काळे, प्रशिक्षक उपेंद्र मुळ्ये, मुख्य पंच मधुकर लोणारे उपस्थित होते. या स्पर्धेतील खुल्या गटात एकूण ४९ संघ तर सतरा वर्षाखालील गटात २१ संघ सहभागी झाले आहेत. खुल्या गटात सर्व वयोगटातील खेळाडूंचा समावेश राहणार आहे. मात्र एका खेळाडूला फक्त एकाच विभागात खेळण्याची परवानगी देण्यात आली आहे. स्पर्धेतील सामने प्रथम साखळी व नंतर बाद पद्धतीने होणार आहेत. उपांत्य फेरीपासून रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

## पीबीजी पुणेचा विजय; कोलकाता थंडरब्लेड्सवर १०-५ अशी मात

**पुणे :** पीबीजी पुणे जॅग्वार्सने इंडियनऑइल यूटीटी सीझन ६ च्या लढतीत कोलकाता थंडरब्लेड्सचा १०-५ असा पराभव केला. यूटीटीच्या सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स खेल आणि स्टार स्पोर्ट्स २ तमिळवर प्रसारित केले जातील आणि देशभरातील चाहत्यांसाठी जिओहॉटस्टारवर थेट प्रक्षेपित केले जातील. अल्वारो रोबल्सने आंतरराष्ट्रीय हेवीवेट्स आणि इंडियनऑइल यूटीटीच्या दिग्गज खेळाडूंमधील एका रोमांचक लढतीत क्वाद्री अरुणाला हरवून पीबीजी पुणे जॅग्वार्सला आदर्श सुरुवात करून दिली. त्याने तीनही गेम गोल्डन पॉइंट्सवर जिंकून हंगामातील त्याचा पहिला एकेरी विजय मिळवला. एकाच इंडियनऑइल यूटीटी मोहिमेत दोनदा असा दुर्मिळ पराक्रम पहिल्यांदाच घडला. त्यानंतर दिना मेश्रेफने ॲड्रियाना डियाझवर २-१ असा जोरदार विजय मिळवला आणि तिचा पहिल्या लीग विजयाची नोंद केली. अनिर्बान घोषसोबत जोडीने मिश्र दुहेरीत २-१ असा विजय मिळवून पुण्याला सामन्यावर लवकर नियंत्रण मिळवून दिले. कोलकाता थंडरब्लेड्सने युवा स्टार अंकुर भट्टाचार्जीच्या सहाय्याने प्रत्युत्तर दिले, ज्याने दुसऱ्या पुरुष एकेरीत अनिर्बानला पराभूत केले. अनिर्बनने अंतिम गेम जिंकून अंकुरला पूर्ण स्वीप देण्यापासून रोखले. हा एक महत्त्वाचा गुण होता ज्यामुळे पुणे पुढे राहिले आणि कोलकाताला बरोबरी साधण्यापासून रोखले. त्यानंतर रीथ रिश्याने सेलेना सेल्वाकुमारला ३-० असे हरवून बरोबरी साधली.

## दोन वर्ल्ड कप जिंकणाऱ्या खेळाडूची अचानक निवृत्ती!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा फिरकीपटू पियुष चावला याने सर्व फॉरमॅटच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. सोशल मीडियावर पोस्ट लिहून त्याने निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. पियुष हा २०११ च्या वन डे वर्ल्ड कप आणि २००७ च्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप विजेत्या संघाचा सदस्य होता. त्याने कोलकाता नाइट रायडर्ससह २०१४ मध्ये इंडियन प्रीमिअर लीगचे जेतेपदही पटकावले आहे. त्याने भारतासाठी ३ कसोटी सामन्यांत ७ विकेट्स घेतल्या आहेत. त्याशिवाय २५ वन डे सामन्यांत ३२ व ७ ट्वेंटी-२० सामन्यांत ४ विकेट्स घेतल्या आहेत.

प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याने १३७ सामन्यांत ४४६ विकेट्स घेतल्या आहेत. लिस्ट ए क्रिकेटमध्ये १६४ सामने व ट्वेंटी-२० क्रिकेटमधील २९७ सामन्यांत त्याने अनुक्रमे २५४ व ३१९ विकेट्स घेत्लया आहेत. त्याने लिहिले की, दोन दशकांहून अधिक काळ मैदानावर राहिल्यानंतर, या सुंदर खेळाला निरोप देण्याची वेळ आली आहे. भारताचे सर्वोच्च स्तरावर प्रतिनिधित्व करण्यापासून ते २००७ च्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप आणि २०११ च्या वन डे वर्ल्ड कप विजेत्या संघाचा भाग होण्यापर्यंत, या अविश्वसनीय प्रवासातील प्रत्येक क्षण हा एका आशीर्वादापेक्षा कमी नव्हता. या आठवणी माझ्या हृदयात कायम कोरल्या जातील.

तो पुढे लिहितो, माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या आयपीएल फ्रँचायझी पंजाब किंग्स, कोलकाता नाइट रायडर्स, चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांचे मी मनापासून आभार मानतो. इंडियन प्रीमियर लीग माझ्या कारकिर्दीतील खरोखरच एक खास अध्याय आहे आणि त्यात खेळण्याचा प्रत्येक क्षण मी जगलो आहे. मी माझे प्रशिक्षक के.के. गौतम आणि दिवंगत पंकज सारस्वत यांचे मनापासून आभार मानतो.

## कोल्हापूर टस्कर' संघ श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाच्या दर्शनाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या (एमपीएल) तिसऱ्या हंगामातील चषकावर नाव कोरण्याच्या निर्धाराने 'पुनीत बालन ग्रुप'चा 'कोल्हापुर टस्कर' संघ मैदानात उतरला असून या संघाने हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाचे दर्शन आणि आरती करून जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला.

'इंडीयन प्रिमीयर लीग'च्या धर्तीवर राज्यात 'महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन'ने (एमसीए) महाराष्ट्र प्रिमीयर लीग (एमपीएल) सुरू केली आहे. यंदाचा या लीगचा तिसरा हंगाम सुरु झाला असून या लीगमध्ये उतरलेल्या कोल्हापूर टस्कर संघाची मालकी पुण्यातील युवा उद्योजक आणि 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष पुनीत बालन यांनी घेतली आहे. या संघाने सलग दोन हंगामात उत्कृष्ट कामगिरी केली असून पहिल्यावर्षी उपविजेते पदाचा मानही पटकवाला आहे.

यावर्षीच्या स्पर्धेसाठी हा संघ पुन्हा एकदा सज्ज झाला असून नव्या जोमाने मैदानात उतरला आहे. या संघाचा लीगमधील पहिला सामना उद्या (शनिवार) होणार आहे. त्यापूर्वी या संघातील खेळाडुंनी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती'ची आरती करुन दर्शन आणि आशिर्वाद घेतले. यावेळी कोल्हापुर टस्कर्स संघाचा कर्णधार राहुल त्रिपाठी, अंकित बावणे, श्रीकांत मुंढे यासह सर्व खेळाडू उपस्थित होते.

> **“यंदा आमचा कोल्हापूर टस्कर संघ हा एकदम संतुलित असून आम्ही पूर्ण आत्मविश्वासाने खेळणार आहोत. या संघातील सर्वच खेळाडूंबाबत मी अत्यंत समाधानी आहे. यावर्षी स्पर्धेचे विजेतेपद आम्ही निश्चितपणे पटकविणार असाच आमचा निर्धार आहे. त्यासाठी हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती बाप्पाचे आशिर्वाद घेतले.”**
> - **राहुल त्रिपाठी,** कर्णधार

## सर्फराजचा 'टप्प्यात कार्यक्रम'; ९२ धावा; प्लेइंग ११ मधून बाहेर



**नवी दिल्ली :** भारत अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यातल्या दुसऱ्या अनौपचारिक कसोटीला आजपासून सुरुवात होत आहे. पहिल्या कसोटीत करुण नायर, सर्फराज खान, अभिमन्यू इश्वरन, ध्रुव जुरेल, यशस्वी जैस्वाल यांनी फलंदाजीत दम दाखवला. पण, आता लोकेश राहुलच्या येण्याने प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणाला बाहेर बसवले, जाईल याची उत्सुकता होती. इंग्लंड लायन्सने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारत अ च्या पहिल्या डावात करुण नायरने २०४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली होती. सर्फराज खान याने ९२, तर ध्रुव जुरेल यांनी ९४ धावा केल्या होत्या. दुसऱ्या डावात यशस्वी जैस्वाल ( ६४), अभिमन्यू इश्वरन ( ६८), ध्रुव जुरेल ( ५३) व नितीश कुमार रेड्डी ( ५२) या आघाडीच्या चार फलंदाजांनी अर्धशतक झळकावले होते. भारताच्या पहिल्या डावातील ५५७ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंड लायन्सने ५८७ धावा केल्या. भारत अ संघाने दुसऱ्या डावात २ बाद २४२ धावा केल्या आणि हा सामना अनिर्णीत राहिला. या सामन्यात लोकेश राहुलला सलामीला खेळण्याची संधी मिळाली, तर अभिमन्यू इश्वरनला तिसऱ्या क्रमांकावर पाठवण्यात आले आहे. यशस्वी व लोकेश यांचा कसोटी संघात समावेश आहे आणि त्याचा सराव व्हावा म्हणून आजच्या सराव सामन्यात त्यांचे सलामीला खेळणे महत्त्वाचे आहे. पण, लोकेशसाठी पहिल्या सराव सामन्यात ९२ धावांची खेळी करणाऱ्या सर्फराज खानला बाहेर बसावे लागले आहे.

**भारतीय संघ -** लोकेश राहुल, यशस्वी जैस्वाल, अभिमन्यू इश्वरन, करुण नायर, ध्रुव जुरेल, नितीश कुमार रेड्डी, शार्दूल ठाकूर, तनुष कोटियन, अंशुल कंबोज, तुषार देशपांडे, खलील अहमद

## ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी, पुणे क्रिकेट ॲकॅडमी संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी तर्फे आयोजित पहिल्या 'इंडिफ्लाय करंडक' अजिंक्यपद १३ वर्षाखालील ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी अ आणि पुणे क्रिकेट ॲकॅडमी संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत स्वराज मोरे आणि विराट भिसे यांनी केलेल्या कामगिरीच्या जोरावर ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी अ संघाने पुणे क्रिकेट ॲकॅडगीचा ४३ धावांनी सहज पराभव करून विजयी सलामी दिली. पहिल्यांदा फलंदाजी करताना ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीने २० षटकात १३९ धावांचे लक्ष्य उभे केले. विराट भिसे याने ५६ चेंडूत १० चौकार आणि एका षटकारासह नाबाद ६६ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा डाव ९६ धावांवर मर्यादित राहीला. वेदांत सुदर्शन (२९ धावा) आणि अर्णव घाटे (२८ धावा) यांनी धावा जमवून प्रतिकार केला. स्वराज मोरे आणि प्रनय आवळे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला विजय मिळवून दिला.

दुसऱ्या सामन्यामध्ये प्रद्युम्न कानिटकर याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे पुणे क्रिकेट ॲकॅडमीने स्पोटर्स झोन ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या स्पोटर्स झोन ॲकॅडमीने २२ षटकामध्ये ९० धावा धावफलकावर लावल्या. मोहीत धोरकट याने २३ धावा आणि आदिती झेंडे हिने नाबाद २२ धावांची खेळी केली. प्रद्युम्न कानिटकर याने पाच धावांमध्ये दोन गडी टिपले. विवान धुमाळ यानेसुद्धा १७ धावांत दोन गडी बाद केले. हे लक्ष्य पुणे क्रिकेट ॲकॅडमीने ९.५ षटकात व १ गडी गमावून पूर्ण केले. अर्णव घाटे (नाबाद ३० धावा), प्रथमेश शिंदे (नाबाद २२ धावा) आणि स्वराज पिसाळ (२० धावा) यांनी संघाला सहज विजय मिळवून देत गुणांचे खाते उघडले.

## रजत पाटीदारने पहिल्यांदाच आरसीबीला चॅम्पियन बनवले

**नवी दिल्ली :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पहिल्यांदाच आयपीएल किंवा इंडियन प्रीमियर लीगचे विजेतेपद जिंकले आहे. मध्य प्रदेशातील इंदूर येथील रहिवासी रजत पाटीदार यांनी संघाचे नेतृत्व केले. रजत आयपीएलमध्ये पहिल्यांदाच एखाद्या संघाचे नेतृत्व करत होता आणि या हंगामात त्याने आपल्या संघाला ११ सामने जिंकून दिले आहेत.

रजतने या आयपीएलमध्ये १५ सामन्यांमध्ये १४३.७७ च्या स्ट्राईक रेटने ३१२ धावा केल्या आहेत. या हंगामात त्याने दोन अर्धशतकेही केली आहेत. आतापर्यंत त्याने आयपीएलमध्ये ११११ धावा केल्या आहेत. रजत हा उजव्या हाताचा टॉप ऑर्डर फलंदाज आणि ऑफ-स्पिनर आहे. रजतचा जन्म १ जून १९९३ रोजी मध्य प्रदेशातील इंदूर येथील एका व्यापारी कुटुंबात झाला. रजतने वयाच्या ८ व्या वर्षी क्रिकेट खेळायला सुरुवात केली. त्याच्या आजोबांनी त्याची प्रतिभा पहिल्यांदा ओळखली आणि त्याला क्रिकेट अकादमीत प्रवेश दिला.

त्यांच्या कुटुंबात वडील मनोहर पाटीदार, आई मंजू पाटीदार, भाऊ महेंद्र पाटीदार आणि बहीण सुनीता पाटीदार यांचा समावेश आहे. रजतने न्यू दिगंबर जैन पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्याने गोलंदाज म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली आणि अंडर-१५ नंतर त्याने फलंदाजीवर लक्ष केंद्रित केले.

## बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत अनय एकबोटे, अर्जुन श्रीगडीवार यांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** रायसोनी फाऊंडेशन पुरस्कृत योनेक्स सनराइज जीएच रायसोनी मेमोरियल पुणे जिल्हा सुपर 1000 बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत पात्रता फेरीच्या अंतिम चरणात 17 वर्षाखालील मुलांच्या गटात अनय एकबोटे, अर्जुन श्रीगडीवार यांनी मानांकित खेळाडूंना नमवित मुख्य फेरी गाठली.

शिवाजीनगर येथील पीडीएमबीए बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत 17 वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम पात्रता फेरीत अनय एकबोटेने दुसऱ्या मानांकित वेदांत जोशीचा 10-15, 15-11, 17-15 असा तर, अर्जुन श्रीगडीवारने तिसऱ्या मानांकित जयंत झाडेचा 16-14, 07-15, 15-09 असा पराभव करून मुख्य फेरी गाठली. अव्वल मानांकित सिबरेनरझा सोमजीने समित पंतला 15-05, 15-07 असे नमविले.

पुरुष गटात दुसऱ्या पात्रता फेरीत अभिज्ञान सिंघाने अव्वल मानांकित राहुल पाटीलवर 15-13, 15-12 असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. केविन पटेलने पाचव्या मानांकित प्रथमेश बेलदरेचा 12-15, 15-08, 15-10 असा पराभव करून आगेकूच केली. सौरव ठाकूर याने सुरज काळेवर 15-07, 15-13 असा विजय मिळवला.

## महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धा : गौतमी नाईक(७०धावा)ची आक्रमक खेळी

# रत्नागिरी जेट्सची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) 2025 स्पर्धेत दुसऱ्या लढतीत गौतमी नाईक(७०धावा) हिने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर रत्नागिरी जेट्स संघाने रायगड रॉयल्स संघाचा ४ गडी राखून पराभव करून शानदार सुरुवात केले.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या लढतीत प्रथम फलंदाजी करताना रायगड रॉयल्स संघाने २० षटकात ८बाद १५९ धावा केल्या. धावगती वाढवण्याच्या प्रयत्नात कर्णधार किरण नवगिरे(१९), भाविका आहिरे (१७), आदिती गायकवाड(१३) हे फलंदाज झटपट बाद झाले. त्यानंतर प्रज्ञा वीरकरने २८ चेंडूत ५चौकारासह ३४ धावा काढून संघाचा डाव सावरला. तिला यशोदा घोगरे नाबाद २३, आयेशा शेख १६ यांनी धावा काढून साथ दिली. रत्नागिरी जेट्सकडून संजना वाघमोडे(२-२५), प्रियांका घोडके(१-२४), भक्ती मिरजकर(१-२२), ऋतुजा काळे(१-२८) यांनी सुरेख गोलंदाजी केली.

१५९ धावांचे लक्ष्य रत्नागिरी जेट्स संघाने १९.५ षटकात ६ बाद १६० धावा काढून पूर्ण केले. गौतमी नाईक व स्मृति मंधाना या सलामीच्या जोडीने ५६ चेंडूत ८५ धावांची भागीदारी करून संघाला धडाकेबाज सुरुवात करून दिली. त्यात गौतमी नाईकने शानदार अर्धशतक साजरे केले. डब्लूएमपीएलमधील हे दुसरे अर्धशतक ठरले. गौतमीने ४६चेंडूत ७० धावांची आक्रमक खेळी केली. गौतमीने ११चौकार व १ षटकार मारला. स्मृति मंधाना २६ चेंडूत ३५ धावा काढून तंबूत परतली. त्यात तिने ३चौकार व २ षटकार खेचले. स्मृतिला रायगड रॉयल्सच्या आदिती गायकवाडने झेल बाद केले. त्यानंतर प्रियांका घोडके(७), भक्ती मिरजकर(०) हे मधल्या फळीतील फलंदाज एकापाठोपाठ तंबूत परतले. गौतमी देखील ७० धावांवर खेळत असताना रायगडच्या आयेशा शेखने उत्तम क्षेत्ररक्षण करत तिला धावबाद केले. यावेळी रत्नागिरी जेट्ससमोर विजयासाठी ३२ चेंडूत ४२ धावा असे आव्हान होते. हे आव्हान रसिका शिंदे १४, शिवाली शिंदे नाबाद १९ यांनी धावा काढून संघाला विजय मिळवून दिला.

#रा